म. ग्रं. सं. ठाणे
विषय निबंध
सं. क्र. ११२४७



# कुमारसंभव

## कथा आणि काव्यपरामर्श

REFBK-0009772

पं. महादेवशास्त्री जोशी

# कुमारसम्भव

कथा आणि काव्यपरामर्श

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें, स्थलप्रत.
अनुक्रम 23455 वि. निबंध
क्रमांक 11772 नों. दि. 3-12-58

पं. महादेवशास्त्री जोशी

२७७२

REFBK-0009772

न [illegible] ना
गिरगांव : मुंबई ४ [illegible] बुधवार चौक : पुणें २

किंमत दोन रुपये

प्रकाशक :
**श्री. वि. दामले, बी. कॉम्.**
एन्. के. पब्लिशिंग हाऊस
६२७ बुधवार पेठ, पुणें २

* * *

आ वृ त्ति प हि ली
२६ सप्टेंबर, १९५८

* * *

सर्व हक्क स्वाधीन

* * *

मुद्रक :
**रा. ना. सरनाईक**
सुलभ मुद्रणालय,
२९१ शनिवार पेठ, पुणें २

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थळप्रत.
अनुक्रम २३८०८८ दि: [illegible]
११४८८ बों: दि: [illegible]

# प्रास्ताविक

कविकुलगुरु कालिदासाचीं महाकाव्यें दोन. एक रघुवंश आणि दुसरें कुमारसंभव. त्यांत तरतमभाव लावणें कठिण. या दोन्ही काव्यसरोवरांत क्रीडा करतांना कालिदासाच्या उन्मेषशालिनी प्रतिभेनें आपले सकलकलाविलास दाखविले आहेत. रघुवंशकथा ही मानवांची कथा आहे. त्यांतल्या मानवव्यक्ति आपल्या उदात्त सद्गुणांनीं देवकोटीला जाऊन पोंचतात. स्वर्गालाहि भूषण ठरतात. या उलट कुमारसंभव ही देवांची कथा आहे. त्यांतल्या साऱ्या दिव्य व्यक्ति जणूं मानवी भावनांचें लेणें लेवून पृथ्वीवर क्रीडा करायला येतात. सप्तस्वर्ग जणूं धरेला आलिंगन द्यायला उतरतात.

कुमारसंभव हें एकूण सतरा सर्गांचें काव्य आहे. पण त्यांतले फक्त पहिले आठ सर्गच कालिदासाच्या हातचे असून पुढचे नऊ सर्ग दुसऱ्या कोण्या तरी कवीनें रचून प्रस्तुत काव्य पूर्णतेला पोंचविलें आहे. कुमार म्हणजे कार्तिकेय. अष्टसर्गात्मक काव्यांत त्याचा जन्म झालेला नसला तरी शिवपार्वती विवाहबद्ध होऊन गृहस्थधर्म आचरूं लागतांच कुमाराच्या संभवाचा 'संभव' निर्माण झाला असें समजून कालिदासानें तेथेंच म्हणजे आठव्या सर्गाच्या अखेरीसच काव्याची 'इतिश्री' केली असावी, असा साधारण समज आहे. कांहींचें मत याहून वेगळें दिसतें. शिव आणि पार्वती हीं जगाचीं मातापितरें. रघुवंशाच्या पहिल्या श्लोकांत कालिदासानें त्याच भावनेनें त्यांना वंदन केलें आहे. असें असतां कालिदासानें औचित्य सोडून आठव्या सर्गांत त्या दोघांच्या उन्मुक्त शृंगारक्रीडा वर्णिल्या. त्याबद्दल तत्कालीन रसिक विद्वानांनीं त्याला दूषण लावलें. कालिदासाला त्यामुळें विरति उत्पन्न झाली आणि त्यानें पुढें कांहींच न लिहिल्यामुळें हें काव्य तेथेंच परिसमाप्त झालें.

कालिदासाला शृंगाररसाचा राजा म्हणतात. शृंगारवर्णनाची त्याची हातोटी अनन्यसाधारण आहे. क्वचित् अतिरेक होतो. क्वचित् त्यापायीं श्लीलतेच्या लक्ष्मणरेषाहि ओलांडल्या जातात. पण तरीहि रसलुब्ध वाचक

त्या दोषाकडे आजवर कानाडोळा करीत आले आहेत. उत्कट दोषापेक्षां त्याच्या अंगीं उत्कट काव्यगुणांच्याच अष्टसिद्धि आणि नवनिधि भरलेले असल्यामुळें रसिक सहृदयांना कालिदास म्हणजे ‘ पंचीप्यारा ’ वाटतो.

पार्वतीच्या जन्मापासून या काव्यवस्तूचा प्रारंभ होतो आणि ती शंकराशीं लग्न होऊन सासरीं गेल्यावर त्या दोघांच्या प्रणयपरिपूर्तींत काव्याचीहि परिपूर्ति होते. पार्वतीची शिवसेवा, शिवकृत मदनदहन, पार्वतीचें उग्र तप, तिची सत्त्वपरीक्षा, शिवदर्शन, ऋषींची मध्यस्थी, हे मधले प्रसंग. हिमाचलाची दुसरी कन्या गंगा ही जशी अवघड कडे ओलांडीत, अनेक अडथळे स्वतःच्या सामर्थ्यानें दूर करीत, अखेर निग्रहाच्या बळावर सागराला भेटून कृतार्थ होते, तशीच या महाकाव्यांत पार्वतीहि अनेक आपत्तींशीं निर्धारानें झुंजत अखेर शिवाच्या अर्धांगीं आरूढ होते.

यावरून कळेल कीं, पार्वती ही या महाकाव्याची नायिका आहे. तिचीं तीन रूपें या ठिकाणीं दिसतात आणि तीं तिन्हीं प्रसन्नमनोहर वाटतात. बाल्यकालांतली पार्वती अल्लड पण बुद्धिमती आहे. यौवनकालांतली पार्वती धीट आणि वज्रनिर्धारी आहे; आणि शिवाची अर्धांगी या नात्यानें ती सेवापरायण अशी प्रणयिनी आहे.

हसणें, रुसणें, लाजणें, गळाठणें, प्रसंगीं खडतर कष्टांचीहि पर्वा न करणें, मत्सर करणें, प्रपन्न होणें, अधिकार गाजविणें, इत्यादि नारी-स्वभावाच्या संपूर्ण छटा या महाकाव्यांत कुठें स्पष्ट तर कुठें सूक्ष्म अशा उमटल्या आहेत. आजवर युगानुयुगें पार्वती ही भारतीय नारीचा पवित्र अन् उद्‌बोधक असा आदर्श ठरली आहे. प्रस्तुत महाकाव्यांत हाच महनीय आदर्श कालिदासानें काव्याच्या मुशींत ओतून जितका सोज्ज्वल तितकाच भावरम्य बनविला आहे.

हें पुस्तक म्हणजे अष्टसर्गात्मक कुमारसंभवाचा मराठी गद्यात्मक अनुवाद आहे. मूळ कृतीशीं अधिकांत अधिक इमान राखून हा शब्द-प्रपंच केलेला आहे. केवळ मराठी वाचकाला या अनुवादांत लेखक नव्हे, तर मूळ महाकवि कालिदास प्रतीत व्हावा, ही दृष्टि ठेवलेली आहे.

या महाकाव्यांतले जे श्लोक मला विशेषेंकरून आवडले, ते मूळ संस्कृतांत दिले असून त्यांच्याखालीं त्यांचा शब्दशः अर्थ दिलेला आहे. त्याच्याहि खालीं बारीक टाइपांत त्या त्या श्लोकांत मला जे कालिदासाच्या प्रतिभेचें सौंदर्य, चातुर्य, सूक्ष्मत्व आणि अर्थघनत्व प्रतीत झालें, तें यथामति उकलून दाखविण्याचा प्रयत्न केलेला आहे.

हें पुस्तक बरींच वर्षें लिहून पडलें होतें. आज इतक्या वर्षांनीं तें प्रकाशांत येत आहे आणि त्याबद्दल मला होणारा आनंद 'नवीन किताबखान्या'चे मालक आणि माझे मित्र श्री. श्री. वि. दामले यांनीं मला दिला आहे. त्यांचे-माझे संबंध औपचारिक नाहींत; तथापि, औचित्य म्हणून तरी मला त्यांचे हार्दिक आभार मानायलाच हवेत.

पुणें,
भाद्रपद शुद्ध तृतीया
शके १८८०
सन १९५८

—महादेवशास्त्री जोशी

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थलप्रत.
अनुक्रमांक 23८88 वि: १०८५ —
क्रमांक ११७१० नों: दि: ३०।१०।५८

या विषयावर इतकें विस्तृत विवेचनात्मक पुस्तक दुसरें नाहीं.

# वक्तृत्व शास्त्र

कला—तंत्र—मंत्र

लेखक

**न. वि. गाडगीळ**

**किंमत ६ रुपये**

**एक निवडक अभिप्राय :**

" वक्तृत्व या विषयाचें सांगोपांग विवेचन करून श्री. काकासाहेब गाडगीळ ह्यांनीं वक्तृत्वकलेला शास्त्राची बैठक दिली आहे... ( वक्तृत्वाचे ) प्रकार, प्रेरणा व प्रसंग...पुष्कळच वेगळे आणि विस्तृत झालेले आहेत. निरनिराळ्या श्रोतृगणांवर आणि गटांवर भाषणाचा प्रभाव पाडण्यास, त्यांचें मानसशास्त्र अवगत असावें लागतें व त्याचा वक्तृत्वांत उपयोग करावा लागतो, ह्याची जाणीव हा ग्रंथ करून देतो...मराठींत ज्या विषयावर हाताच्या बोटांवर मोजण्याइतकेहि ग्रंथ नाहींत अशा विषयावर ग्रंथ लिहून काकासाहेबांनीं मराठी साहित्यांत अमोल भर घातली आहे. "

**आ. रा. देशपांडे ( कवि अनिल )**
अध्यक्ष, महाराष्ट्र-साहित्य-संमेलन
( १९५८ )

## प्रत्येक कुटुंबांत संग्राह्य असें निवडक वाङ्मय

| | | | |
|---|---|---|---|
| वक्तृत्वशास्त्र | ( प्रबंध ) | न. वि. गाडगीळ | ६=०० |
| कुमारसम्भव | ( कथा ) | महादेवशास्त्री जोशी | २=०० |
| समाजवादी समाजरचना | ( विवेचन ) | स. मा. गर्गे | ४=५० |
| तो आणिक ती | ( काव्यकथा ) | शं. गो. साठे | १=०० |
| शिलंगण | ( खण्डकाव्य ) | ,, | १=०० |
| चिंचा आणि बोरें | ( विनोदी स्फुटकाव्य ) | ,, | १=०० |
| प्रीतिपथावर | ( स्फुट कविता ) | सौ. पद्मा | २=०० |
| शरदिनी | ( ,, ) | वा. पु. दामले | २=५० |
| पुसलेलीं चित्रें | ( कादंबरी ) | सौ. सुधा साठे | ४=५० |
| नकुलालङ्कार | ( खण्डकाव्य ) | माधव जूलियन् | १=०० |
| सुधारक | ( ,, ) | ,, | २=०० |
| गज्जलाञ्जलि | ( स्फुट कविता ) | ,, | २=०० |
| विरहतरङ्ग | ( खण्डकाव्य ) | ,, | २=५० |
| सचित्र प्रथमोपचार | ( शास्त्रीय ) | डॉ. वि. ना. भावे | १=५० |
| एकच गांठ | ( नाटक ) | सौ. सुधा साठे | १=२५ |
| छापील संसार | ( नाटक ) | शं. गो. साठे | १=०० |
| औट घटकेचें राज्य | ( कादंबरी ) | शं. गो. साठे | ३=०० |
| ज्योतिष-शिक्षण-क्रम | ( ज्योतिष ) | ग. बा. ओक | १=५० |
| श्यामली | ( कथासंग्रह ) | इंदिरा संत | १=५० |
| जुन्या जखमा | ( कथासंग्रह ) | भालचंद्र लाड | २=५० |
| स्वरनिनाद | ( फिड्ल् शिक्षक ) | श्रीधर पार्सेकर | १=५० |
| अभिनव पाकशास्त्र | ( स्त्रियांसाठीं ) | पी. चौधरी | ०=७५ |

◆ ◆ ◆

व्यापाऱ्यांस व वाचनालयांस भरपूर सवलत. ◆ वरीलपैकीं कोणत्याहि पुस्तकाचें मूल्य आगाऊ धाडणाऱ्या ग्राहकास साध्या टपालानें पाठवूं.

## न वी न कि ता ब खा ना

गिरगांव : मुंबई ४ : : : : बुधवार चौक : पुणें २

# अनुक्रमणिका


१. उमोत्पत्ति .... .... १
२. ब्रह्मसाक्षात्कार .... .... १२
३. मदनदहन .... .... २१
४. रतिविलाप .... .... ३१
५. तपःफलोदय .... .... ४१
६. उमाप्रदान .... .... ५६
७. उमापरिणय .... .... ६५
८. उमासुरतवर्णन .... .... ७६

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.

## उमोत्पत्ति : : १

उत्तर दिशेला हिमालय नांवाचा एक पर्वतराज आहे. त्याच्यावर देवता वास्तव्य करतात. तो इतका लांब आहे कीं, त्याचें एक टोंक पूर्वसमुद्रांत आणि दुसरें पश्चिमसागरांत बुडालें आहे. त्याच्याकडे पाहिलें म्हणजे असें वाटतें कीं, हा पर्वत नसून पृथ्वी मोजण्याचा मापनदंडच असावा. पृथुराजाच्या आज्ञेनें पृथ्वीनें गाईचें रूप घेतलें, तेव्हां सगळ्या पर्वतांनीं हिमालयाला केलें वासरूं, मेरु झाला धार काढणारा आणि त्यांनीं तेजस्वी रत्नें आणि महान् औषधि तिच्या कासेंतून दोहून घेतल्या. हिमालयावर अनंत रत्नें आहेत. एकच गोष्ट दोषास्पद म्हणजे त्याचीं शिखरें बर्फानें आच्छादित असतात. पण त्या हिमवृष्टीमुळें त्याची शोभा कमी झालेली नाहीं. चंद्रावरचा डाग जसा सहसा लक्षांत येत नाहीं त्याप्रमाणें गुणसमुदायांत एखादा दोष सहज लपून जातो !

त्याच्या शिखरांवर गैरिकादि धातु आहेत. त्यांची तांबूस प्रभा जवळच्या मेघखंडांत मिसळते आणि त्यामुळें अकालीं संध्याकाळ झाल्यासारखें वाटतें. त्या धातु अप्सरांना आपल्या प्रसाधनाच्या कामीं उपयोगीं पडतात. याच्या मध्यभागापर्यंत मेघ संचार करीत असतात. सिद्ध पुरुष उन्हानें तापले कीं, खालीं उतरून ढगाच्या सावलीला येऊन बसतात आणि मेघांतून जलधारा वर्षूं लागल्या कीं, तो वर्षाव सहन न झाल्यामुळें ते वर

चढून उन्हें असलेल्या पर्वत-शिखरांचा आश्रय करतात. याच्यावर सिंह आहेत. ते आपल्या पंजांनीं हत्तींचीं गंडस्थळें फोडून त्यांना मारतात. जेव्हां ते निघून जातात तेव्हां त्यांच्या नखांत अडकलेलीं हत्तींच्या गंडस्थलांतलीं मोत्यें जागोजाग सांडलेलीं असतात. हिमाचलावरचे भिल्ल सिंहाची शिकार करीत असतात. रक्तानें भरलेले त्यांचे पंजे भूमीवर उमटलेले पाहून सिंह कोणत्या दिशेनें गेले असतील त्याचा तर्क भिल्लांना करतां येतो. पण पुष्कळ वेळां पर्वतावरचे रक्ताचे डाग पावसानें धुतले जातात आणि सिंहाचा गमनमार्ग शोधून काढण्याचें त्यांचें हमखास साधन नाहींसें होतें. अशा वेळीं जिकडे मोती पडले असतील तो सिंहाचा माग असें ते ठरवितात. याच्यावर भूर्जवृक्ष आहेत. त्यांची साल पत्रलेखनाच्या कामीं उपयोगीं पडते. विद्याधरांच्या सुंदरी धातुरसाच्या तांबड्या शाईनें त्या सालींवर प्रेमपत्रें लिहून तीं आपल्या वल्लभांना पाठवितात.

हिमालयावर वेळूंचीं बेटें आहेत. दऱ्याखोऱ्यांतून बाहेर पडणारा वारा वेळूंच्या छिद्रांत भरतो आणि त्यांतून सतस्वर बाहेर पडूं लागतात. ते ऐकून असें वाटतें कीं, याच्यावर बसून गायन करणाऱ्या किन्नरांना जणूं हा पर्वत साथच करीत आहे. रानांतले हत्ती येतात आणि याच्यावरच्या सरल वृक्षावर आपलीं गंडस्थळें घासतात. त्यामुळें त्यांची साल फुटून त्यांतून दुधासारखा चीक बाहेर पडूं लागतो आणि आजूबाजूच्या टेकड्या सुगंधानें भरून जातात. पहाडी लोक रात्रीच्या वेळीं आपल्या स्त्रियांना सांगातीं घेऊन याच्यावर रतिक्रीडा करीत असतात. त्यांना बिचाऱ्यांना झगझगीत प्रकाशाचे दिवे कुठून मिळणार ! पण या पर्वतावर अशा कांहीं वनस्पति आहेत कीं, रात्रीच्या वेळीं त्यांच्या अंगांतून प्रकाशकिरण बाहेर पडत असतात. हे बिनतेलाचे दिवे त्यांच्या रतिविलासांत उत्कट आनंद निर्माण करतात.

किन्नरस्त्रिया याच्यावरून चालत असतां मार्गांत गोठून दगडासारखें झालेलें बर्फ त्यांच्या पायांना असह्य होतें खरें; पण पुष्ट स्तन आणि स्थूल नितंब यांचें ओझें अवजड झाल्यामुळें त्यांना जलद चालतां येत नाहीं. हा हिमाचल घुबडाप्रमाणें गुहांतून लपून बसलेल्या अंधकाराचें सूर्यापासून रक्षण करतो.

'क्षुद्रेऽपि नूनं शरणं प्रपन्ने ममत्वमुच्चैः शिरसां सतीव'

[एखादा क्षुद्र जरी शरण आला तरी मोठे लोक सज्जनांप्रमाणें त्याच्यावर ममता करतात.]

चमरी नांवाच्या हरिणी चवरीसारखे आपल्या शेपटीचे शुभ्र गोंडे हालवीत याच्यावरून बागडत असतात. आणि त्यामुळें याची 'गिरिराज' ही पदवी सार्थ ठरते. किंपुरुषांचीं जोडपीं येथें विलाससुख भोगीत असतात. पुरुष रमणींचीं वस्त्रें हिसकून घेतात आणि त्या बिचाऱ्या लाजून चूर होतात. पण त्याच वेळीं यदृच्छेनें गुहेच्या तोंडावर लोंबून आलेले ढग त्यांना पडद्याप्रमाणें उपयोगीं पडतात. वारा सुटला कीं, याच्यावरचे देवदार वृक्ष कंपित होतात. मोरांचीं पिसें इतस्ततः उडूं लागतात. गंगेच्या प्रवाहाचे तुषार वाहून आणीत असल्यामुळें तो वारा शीतल असतो. हरिणांचा पाठलाग करून थकलेल्या पारध्यांना त्याच्या सेवनानें आराम वाटतो.

हिमालयाचीं कांहीं शिखरें सूर्यमंडलापेक्षांहि उंच आहेत. त्यांजवर तळीं असून त्यांत कमळेंहि उमलतात. सकाळच्या वेळीं सप्तर्षि तीं कमळें तोडून नेतात आणि जीं शिल्लक उरतील त्यांना सूर्य आपल्या वर जाणाऱ्या किरणांनीं फुलवतो. यज्ञाला लागणाऱ्या सोमवल्ली इत्यादि अनेक वस्तु हा हिमालय पुरवतो आणि पृथ्वीला धारण करण्याचें सामर्थ्यहि याच्या ठिकाणीं आहे. हें पाहून ब्रह्मदेवानें याला यज्ञांत हविर्भाग ठेवला आणि आपण होऊन साऱ्या पर्वतांचें आधिपत्य याला बहाल केलें. हिमाचल हा मेरुपर्वताचा सखा. तो शास्त्रमर्यादा जाणणारा होता. आपल्या कुलाचें सातत्य कायम राहायला हवें यासाठीं त्यानें विवाह करायचें ठरविलें. मेना नांवाची पितरांची एक कन्या होती. मुनींनासुद्धां मान्य होईल असें तिचें शील होतें. ती आपल्याला अनुरूप आहे असें जाणून त्यानें विधिपूर्वक तिचें पाणिग्रहण केलें.

मेनेचें यौवन मनोरम होतें. त्या उभयतांनीं आपल्या स्वरूपाला योग्य अशीं विलाससुखें अनुभविलीं. त्यानंतर कांहीं कालानें मेना गर्भवती झाली. तिला पुत्र झाला. मैनाक असें त्याचें नांव ठेवलें. नागवधूंना उपभोग्य असें त्याचें तारुण्य आणि सौंदर्य होतें. समुद्राशीं त्यानें मैत्री जोडली होती. इंद्र

जेव्हां क्रुद्ध होऊन पर्वतांचे पंख तोडूं लागला तेव्हां त्यानें सागराचा आश्रय केला. त्यामुळें वज्रप्रहाराच्या वेदना किती तीव्र असतात तें त्याला कळून आलें नाहीं.

त्यानंतर मेनेला एक कन्या झाली. ही मुलगी म्हणजे पूर्वजन्मींची दक्षकन्या सती होय. आपल्या बापानें शंकराचा अपमान केला तो सहन न होऊन तिनें योगाग्नीनें आपला देह भस्म केला होता आणि तीच आतां पुनश्च मेनाराणीच्या उदरीं जन्माला आली होती. चातुर्यानें योजलेल्या राजनीतीच्या ठिकाणीं उत्साहगुण जसा ऐश्वर्य निर्माण करतो, त्याप्रमाणें व्रतनियमानें वागणाऱ्या राणीच्या पोटीं पर्वतराजानें त्या कन्येला जन्म दिला होता.

ती जन्मली त्या वेळीं दिशा प्रसन्न झाल्या. धूळ न उधळली जाईल इतक्या बेतानें मंद वारे वाहूं लागले. आकाशांत आधीं शंख वाजले आणि पाठोपाठ पुष्पवृष्टि झाली. चराचर सृष्टीला तिचा जन्मदिवस सुखाचा झाला. त्या कन्येच्या भोंवतीं तेजाचें एक वलय स्फुरण पावत होतें आणि त्यामुळें मेनाराणीहि उज्ज्वल दिसत होती. मेघगर्जनेनें रत्नशलाका दुभंगली कीं, तिच्यांतून वर येणाऱ्या तेजोंकुरांनीं पर्वतावरची आसपासची जागा जशी शोभते तशी मेना शोभली. बीजेची चंद्रकोर जशी रोज एकेका कलेनें वाढून चांदणें अधिकाधिक टिपूर करते, तशी ती कन्या दिवसेंदिवस मोठी होऊन आपली बाळसेदार अंगकांति खुलवूं लागली. तिच्या नातलगांची ती अतिशय लाडकी झाली. पर्वताची मुलगी म्हणून पार्वती या नांवानें ते तिला संबोधूं लागले. मागाहून जेव्हा मेनेनें ‘ तूं तप करूं नको ’ म्हणून तिच्या इच्छेला विरोध केला, तेव्हां तिला ‘ उमा ’ हें नांव पडलें. हिमाचल पुत्रवान् होता. पण त्याचें विशेष प्रेम पार्वतीवर जडलें. तिला कितीहि वेळ पाहिलें तरी त्याची तृप्ति होत नसे. वसंतऋतूंत अनंत फुलें फुलतात, पण भ्रमरपंक्ति आम्रमंजरीवरच विशेषेंकरून लुब्ध असते. तेजानें पुंजाळलेल्या ज्योतीमुळें दिवा, गंगाप्रवाहामुळें स्वर्गाचा मार्ग आणि सुसंस्कृत वाणीमुळें पंडित, तसा हिमाचल त्या पार्वतीमुळें शोभला आणि पुनीतहि झाला.

तिच्याभोंवतीं नेहमीं मैत्रिणींचा घोळका असे. ती त्यांच्यासह भागीरथीच्या वाळवंटांत जाऊन वाळूचे चौथरे करी. कधीं चेंडू खेळे तर कधीं बाहुलीचा खेळ मांडी. जणूं ती आपल्या बाळपणीं क्रीडारस पिऊन घेत

होती. तिचा पूर्वाभ्यास दृढ होता. शरदृतु आला कीं, हंस गंगातीरावर येतात. रात्र झाली कीं महौषधींच्या ठिकाणीं आत्मतेज प्रकट होतें. त्याचप्रमाणें गुरु जेव्हां तिला शिकवूं लागले तेव्हां पूर्वजन्मींच्या सगळया विद्या तिच्या अंतरांत प्रविष्ट झाल्या.

**‘ असंभृतं मण्डनमङ्गयष्टेरनासवाख्यं करणं मदस्य ।**
**कामस्य पुष्पव्यतिरिक्तमस्त्रं बाल्यात्परं साथ वयः प्रपेदे ॥ ’**

[ नंतर कांहीं दिवसांनीं तिला अशी एक वयोवस्था प्राप्त झाली कीं, कोणताहि अलंकार घातल्यावांचूनच तिची काया अलंकृत दिसूं लागली. मद्य प्याल्यावांचूनच तिच्या ठिकाणीं मदाचा प्रादुर्भाव झाला. आणि कामदेवाला तिच्यारूपानें पुष्पाव्यतिरिक्त आणखी एक अस्त्र मिळालें. ]

[ या श्लोकांत कालिदासानें वक्रोक्तीचा अवलंब करून पार्वतीनें तारुण्यांत पदार्पण केल्याचें सांगितलें आहे. तारुण्य हा शब्दहि न उच्चारतां विशेषणें मात्र अशीं योजलीं आहेत कीं, तीं वाचल्यावर वाचकाला वाटावें कीं, ही वयोवस्था म्हणजे यौवनच होय. हा श्लोक वाचतांच तरुण पार्वतीचें चित्र डोळयांसमोर उभें राहतें. तारुण्यांत सोन्यामोत्यांच्या दागिन्यांची आवश्यकता नसते. प्रत्येक अवयव आपापल्या परीनें असा पुष्ट आणि गोंडस होतो कीं, त्यालाच न्याहाळीत बसावें. एखादी कुरूप स्त्रीसुद्धां तारुण्याला बहर आल्या वेळीं लोकांचे नेत्र आकृष्ट करूं शकते. मग ‘ जातीच्या सुंदरा ’ पाहणाराला किती नयनानंद देत असतील त्याची कल्पना करा. यौवन हाच एक अभिजात अलंकार आहे. तसाच तो तारुण्यांतला मद. निरामय यौवनांत प्रत्येक व्यक्तीला आपल्या अंगीं अचाट शक्ति संचरल्याचा साक्षात्कार होतो, चालण्या-बोलण्यांत रुबाब येतो. डोळयांत बेफिकिरी प्रगटते. सारें जग आपण तळहातावर नाचवूं असा अहंभाव उदित होतो. फुलांचें अस्त्र फेकून जीवांना आत्मवश करण्याचें कार्य मदन करीत असतो. पण युवयुवतींच्या प्रत्यक्ष दर्शनानें एकमेकांना जी मदनपरवशता येते ती इतर कशानेंहि नाहीं. हा श्लोक पर्यायोक्त अलंकाराचें उत्तम उदाहरण आहे. जो विवक्षित अर्थ कवीला सांगायचा असेल तो नांव घेऊन न सांगतां निराळया प्रकारें, पण सुंदरपणें सांगणें याला पर्यायोक्ति म्हणतात. याचें दुसरें उदाहरण पंतांच्या काव्यांतलें देतों.

" हांसुनि तीहि म्हणे हो प्रार्थावें प्रणतपारिजातातें
देवा स्वयें वहावें या निजकारुण्यवारिजा तातें "

दुष्यंत शकुंतलेला 'तूं माझी भार्या हो' म्हणाला, तेव्हां ती त्याला म्हणते कीं, 'पित्याकडे मागणी घाला.' इथें पिता व त्याचें औदार्य व्यक्त करण्याकरितां 'प्रणतपारिजात' आणि शकुंतला हा अर्थ व्यक्त करण्याकरितां 'कण्वाच्या कारुण्यसरोवरांतलें कमळ' अशीं पदें योजलीं आहेत. या पदांनीं, नांवें न घेतांहि कवीचें उद्दिष्ट काय आहे तें कळून येतें. ]

**'उन्मीलितं तूलिकयेव चित्रं सूर्यांशुभिर्भिन्नमिवारविन्दम् ।**
**बभूव तस्याश्चतुरस्रशोभि वपुर्विभक्तं नवयौवनेन ॥'**

[ नवतारुण्यानें मुसमुसलेलें तिचें शरीर आपादमस्तक शोभूं लागलें. जणूं कुंचलीनें रेखाटलेलें चित्रच. अथवा सूर्याच्या किरणांनीं उमलविलेलें कमळच. ]

[ पार्वती सर्वांगसुंदर होती हें सांगण्यासाठीं कवीनें चित्र आणि कमळ यांची उत्प्रेक्षा केली आहे. कोणतेंहि चित्र, चित्रकाराच्या मनांत आधीं तयार होत असतें. आणि आपल्या हृदयगत अव्यक्त आकारालाच तो कुंचलीच्या साहाय्यानें अभिव्यक्तीला आणतो. ब्रह्मदेव हाहि एक असाच कलाकार आहे. त्याच्या अंतरांतली लावण्यमयी प्रतिमाच पार्वतीच्या रूपानें मूर्तिमान् झाली होती. सूर्य-किरण कमलाच्या गाभ्यांत शिरले कीं, त्याची पाकळीन् पाकळी विकसित होते. पार्वतीच्या प्रत्येक अवयवाचाहि तसाच विकास झाला होता. अशा या उभयविध उत्प्रेक्षांनीं कालिदासानें पार्वतीच्या सौंदर्याचा गुणगौरव केला आहे. ]

**'अभ्युन्नताङ्गुष्ठनखप्रभाभिर्निक्षेपणाद्रागमिवोद्गिरन्तौ ।**
**आजह्रतुस्तच्चरणौ पृथिव्यां स्थलारविन्दश्रियमव्यवस्थाम् ॥'**

[ ती पावलें टाकूं लागली कीं, आंगठ्याच्या नखांतून गुलाल उधळावा तशी प्रभा बाहेर निघे. त्यांना पाहून असें वाटे कीं, पृथ्वीवरचीं हीं कमळेंच चालत आहेत. ]

[ पावलांना कमलांची उपमा देण्याची वहिवाट प्राचीन कवींपासून चालत आलेली आहे. स्त्रियांचीं लहान, नाजूक व तांबूस पावलें खरोखरीच कमळासारखीं

दिसतात. बोटें हीं त्याच्या पाकळ्या शोभतात. पुरुषांच्या पायांनाहि केव्हां केव्हां कमळाचें सादृश्य योजलें जातें, पण तें केवळ आदरार्थी असतें. कालिदास पूर्वसंकेतानुसार आलेलीं उपमानें वापरतो खरीं, पण त्यांत त्याचें म्हणून कांहीं तरी नवीन असतें. येथेंच पाहा ना. पार्वतीच्या पदविन्यासाकडे पाहून हीं कमळें चालत आहेत असें म्हणून त्यानें इतर कवींच्यापुढें एक हात उडी मारली. ]

**‘ सा राजहंसैरिव संनताङ्गी गतेषु लीलाञ्चितविक्रमेषु ।**
**व्यनीयत प्रत्युपदेशलुब्धैरादित्सुभिर्नूपुरसिञ्जितानि ।। ’**

[ तिचीं अंगें किंचित् वांकल्यासारखीं दिसत. तिची चालहि मनोज्ञ होती. ती चालूं लागली कीं, तिच्या पायांतल्या नूपुरांचा मंजुळ ध्वनि उमटे. असें वाटे कीं, ती चाल हंसांनींच तिला शिकविली होती आणि त्या मोबदल्यांत ते तिच्याकडून नूपुरध्वनीची अपेक्षा करीत होते. ]

[ एखाद्या रमणीची चाल सुंदर असली कीं, तिला ‘ गजगति ’ किंवा ‘ हंसगति ’ म्हणायचें ही रूढिहि पूर्वापार आहे. तिला अनुसरून कालिदास पार्वतीला हंसगामिनी म्हणतो. पण तें म्हणत असतांना त्यानें निवेदनपद्धतीचा एक आकर्षक नमुना आपल्यापुढें ठेवला आहे. हंसांनीं आपली विलासगति पार्वतीला शिकविली. कशासाठीं ? तर त्यांनाहि तिच्याकडून कांहीं तरी शिकायचें होतें. कोणतीहि कला अथवा विद्या गुरूकडूनच मिळवावी लागते. आणि ती मिळविण्याचे मार्ग तीन : गुरूची सेवा करावी, गुरूला पुष्कळ धन द्यावें अथवा आपली एखादी विद्या गुरूला देऊन तिच्या मोबदल्यांत आपण त्याच्याकडून त्याची विद्या संपादावी. हंसांनीं या ठिकाणीं तिसरा प्रकार अमलांत आणला आहे.

हा श्लोक लिहितांना महाभारतांतल्या नलचरित्रांतला एक प्रसंग कदाचित् कालिदासाच्या डोळ्यासमोर असावा. नलराजानें आपली अश्वविद्या ऋतुपर्णाला शिकविली होती आणि फाशांची विद्या ऋतुपर्णाकडून घेतली होती. कालिदास बहुश्रुत होता हें सांगणें नकोच. त्याचा तो बहुश्रुतपणा स्पष्ट वा अस्पष्टपणें जागोजाग प्रतीत होत असल्यामुळें काव्याला विशेष शोभा येत असते. ]

यापुढें कालिदास पार्वतीच्या अवयवांचें पृथक्पणें वर्णन करीत आहे:—

तिच्या मांड्या नितळ, वाटोळ्या, क्रमानें खालीं निमुळत्या आणि

फार लांब नव्हेत आंखूड नव्हेत, अशा होत्या. विधात्यानें जमा केलेली सौंदर्यसामग्री त्या मांड्यांवरच खर्च झाली. आणि तिचे इतर अवयव निर्माण करतांना सौंदर्य कोठून आणूं अशी त्याला पंचाईत पडली. तिच्या मांड्या निरुपमेय होत्या. हत्तीच्या सोंडेची त्यांना उपमा द्यावी तर ती खरबरीत, आणि केळीच्या खुंटाची उपमा योजावी तर तो अति थंड. या दोषांमुळें या दोन वस्तु आकारानें मोठ्या असूनहि मांड्यांशीं तुलना करण्याच्या कामीं निरुपयोगी ठरल्या होत्या. विवाह झाल्यानंतर शंकरानें पार्वतीला मांडीवर बसवून घेतलें, यावरूनच तिचा श्रोणिभाग किती सुंदर असेल त्याची कल्पना करा. तिच्या उदराला तीन सुंदर वळ्या पडलेल्या होत्या. जणूं नवयौवनानें कामदेवाला आरोहण करण्यासाठीं त्या तीन पायऱ्याच निर्माण केल्या होत्या.

तिचा उरोभाग गोरापान आणि पुष्ट होता. तिचे बाहु शिरीषपुष्पापेक्षांहि नाजूक होते असा तर्क आहे. कारण, तसें नसतें तर मदनानें आपला पराभव झाल्यावरहि त्यांचा पाश शंकराच्या गळ्याभोंवतीं टाकला नसता. तिच्या गळ्यांत टपोऱ्या तजेलदार मोत्यांचा हार होता. त्या हारामुळें तिचा गळा शोभत होता आणि त्या गळ्यामुळें हाराला शोभा आली होती.

**‘ चंद्रं गता पद्मगुणान्न भुङ्क्ते पद्माश्रिता चान्द्रमसीमभिख्याम् ।**
**उमामुखं तु प्रतिपद्य लोला द्विसंश्रयां प्रीतिमवाप लक्ष्मीः ॥ ’**

[ चंद्र आणि कमळ हीं लक्ष्मीचीं दोन आवडतीं स्थानें. दोघांच्याहि गुणांचा तिला लोभ. पण ती जेव्हां चंद्रावर जाई तेव्हां तिला कमलाचा नाजूकपणा आणि कांति हे गुण पारखे होत. आणि कमळावर येई तेव्हां चंद्राची आल्हादकता तिला लाभत नसे. त्यामुळें ती चंद्रावरून कमळावर आणि कमळावरून चंद्रावर अशी सारखी फिरत राही. पण जेव्हां तिला पार्वतीच्या मुखाचा आश्रय मिळाला, तेव्हां मी चंद्र आणि कमळ या दोन्ही ठिकाणीं एकाच वेळीं राहिलें आहें असें वाटून लक्ष्मीला फार आनंद झाला. ]

[ कालिदासानें अर्थचमत्कृतीचे जे अनेक श्लोक लिहिले आहेत त्यांपैकीं हा एक गोड श्लोक आहे. पार्वतीचें मुख कमलासारखें नाजूक आणि कांतिमान् व चंद्रासारखें आल्हादक आणि वाटोळें होतें हें त्याला सांगायचें आहे. पण तें सरळ न सांगतां त्यानें पार्वतीच्या मुखशोभेला लक्ष्मी बनवलें आणि तिला जमीन-अस्मान फिरायला लावलें. चंद्र आल्हादक खरा, पण नुकतेंच उमललेलें कमल जसें रसरशीत दिसतें तसा कांहीं तो दिसत नाहीं. आणि कमळ कितीहि कांतिमान् झालें म्हणून चंद्राचा आल्हादकपणा त्याला कोठून लाभणार? पण पार्वतीच्या मुखांत हे दोन्ही गुण होते. कमळ रात्रीं मिटतें आणि चंद्र दिवसां निस्तेज होतो, पार्वतीचें मुख मात्र अहर्निश शोभत होतें असाहि एक सूक्ष्म अर्थ कवीला सूचित करायचा आहे. कवि हा काव्यसृष्टीचा स्वयमेव विधाता असतो. लौकिक सृष्टींत अघटित असलेल्या घटनाहि कवि आपल्या काव्यांत सहजपणें घडवून आणतो. लक्ष्मी आणि पार्वती यांचें भांडण पुराणान्तरीं प्रसिद्ध आहे, पण कालिदासानें येथें लक्ष्मीला प्रेमानें पार्वतीच्या मुखावर बसविलें आहे. ]

**‘ पुष्पं प्रवालोपहितं यदि स्यान्मुक्ताफलं वा स्फुटविद्रुमस्थम् ।**
**ततोऽनु कुर्याद्विशदस्य तस्यास्ताम्रौष्ठपर्यस्तरुचः स्मितस्य ॥ ’**

[ फूल जर तांबूस पल्लवावर ठेवलें आणि मोतीं जर फुटलेल्या पोवळ्याच्या शिलेवर ठेवलें तरच त्या दोघांना पार्वतीच्या, आरक्त ओठांवर ज्याची प्रभा पसरली आहे अशा स्मितहास्याचें अनुकरण करतां येईल. ]

[ पार्वती मोठी गोड हसत असे. हसतांना तिच्या शुभ्र दंतकळ्यांची प्रभा आरक्त ओठांवर पडत असे. तिचें तें मंदस्मित पाहिलें कीं, तांबूस पालवीवर पांढरें फूल ठेवल्यासारखें किंवा पोवळ्याच्या तुकड्यावर दाणेदार मोतीं ठेवल्यासारखें वाटे, असा कवीच्या सांगण्याचा आशय आहे. ]

तिचा स्वर अमृतमधुर होता. ती बोलायला लागली कीं, कोकिळेचा शब्दसुद्धां न जुळवलेल्या सतारीसारखा कर्कश वाटे. तिचे डोळे विस्तृत होते. दृष्टि तरळ होती. जणूं वाऱ्यानें हालणारें निळें कमळच. दृष्टींतलें हें चांचल्य तिनें हरिणींकडून मिळविलें, का तिच्याकडून हरिणींनीं उचललें हें कळायला

मार्ग नव्हता. तिच्या भुंवया कोरीव होत्या. जणूं त्या काजळाच्या शलाकेनें रेखल्या आहेत असें वाटे. त्यांची ती मनोहर वक्रता पाहून मदनानें आपल्या धनुष्याच्या सौंदर्याचा गर्व सोडून दिला. तिचा केशकलाप लांब आणि भरघोस होता. मानवेतर प्राण्यांच्या अंतरांत जर लज्जा वसत असेल, तर तो केशपाश पाहून चमरी नांवाच्या हरिणी आपल्या गोंडेदार शेपटीचा अभिमान सोडून देतील. तिच्या मूर्तीकडे पाहिल्यावर असें वाटे कीं, विधात्याला सारें सौंदर्य एका ठिकाणीं पाहण्याची इच्छा झाली असावी आणि त्यानें विश्वांतलीं सारीं उपमा-द्रव्यें एकत्र करून आणि तीं योग्य जागीं मांडून मोठ्या प्रयत्नानें हिला घडविली असावी.

एक दिवस पार्वती आपल्या पित्याजवळ बसलेली असतांना नारदमुनि फिरत फिरत तेथें आले. त्यांनीं तिच्याकडे पाहून हिमाचलाला सांगितलें कीं, ‘ ही मुलगी शंकराची भार्या होऊन प्रेमानें त्याचें अर्धांग मंडित करील. ’ हें ऐकून पार्वतीचें वय वाढलेलें होतें तरी हिमाचलानें तिच्यासाठीं अन्य वर शोधण्याची खटपट केली नाहीं. पार्वती खरोखर शंकरालाच योग्य होती. सूर्य, चंद्र, तारे, रत्नें इत्यादि अन्य तेजें कितीहि देदीप्यमान असलीं तरी मंत्रपूत हविर्द्रव्य स्वीकारायला अग्नीवांचून दुसरें कोणी योग्य नसतें.

पण अजून शंकरानें तिला मागणी घातली नव्हती. आणि त्यामुळें हिमाचलालाहि शंकराला आपल्या कन्येचा स्वीकार करायला लावणें शक्य झालें नव्हतें. कारण,

**‘ अभ्यर्थनाभङ्गभयेन साधुर्माध्यस्थ्यमिष्टेऽप्यवलम्बतेऽर्थे । ’**

[ आपण केलेल्या विनंतीचा अव्हेर होईल या भीतीनें साधुजन आपल्या इष्टकार्याविषयींसुद्धां उदासीन राहतात. ]

पार्वतीनें आपलें पूर्वजन्मींचें शरीर दक्षाच्या रागानें जेव्हां टाकून दिलें तेव्हांपासून शंकरानें सर्वसंगपरित्याग केला होता. गजचर्म पांघरून तपश्चर्येसाठीं त्यानें हिमालयाच्या एका टेकडीचा आश्रय केला होता. ती टेकडी सुंदर होती. तेथें अनेक देवदारु वृक्ष होते आणि गंगेचा प्रवाह त्यांचीं मुळें शिंपीत होता. जिकडे तिकडे कस्तुरीचा वास दरवळत होता. कोठें कोठें किन्नर आपल्या गोड गळ्यानें गात होते.

शिवगणहि आपल्या स्वामीबरोबर तेथें येऊन शिलाजितानें मढलेल्या शिलाखंडांवर बसले होते. पुन्नाग वृक्षाचे पल्लव त्यांनीं आपल्या कानावर ठेवले होते. भूर्जवृक्षाच्या नाजूक साली त्यांनीं पांघरायला घेतल्या होत्या. आणि मनशिळाच्या रंगानें आपले देह चित्रित केले होते.

नंदी हा शिवगणांचा प्रमुख. तो मोठा मदगर्वित होता. त्याचें वशिंड भलें मोठें होतें. आपल्या खुरांनीं तो पर्वतावरील बर्फाच्या शिला फोडीत होता. त्याला पाहून रानांतले गवे भयभीत होत. सिंहांनीं गर्जना केली कीं, ती त्याला सहन होत नसे आणि तो त्यांच्यापेक्षांहि मोठ्यानें डुरकण्या फोडी.

अष्टमूर्ति शंकरानें तेथें अग्नीची स्थापना केली. इंधनें घालून त्याला प्रज्वलित केलें आणि तो तेथें तप करूं लागला. स्वतः इतरांना तपश्चर्येचीं स्वर्गादि फलें देणारा तो पशुपति स्वतःच कोणत्या तरी कामनेनें तप आचरीत होता. हिमाचलाला हें वर्तमान कळलें. तो तेथें गेला. त्यानें देवाधिदेव शंकराची अर्घ्यपाद्यांनीं पूजा केली आणि त्याची सेवा करण्यासाठीं पार्वती आणि तिची एक सखी या दोघींना तेथें ठेवलें. मनाची एकाग्रता होण्याला पार्वतीचें अस्तित्व विघातक होईल, हें ठाऊक असूनहि शंकरानें तिच्या सेवेला अनुमति दिली.

**‘ विकारहेतौ सति विक्रियन्ते येषां न चेतांसि त एव धीराः । ’**

[ विकारहेतु जवळ असूनहि ज्यांचें चित्त विकार पावत नाहीं तेच खरे धीर पुरुष होत. ]

पार्वती शंकराला पूजेसाठीं फुलें आणून देई. त्याची तपाला बसण्याची वेदि झाडून सारवून स्वच्छ ठेवी. त्याच्या स्नानसंध्येसाठीं पाणी भरून आणी. आन्हिकासाठीं लागणारे दर्भ गोळा करी. रोज अशी सेवा करून तिचा जीव दमे-भागे. पण शंकराच्या मस्तकावरची चंद्रकला आपल्या शीतल चंद्रिकेनें तिचा ताप दूर करी.

## ब्रह्मसाक्षात्कार : : २

ज्या वेळीं पार्वती शंकराची सेवा करीत होती त्याच वेळीं तारकासुराचें आणि देवांचें युद्ध होऊन देव पराभूत झाले होते. त्या दैत्याचा छळ सहन न होऊन सगळे देव इंद्राला पुढें घालून ब्रह्मदेवाची प्रार्थना करण्यासाठीं सत्यलोकीं गेले. विधात्याचें दर्शन झाल्यावर देवांनीं त्या विश्वनिर्मात्या चतुर्मुखाला नमस्कार करून यथार्थ वाणीनें त्याची स्तुति आरंभिली—

" हे भगवन् ! तुला नमन असो. सृष्टीच्यापूर्वीं तूं एकमात्र होतास. सृष्टीच्या प्रवृत्तिकालीं रजोगुणाचा आश्रय करून तूं ब्रह्मदेव झालास. स्थितिकालीं सत्त्वगुण स्वीकारून तूंच विष्णु झालास. आणि संहार-कालीं तमोगुण धारण करून महादेवहि तूंच बनलास. हे अजा, प्रथम जल निर्माण करून तूं जें त्यांत अमोघ बीज पेरलेंस तेंच चराचर विश्वाच्या रूपानें उगवलें. म्हणूनच तुला जगताचा जनक असें म्हणतात. हरि, हर, ब्रह्मा या त्रिमूर्तींच्या योगानें तूंच आपलें वैभव वाढविलेंस आणि विश्वाच्या उत्पत्ति-स्थिति-संहारांना तूंच कारण झालास.

" स्त्री आणि पुरुष अशी भिन्नलिंगी सृष्टि निर्माण करावी अशी जेव्हां तुला इच्छा झाली, तेव्हां तूंच आपल्या एका भागानें पुरुष आणि दुसऱ्या भागानें स्त्री बनलास. या आद्य जोडप्यालाच उत्पन्न होणाऱ्या साऱ्या सृष्टीचे ' आई-बाप ' असें समजतात. एक सहस्र युगचौकड्यांएवढा तुझा दिवस आणि तेवढीच रात्र तूं शयन करतोस, तेव्हां भूतांचा प्रलय होतो. आणि

तूं जागा होतोस तेव्हां जगताची उत्पत्ति होते. चराचर जगताचा तूं उत्पादक असून तुझा मात्र कोणी अन्य उत्पादक नाहीं. विश्वाचा अंत तूं करतोस, पण तुझा संहर्ता मात्र कोणी नाहीं. जगाचा आदि तूं असून स्वतः मात्र अनादि आहेस. जगाचा ईश्वर तूं, पण तुला मात्र कोणी ईश्वर नाहीं. तूं स्वतःच स्वस्वरूप जाणतोस. स्वतःनेंच स्वतःला उत्पन्न करतोस आणि महाप्रलयापर्यंत आत्म-देहाचें रक्षण करून कृतकृत्य झाल्यावर निजरूप आत्मस्वरूपींच विलीन करतोस.

" तूं सरिता आणि समुद्र यांसारखा द्रवरूप आहेस. पर्वतासारखा घट्ट आहेस. घटादिपदार्थांप्रमाणें इंद्रियांना गोचर आहेस. परमाणूसारखा सूक्ष्म आहेस. कापसाप्रमाणें हलका आणि डोंगराप्रमाणें अचल. कार्यरूप तसाच कारणरूप. स्वतःच्या इच्छेनुरूप तूं वाटेल तें रूप घेऊं शकतोस. ओंकारा-पासून जिचा उपक्रम, उदात्त, अनुदात्त आणि त्वरित या तीन स्वरांनीं जिचें उच्चारण, ज्योतिष्टोमादि याग जिच्या द्वारें केले जातात आणि स्वर्ग-प्राप्ति हें जिचें फल, अशा वेदवाणीचा तूं जनक आहेस.

" सांख्य स्मृति, पुरुषाला भोग-मोक्षरूप अर्थ साधून देणारी मूलप्रकृति तुलाच मानतात. आणि त्या प्रकृतीचा द्रष्टा कूटस्थ पुरुषहि तुलाच समजतात. अग्निष्वात्तादि पितरांचाहि पिता तूं. इंद्रादि देवांचाहि देव तूं. मायाशबलित पर पुरुषाहूनहि परता तूं. आणि मरीच्यादि प्रजापतींचाहि उत्पादक तूं. यज्ञांतलीं पशु-पुरोडाशादि होमद्रव्यें तूं. यजमान तूं. भोक्ता आणि भोज्य, ज्ञाता आणि ज्ञेय, तसाच ध्याता आणि ध्येयहि तूंच आहेस. "

अशा प्रकारें देवांनीं केलेली सत्य आणि मनोहर स्तुति ऐकून विधाता प्रसन्न झाला आणि देवांना म्हणाला. पुरातन कवीच्या चारी मुखांतून द्रव्य, गुण, क्रिया आणि जाति या भेदांनीं बनलेली परा, पश्यंती, मध्यमा आणि वैखरी अशी चार प्रकारची वाणी स्रवूं लागली. त्याच्या चार मुखांमुळें तिचें चतुर्विधत्व सफल झालें.

" हे महाबलशाली देव हो ! आपापल्या सामर्थ्यानें आपापले अधिकार सांभाळून असणारे तुम्ही सगळे मिळून आज मजकडे आलांत. मी तुमचें स्वागत करतों. पण आज तुमच्या मुखावर पूर्वीची स्वाभाविक कांति झळकत नाहीं. धुकें पडल्यामुळें नक्षत्रांचें तेज मंद व्हावें तसे तुम्ही दिसतां. काय बरें याचें कारण ? हा वृत्रहंता इंद्र पहा. याच्या वज्रांतून इंद्रधनुष्याचे

सप्तरंग उधळायचे, पण आज त्याचें तेज शमलें आहे आणि शोभा नष्ट झाली आहे.

" या वरुणाची अवस्था पहा. शत्रूंना कशाहि प्रकारें न आटोपणारा याच्या हातांतला पाश, पण तोच आज गरुडानें झडपलेल्या सापासारखा दीनवाणा दिसतो. कुबेराचीहि स्थिति तीच. हातांत गदा नसल्यामुळें याचा बाहु सांप्रत खांदा तोडलेल्या वृक्षासारखा दिसतो आहे. जणूं शत्रुकृत पराभवाची दुःसह मनोव्यथा तो सुचवीत आहे. यमाकडे पाहिलें तरी तोच प्रकार ! आपल्या हतप्रभ झालेल्या दंडानें तो भूमि उकरीत आहे. पूर्वीं हा दंड अमोघ होता. ज्याच्यावर आदळेल त्याचा चूरच व्हायचा, पण आज त्यालाच विझलेल्या कोलिताची अवकळा आली आहे. हे बारा आदित्य तर तेज निघून गेल्यामुळें थंड गोळे झाले आहेत. हवें तितकें त्यांच्याकडे टक लावून पाहावें. जणूं हे खरे आदित्य नसून त्यांचीं चित्रेंच आहेत ! तसेच हे वायु. पुढें एखादी टेकडी आली म्हणजे तिला वळसा घालून जातांना प्रवाहाची गति जशी मंद होते, तद्वत् या वायूंची गति स्खलित झाल्यामुळें हे कुंठित झाले आहेत असा तर्क होतो. तीच दशा या अकरा रुद्रांची. पराभवाचा दुःखभार असह्य होऊन यांचे जटाजूट वांकले आहेत. त्यांच्या मस्तकावरची चंद्रकोर लोंबकळत राहिली आहे. तें पाहून असें वाटतें कीं, यांच्या हुंकारांतलें सामर्थ्य सांप्रत नष्ट झालें आहे.

" सामान्य शास्त्रनियम जसे विशेष शास्त्रांनीं बाधित होतात, त्याप्रमाणें कोण्या तरी प्रबल शत्रूकडून पराभव पावून तुम्ही आज आपले अधिकार गमावून बसलां आहां काय ? देवगण हो ! तुम्ही इथें येऊन मजकडून काय अपेक्षा करतां तें निस्संकोच मनानें सांगा. कारण, मी फक्त सृष्टि उत्पन्न करून मोकळा झालों आहें. तिच्या रक्षणाची जबाबदारी तुम्हां देवांवरच आहे."

अशा प्रकारें ब्रह्मदेवाचें भाषण ऐकून इंद्रानें बृहस्पतीला 'तूं बोल' असा आपल्या सहस्र नेत्रांनीं इशारा दिला. इंद्राच्या हजार डोळ्यांपेक्षांहि बृहस्पतीचे दोनच डोळे अधिक देखणे होते. त्यानें विधात्याला हात जोडले आणि बोलायला प्रारंभ केला :

" हे ब्रह्मन् ! तूं बोललास तें सत्य आहे. शत्रूनें आमच्या स्थानांवर

आक्रमण केलें आहे. तूं सर्वांचा अंतर्यामी असल्यामुळें तुला सर्व कांहीं ठाऊकच आहे. प्रभो, तुमच्याकडून वर मिळवून अनावर झालेला तारकासुर चतुर्दश भुवनांचा नाश करण्यासाठीं धूमकेतूसारखा उठला आहे. सर्व देवांना पराभूत करून त्यानें दूर्त आपल्या सेवेला लावलें आहे.

' पुरे तावन्तमेवाऽस्य तनोति रविरातपम् ।
दीर्घिकाकमलोन्मेषो यावन्मात्रेण साध्यते ॥ '

[ हा चंडकिरण सूर्य तारकासुराच्या नगरांत इतकाच उष्ण प्रकाश पाडतो कीं, फक्त त्याच्या सरोवरांतलीं कमळें तेवढींच फुलावीं. ]

' सर्वाभिः सर्वदा चंद्रस्तं कलाभिर्निषेवते ।
नादत्ते केवलां लेखां हरचूडामणीकृताम् ॥ '

[ चंद्र कृष्णपक्षांतहि शंकराच्या मस्तकावर असलेली एक कला सोडून बाकीच्या सर्व कलांनीं त्याला आल्हाद देत असतो. ]

' व्यावृत्तगतिरुद्याने कुसुमस्तेयसाध्वसात् ।
न वाति वायुस्तत्पार्श्वे तालवृन्तानिलाधिकम् ॥ '

[ तारकासुराच्या उद्यानांतलीं फुलें चोरल्याचा आरोप येईल या भीतीनें वाऱ्यानें आपला स्वैर संचार सोडून दिला आहे. पंख्याचा वारा जितका झुळझुळेल तितकाच तो त्याच्याभोंवतीं वाहत असतो. ]

' पर्यायसेवामुत्सृज्य पुष्पसंभारतत्पराः ।
उद्यानपालसामान्यमृतवस्तमुपासते ॥ '

[ वसंतादि ऋतु एकामागून एक येत असतात. प्रत्येक ऋतूंतलीं फुलें वेगवेगळीं असतात. पण तारकासुराच्या नगरींत सगळे ऋतु एकाच कालीं आपापला पुष्पसंभार घेऊन एखाद्या माळ्याप्रमाणें त्याची सेवा करतात. ]

‘ तस्योपायनयोग्यानि रत्नानि सरितां पतिः ।
कथमप्यम्भसामन्तराऽऽनिष्पत्तेः प्रतीक्षते ॥ ’

[ आपल्या उदकाच्या अंतर्भागांत बहुमूल्य रत्नें योग्य परिपाक होऊन निपजतात केव्हां आणि आपण त्यांचा नजराणा तारकासुराला अर्पण करतों केव्हां, अशी सागर नेहमीं वाट पाहत असतो. ]

‘ ज्वलन्मणिशिखाश्चैनं वासुकिप्रमुखा निशि ।
स्थिरप्रदीपतामेत्य भुजङ्गाः पर्युपासते ॥ ’

[ रात्रीच्या वेळीं वासुकि आदि महासर्प फणा उंचावून उभे राहतात आणि आपल्या मस्तकींच्या तेजाळ मण्यांनीं त्याच्या राजमहालांत जिकडे तिकडे प्रकाशच प्रकाश करतात. एखाद्याला वाटावें कीं, हे नाग नसून ठाणदिवेच आहेत. ]

‘ तत्कृतानुग्रहापेक्षी तं मुहुर्दूतहारितैः ।
अनुकूलयतीन्द्रोऽपि कल्पद्रुमविभूषणैः ॥ ’

[ तारकासुरानें आपल्यावर अनुग्रह करावा अशी अपेक्षा धरून इंद्रसुद्धां कल्पवृक्षापासून उत्पन्न झालेले अलंकार आपल्या दूतांकरवीं त्याच्याकडे पाठवितो आणि त्याला अनुकूल करून घेण्याचा प्रयत्न करतो. ]

‘ इत्थमाराध्यमानोऽपि क्लिश्नाति भुवनत्रयम् ।
शाम्येत्प्रत्यपकारेण नोपकारेण दुर्जनः ॥ ’

[ अशा विविध प्रकारें सर्वांकडून आराधना केली जात असतांहि तो त्रिभुवनांना क्लेश देत आहे. जो दुर्जन असतो तो त्याच्यावर उपकार केल्यानें अधिकच उद्दाम होतो. ‘ जशास तसें ’ बनून त्याचा प्रतिकार केला तरच तो शमतो. ]

[ वर दिलेले आठ श्लोक म्हणजे कालिदासाच्या प्रतिभेचे अष्टपैलू आहेत. प्रत्येक श्लोकांत त्या त्या व्यक्तीच्या गुणधर्मांना अनुसरून कवीनें एक एक कल्पना केली आहे. उन्हाळ्याचे दिवस येतात. सूर्य आपल्या सहस्र किरणांनीं तापूं लागतो. बाहेर पडलें कीं, उन्हाचे चटके बसूं लागतात. घरांत बसलें तरी घामाच्या धारा गळूं लागतात. अशा वेळीं आपल्याला वाटतें कीं, सूर्याचा प्रकाश तेवढा मिळावा पण ऊन बाधूं नये. पण ही सुखसोय मनुष्याच्या हातीं आहे का? पौर्णिमेच्या दिवशीं संध्याकाळीं सूर्य अस्ताला जातो न जातो तों इकडे पूर्वक्षितिजावर वाटोळा गरगरीत चंद्र वर वर येत असलेला दिसतो. पाहून मन कसें प्रसन्न होतें! पण दुसऱ्या दिवशीं त्याच वेळीं आशाळभूत नजरेनें तिकडे पाहाल तर अंधाराचें राज्य. दोन घटका उशिरानें चंद्र उगवेल, पण तोहि आपली एक कला गमावून. पुढें पुढें रात्री अधिकाधिक अंधाऱ्या होत जातात आणि चंद्र अधिकाधिक झिजूं लागतो. चोरांना फावतें. रसिक चकोरांचीं मनें उदास होतात. कुमुदें माना टाकतात. सागराच्या लहरी हिरमुसल्या होतात. त्यामुळें माणसाला वाटतें कीं, रात्रभर चांदणें कां असूं नये? सूर्यासारखाच चंद्रहि रोज वाटोळा कां बरें असूं नये? पण निसर्ग या मानवी मनोभावनेची पर्वा करीत नाहीं. जें आणि जसें घडवायचें नियतीनें ठरवलें असेल तें आणि तसेंच घडत राहतें. हिंवाळ्यांतला वारा गरम आणि उन्हाळ्यांतला शीतल असावा असें आपण म्हणतों. वाऱ्यानें घोंघावूं नये, वृक्ष उन्मळूं नयेत, वेलींवरचीं फुलें लुबाडूं नयेत, वादळ उठवूं नये, कुठून तरी पालापाचोळा वाहून आणून आपल्या अंगणांत घालूं नये आणि डोळ्यांत धुळीचे कण खुपवूं नयेत, त्यानें वहावें पण कसें, तर विंझणवाऱ्यासारखें. अत्यंत सुखस्पर्श, अगदीं झुळूझुळू, अशी आपली अपेक्षा असते. पण त्याच्यावर आपली सत्ता नाहीं. वसंतऋतूंत आंब्याच्या झाडाला मोहोर येतो; पण जाईजुई फुलत नाहींत. हिंवाळ्यांत रानभर कुंद बहरतात; पण कमलवनांची दुर्दशा होते. माघांत सुरंगी तर श्रावणांत चांफा. हीं सगळीं फुलें सगळ्यांनाच लोभनीय, पण त्यांचा एकमेळ कधीं होत नाहीं. ‘ गट्टी फूः ’ सुटत नाहीं. मग माणसाला वाटतें कीं, आपण किती दुर्बल आहों, किती परावलंबी आहों! आणि मग त्याला एक प्रकारच्या सूक्ष्म असूयेनें असेंहि वाटूं लागतें कीं, जें अघटित, जें असंभाव्य, तें कोण्या तरी प्रबलाच्या हातून घडलेलें आपण पहावें. प्रत्यक्षांत नाहीं तर निदान कल्पनेंत तरी अनुभवावें. अशा वेळीं कालिदासासारखे कवि पुढें येतात. आणि दुबळ्या मानवी

मनाची ही आशा पूर्ण करतात. वर दिलेल्या श्लोकांत कालिदासानें तारकासुरासारख्या बलोन्मत्त दैत्याला हाताशीं धरून 'असाध्य तें साध्य' करून दाखविलें आहे. अनुष्टुभ् छंदासारख्या लहान छंदांत इतक्या सुंदर कल्पना सुस्पष्टपणें विशद करून दाखविणाऱ्या कालिदासावर रसिकांनीं खरोखर धन्यवादांची पुष्पवृष्टि केली पाहिजे. ]

"ज्या नंदनवनांतील वृक्षांचे पल्लव देवांगना सदयपणें हलक्या हातांनीं तोडून घेत, तेच वृक्ष तारकासुर आज निर्दयपणें तोडून टाकीत आहे. बलात्कारानें हरण करून बंदींत टाकलेल्या सुरसुंदरी, तारकासुर झोपला कीं, हातांत चामरें घेऊन एकीकडे आंसवें गाळीत त्याला विंझणवारा करीत आहेत. सूर्याच्या घोड्यांच्या खुरांनीं भेगाळलेलीं मेरुपर्वताचीं सुवर्णशिखरें उपटून आणून त्यानें आपल्या राजभवनांत क्रीडापर्वत निर्माण केले आहेत. मंदाकिनींतलीं सुवर्णकमलें त्यानें आपल्या सरोवरांत आणून लावलीं आहेत. आणि सांप्रत गंगेमध्यें दिग्गजांच्या डुंबण्यामुळें गढूळ झालेलें पाणी तेवढें शिल्लक राहिलें आहे. तारकासुर केव्हां संचारार्थ निघेल याचा नेम नसल्यामुळें देवांचा विमानमार्ग बंद झाला आहे आणि त्यामुळें त्यांना निरनिराळ्या भुवनांच्या दर्शनाचें सुख मिळेनासें झालें आहे. तो मोठा मायावी आहे. कोणीं यज्ञ आरंभिला तर तो त्यांत विघ्न आणीत नाहीं, तर यजमानानें निरनिराळ्या देवतांच्या उद्देशानें अग्नींत समर्पिलेल्या आहुति, पहातां पहातां अग्निमुखांतून हरण करून नेतो. इतकेंच काय, पण उच्चैःश्रव्यासारखें अश्वरत्न म्हणजे इंद्रानें बहुत काल संपादिलेलें मूर्तिमान् यशच; पण तेंहि त्यानें आज लुबाडून घेतलें आहे.

"सन्निपातज्वरांत उत्कृष्ट औषधेंसुद्धां विफल होतात, त्याप्रमाणें आम्हीं त्या क्रूर तारकासुराच्या विरुद्ध योजलेले सगळे उपाय व्यर्थ ठरले आहेत. श्रीहरीच्या सुदर्शनचक्रावर आमचा भरंवसा. तेंच आमचें आशास्थान. पण तारकासुराच्या कठोर कंठाशीं संघर्ष झाल्यामुळें ज्या कांहीं तेजाच्या ठिणग्या निघाल्या, त्यामुळें तें चक्र नसून त्याच्या गळ्यांत हारच घातला गेला असें वाटलें. तारकासुराच्या हत्तींनीं इंद्राच्या ऐरावताचाहि पराभव केला असून तूर्त आपला दर्पकंडू शमविण्यासाठीं ते पुष्कर, आवर्तक इत्यादि महामेघांवर दंतप्रहार करीत आहेत.

" म्हणून हे प्रभो ! मुमुक्षु जन संसाराचा नाश होण्यासाठीं जसे निवृत्तिधर्माची अपेक्षा करतात, त्याप्रमाणें विपत्तींत पडलेले आम्ही सर्व देव तारकासुराचा संहार करण्यासाठीं कोणी तरी सेनापति निर्माण व्हावा अशी अपेक्षा करतों. त्यानें देवसेनेचें आधिपत्य स्वीकारावें आणि त्याला पुढें करून इंद्रानें शत्रूकडून विजयश्रीला एखाद्या बंदिवान स्त्रीप्रमाणें खेंचून आणावी. "

अशा रीतीनें बृहस्पतीचें भाषण संपल्यावर ब्रह्मदेव बोलूं लागला. त्याची ती वाणी गर्जनेनंतर होणाऱ्या जलवृष्टीसारखी सुंदर वाटली.

" देवहो ! हा तुमचा मनोरथ पूर्ण होईल. तुम्हांला सेनापति मिळेल. पण कार्यसिद्धीसाठीं कांहीं काल वाट पाहिली पाहिजे. कारण, तारकासुराला मारण्यासाठीं मी माझ्या स्वतःच्या अंशानें कोणाला निर्माण करणार नाहीं. कारण, तो दैत्य माझ्याच वरामुळें वृद्धिंगत झाला आहे आणि म्हणून मजकडूनच त्याचा नाश होणें बरें नव्हे. आपण वाढविलेला वृक्ष हा विषवृक्ष ठरला तरी तो आपल्याच हातानें तोडूं नये. जेव्हां मी त्याला वर देण्यासाठीं प्रवृत्त झालों तेव्हां त्यानें मजकडून अवध्यत्व मागितलें. मींहि त्याला ' तथास्तु ' म्हटलें. जर मीं त्याला तसा वर दिला नसता, तर आपल्या ब्रह्मरंध्रांतून वर उफाळणाऱ्या तपोग्नीनें त्यानें सर्व लोक जाळून टाकले असते. तो मोठा लढवय्या आहे. रणांगणांत तो पुढें घुसला असतां त्याचा ' घेमार ' कोण सहन करूं शकणार ! शंकराच्या वीर्यानें उत्पन्न झालेल्या पुरुषाशिवाय त्याचा नाश होणें शक्य नाहीं.

" तो महादेव म्हणजेच अमर्याद तेज आहे. तो अविद्येच्या पलीकडे आहे. मला आणि श्रीहरीलाहि त्याच्या माहात्म्याचा अंत लागलेला नाहीं. तेव्हां तुम्ही पार्वतीकडून त्याचें मन जिंकण्याचा प्रयत्न करा. ती सांप्रत त्याच्या सेवेला आहे. पण शंकराचें चित्त रागद्वेषरहित असल्यामुळें तिच्या तारुण्याचा आणि सौंदर्याचा त्याच्यावर परिणाम झाला नाहीं. तेव्हां तो चळेल, त्याच्या अंतरांत कामदेवाचा संचार होईल आणि चुंबक जसा लोखंडाला आपणाकडे खेचून घेतो त्याप्रमाणें पार्वती त्याचें मन आकृष्ट करील, अशी कांहीं तरी खटपट करा. शंकराचें वीर्य धारण करायला पार्वती आणि माझें वीर्य धारण करायला त्याची जलमय मूर्ति या दोघीं-

शिवाय तिसरी कोणी स्त्री समर्थ नाहीं. शंकराचा पुत्र तुमचा सेनापति बनेल आणि आपल्या अतुल पराक्रमानें तारकासुराच्या बंदींत पडलेल्या देवांगनांच्या गुंतलेल्या वेण्या उकलील."

इतकें बोलून ब्रह्मदेव अंतर्धान पावला. नंतर देवहि आपल्या मनांत कर्तव्याचा निश्चय करून निघून गेले. स्वर्गांत जाऊन इंद्रानें देवांचा विचार घेतला आणि कार्यसिद्धीसाठीं उत्कंठित झालेल्या मनानें कामदेवाचें स्मरण केलें. इतक्यांत मदन त्याच्यापुढें प्रगट झाला. सुंदर रमणींच्या रेखीव भुवयांसारखीं टोकें असलेलें धनुष्य, रतीच्या कंकणांचीं चिह्नें उमटलेल्या आपल्या गळ्यांत त्यानें अडकविलें होतें. त्याच्या सांगातीं त्याचा प्रियमित्र वसंतहि होता. आपला आम्रमंजरीचा बाण त्यानें त्याच्या हातांत दिला होता. आल्यावर त्यानें इंद्राला अंजलिसंपुट जोडून नमस्कार केला आणि तो इंद्रासमोर उभा राहिला.

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
८०७२.

# मदनदहन

: : ३

मदन इंद्रसभेंत प्रगट झाल्याबरोबर इंद्रानें सभोंवार बसलेल्या देवांवरची दृष्टि काढली. आपल्या सहस्र नेत्रांनीं तो मदनाकडे पाहूं लागला. राजे किंवा धनी लोक हे प्रायः स्वार्थपर असतात. सेवकजनांविषयींचा त्यांचा आदर स्थिर नसतो. ज्यांच्याकडून काम साधून घ्यायचें असेल त्यांच्याबद्दल ते अधिक प्रेम दाखवितात. इंद्रानें मदनाला मोठ्या गौरवानें आपल्या सिंहासनाच्या जवळ बसवून घेतलें. मदनानें स्वामीच्या या अनुग्रहाचा मस्तक लववून स्वीकार केला आणि तो त्याला एकान्तीं म्हणाला :

" हे लोकस्वभाव जाणणाऱ्या देवेंद्रा ! त्रिजगतामध्यें तुझें जें कांहीं कार्य असेल त्याबद्दल मला आज्ञा कर. प्रसंगीं तूं माझें स्मरण केलेंस, हा मजवर मोठाच अनुग्रह झाला. तुझ्या आज्ञेचें पालन करून तो अनुग्रह वृद्धिंगत करावा अशी माझी इच्छा आहे. घोर तप आचरून कोणीं तुझ्या इंद्रपदाची हांव धरली आहे का ? असेल तर त्याचें नांव सांग. हां हां म्हणतां मी त्याला माझ्या धनुष्यबाणांनीं आकळून घेतों. जन्म-मरणाच्या कष्टांना भ्यालेला कोणी साधक तुझ्या संमतीवांचून मोक्षमार्गावर आरूढ झाला आहे का ? तसें असल्यास मी त्याला सुरसुंदरींच्या नेत्रकटाक्षांनीं जखडबंद करून चिरकाल उभा करीन. तुझ्या एखाद्या शत्रूला साक्षात् शुक्राचार्यांनें जरी नीतिशास्त्र पढविलें असलें तरी विषयवासनारूपी हेर पाठवून मी त्याला जर्जर करीन. पावसाळ्यांत एखाद्या नदीला महापूर

आला कीं तिचे दोन्ही तट धडाधड कोसळून पाडतो त्याप्रमाणें मी तुझ्या त्या शत्रूचे धर्म आणि अर्थ हे उभय पुरुषार्थ उध्वस्त करीन.

" एखादी स्त्री आपल्या सौंदर्यानें तुझ्या मनांत भरली आहे; पण ती जाज्वल पतिव्रता असल्यामुळें तुला लाभूं शकत नाहीं अशी स्थिति आहे का ? तसें असलें तर ती कोण एवढें मला सांग. मी तिला निर्लज्ज बनवून आपण होऊन तुझ्या गळां मिठी घालायला लावीन. तसेंच हे कामुका ! तूं एखाद्या प्रेयसीचा विलासप्रसंगीं कांहीं अपराध केलास का ? आणि त्यामुळें ती तुझ्यावर रुष्ट झाली का ? तूं नम्रपणें क्षमायाचना केली असूनहि तिनें तुझा तिरस्कार केला का ? तिचें नांव मला कळूं दे. मी तिची काया कामज्वरानें संतप्त करून तिला पल्लवांच्या शय्येवर लोळायला लावीन आणि मग तिला आपल्या कठोर वर्तनाबद्दल अनुताप होईल.

" हे वीरा, मजवर प्रसन्न हो. म्हणजे हींचशीं काय पण यांहूनहि अचाट कर्में मी करून दाखवीन. तुझें वज्र शत्रुसंहाराच्या कामीं समर्थ आहे हें मी जाणतों. पण त्याला कांहीं काल विश्रांति घेऊं दे. सांप्रत कोणी देवांचा शत्रु प्रबल झाला आहे का ? तो कोण आहे हें मला जर कळलें तर मी आत्मप्रभावानें त्याचें बाहुबल निकामी करून टाकीन आणि स्त्रियांनीं भ्रुकुटिभंग करून पाहिलें तरी जो घाबरेल इतका भित्रा बनवीन. पुष्प हें माझें आयुध. तें अति नाजूक आहे हें खरें, पण एकटा वसंत जर माझ्या साहाय्याला मिळेल तर तुझ्या कृपेनें मी पिनाकपाणि शंकराचेंसुद्धां धैर्य विगलित करीन. मग इतर धनुर्धाऱ्यांची काय कथा ! "

मदनाचें हें भाषण ऐकून इंद्राला मोठा धीर आला आणि त्यानें दुसऱ्या मांडीवर चढविलेला आपला पाय सिंहासनाच्या खालीं असलेल्या विटेवर ठेवला. आणि शंकराचें मन आकृष्ट करण्याची धमक दाखविणाऱ्या त्या कामदेवाला तो म्हणाला :

" हे मित्रा, तूं जें बोललास तें सर्व तूं खरें करून दाखवशील यांत शंका नाहीं. वज्र आणि तूं हीं माझीं दोन अस्त्रें आहेत. पण वज्र हें तपोबलसंपन्न महात्म्यांवर चालूं शकत नाहीं. तूं मात्र कोठेंहि कुंठित होत नाहींस आणि योजलेलें कार्य हटकून सिद्धीला नेतोस. मला तुझ्या सामर्थ्याचा अजमास आहे. तूं माझ्याइतक्याच योग्यतेचा आहेस हें जाणून

मी तुझी एका मोठ्या कामगिरीवर नेमणूक करीत आहें. शेष हा आपल्या मस्तकीं भूगोल धारण करूं शकतो हें जाणूनच श्रीविष्णूनें त्याला शय्या बनवून आपल्या देहाचा भार त्याच्यावर टाकला. हे मदना, शंकराच्या ठिकाणीं आपला बाण लागू होईल हें सांगून तूं एक प्रकारें आमच्या कार्याचा पत्कर घेतलास असें मी समजतों. तारकासुरानें पराभूत केलेल्या आम्हां देवांचें हेंच एक कार्य आहे हें तूं जाण ! सर्व देव शत्रूचा पराजय करण्यासाठीं शंकराच्या अंशानें उत्पन्न होणाऱ्या एका सेनापतीची अपेक्षा करीत आहेत. आणि समाधिस्थितींत ब्रह्मरूपतेचा अनुभव घेणाऱ्या त्या महादेवाच्या अंतरांत कामविकार उत्पन्न होण्याला तुझा एकच बाण पुरेसा होईल. तर तूं इंद्रियांचा निग्रह करून तप आचरणाऱ्या शंकराला हिमाचलाची कन्या पार्वती आवडेल असें कर. जगतांतल्या सर्व स्त्रियांमध्यें शंकराचें वीर्य धारण करील अशी तीच एक स्त्री आहे असें आम्हांला ब्रह्मदेवानें सांगितलें आहे. सांप्रत पार्वती आपल्या पित्याच्या परवानगीनें हिमाचलाच्या शिखरावर तपश्चर्या करणाऱ्या महादेवाची सेवा करीत राहिली आहे, अशी बातमी माझ्या गुप्तहेरखात्यांतल्या अप्सरांनीं मला दिली आहे.

"यासाठीं तूं ताबडतोब नीघ. देवकार्य सिद्धीला ने. ही गोष्ट इतरांच्या हातून होणारी नाहीं. जमिनींत पडलेल्या बीजाला अंकुर फुटण्यासाठीं जशी पाण्याचीच मुख्यतः गरज असते, त्याप्रमाणें पार्वतीच्या बाबतींत शंकराचें मन आसक्त होण्याच्या कामीं तूंच एकटा कारणीभूत आहेस. देवांना विजय मिळणें हें केवळ शंकराच्या आधीन आहे. आणि तो शंकर तुझ्याच अस्त्रानं साध्य होईल. या कामीं तूंच कुशल आहेस. एखादें असामान्य कर्म—मग तें अप्रसिद्ध असलें तरी—पुरुषाला कीर्ति मिळवून देतें. जगताला वरदान देणारे देव आज तुझे याचक बनले आहेत. कार्यहि लहानसहान नसून त्रिजगताच्या हिताचें आहे. तुझ्या धनुष्यानें तें साधणार आहे. बरें, यांत कोणाचा घातपातहि नाहीं. खरोखर कोणींहि प्रशंसा करावी असा तुझा पुरुषार्थ आहे ! वसंत हा तुझा नित्य सहचर आहे. तो कोणी न सांगतांच तुला साहाय्य करील. अग्नीला मदत कर असें वाऱ्याला कोणीं सांगावें लागत नाहीं."

एखादी पुष्पमाला जशी मस्तक नमवून गळ्यांत घालून घ्यावी त्याप्रमाणें

मदनानें इंद्राची आज्ञा नम्र होऊन स्वीकारली आणि तो जायला निघाला. इंद्रानेंहि ऐरावताची पाठ थोपटून कठिण झालेल्या आपल्या हातानें मदनाला शाबासकी दिली. वेळ पडली तर प्राणांवर उदार होऊनहि मी देवकार्य साधीन अशा दृढ निश्चयानें मदन शंकराच्या आश्रमाकडे जाऊं लागला. पाठोपाठ त्याचा प्रियमित्र वसंत आणि प्रियपत्नी रति हीं दोघेंहि सभय अंतःकरणानें निघालीं.

वसंत हा चित्ताची एकाग्रता करून तप करणाऱ्या ऋषिमुनींना नेहमींच प्रतिकूल असतो. याहि वेळीं त्यानें शंकराच्या तपोवनांत मदनाला अभिमान वाटेल असें आत्मस्वरूप प्रगटवून विस्तारलें. एखादा विषयलुब्ध पति आपल्या साध्वी पत्नीचा त्याग करून परस्त्रीवर आसक्त झाल्यावर बिचारी बायको दुःखानें मूक निःश्वास सोडीत राहते, त्याप्रमाणें सूर्य दक्षिण दिशेचें उल्लंघन करून उत्तर दिशेकडे निघाला आणि दक्षिण दिशा मलयपर्वता-वरून वाहणाऱ्या वायुलहरींच्या रूपानें निःश्वास सोडूं लागली. अशोक वृक्षाला फुलें येण्यासाठीं सुंदर रमणींच्या पदप्रहाराची गरज असते. पण त्या वेळीं आपोआप अशोकाला खोडापासून तों शेंड्यापर्यंत पालवी फुटली आणि फुलें बहरलीं. वसंतानें आम्रमंजरीचे नूतन बाण वृक्षावृक्षावर तयार केले. भ्रमर त्यांच्यावर रुंजी घालूं लागले. जणूं ते भ्रमर नसून वसंतानें प्रत्येक मोहोराच्या तुऱ्यावर मदनाच्या नांवाचीं अक्षरेंच लिहिलीं आहेत कीं काय असें वाटे.

कर्णिकाराचीं फुलें फुललीं. त्यांचा रंग अतिशय गोड होता. पाहिल्यावर मनाला आल्हाद वाटे. पण त्यांना सुगंध मुळींच नव्हता. त्यामुळें रसिकांच्या मनाचा विरस होई. विधाता सृष्टीमध्यें अनेक सुंदर वस्तु निर्माण करतो खरा; पण त्याला अशी एक खोड आहे कीं, प्रत्येक वस्तूंत तो कांहीं ना कांहीं उणें ठेवतोच. एकहि वस्तु सर्वगुणसंपन्न करीत नाहीं. पूर्ण न उमलल्यामुळें चवथीच्या चंद्रकोरीसारखीं दिसणारीं लाल लाल पळसाचीं फुलें वसंताशीं रममाण झालेल्या वनस्थलीरूपी रमणीच्या अंगावर त्यानें केलेल्या नखक्षतांसारखीं शोभूं लागलीं. वसंतशोभेनें भ्रमरांचें काजळ डोळ्यांत घातलें. तमालवृक्षाच्या फुलाचा कुंकुमतिलक लावला, आणि बालसूर्यासारख्या तांबड्या रंगानें आपला आम्रपल्लवरूपी ओठ

रंगवला. हरिणें इत्यादि पशुहि वसंताच्या आगमनानें मत्त झाले. वाऱ्यानें उडणारे प्रियालमंजरींचे पराग डोळ्यांत गेल्यामुळें त्यांना दिसेनासे झालें आणि शुष्कपर्णांचा मर्मरध्वनि उठणाऱ्या रानांतून वाऱ्याच्या उलट गतीनें ते सैरावैरा धांवूं लागले. आम्रमंजरीच्या सेवनानें कोकिळांच्या कंठांत गोडी आली. ते मधुर पंचमालाप काढूं लागले. जणूं त्यांच्या रूपानें मदनच वल्लभांवर रुष्ट झालेल्या मानिनींना सांगत होता कीं, ' बायांनो, आतां राग सोडून द्या. '

किन्नरस्त्रियांचें सौंदर्य खुलूं लागलें. हिवाळा संपल्यामुळें त्यांचे फुटलेले ओठ आतां बरे झाले. त्यांच्या मुखकांतीवर किंचित् पांढुरका वर्ण उमटला आणि त्यांनीं आपल्या मुखावर केलेल्या कातरपानांच्या रचनेमधून घर्मबिंदु चमकूं लागले.

अशा प्रकारें अकालीं हें वसंतवैभव पसरलेलें पाहून शंकराच्या तपोवनांत तप आचरणाऱ्या ऋषिमुनींच्याहि मनाची चलबिचल झाली. प्राणायाम, प्रत्याहार इत्यादि प्रयत्नांनीं त्यांनीं कसेंबसें मन ताब्यांत ठेवलें. रतीला सांगातीं घेऊन मदन त्या प्रदेशांत आला आणि त्यानें धनुष्याला दोरी चढवली, तेव्हां पशु-पक्ष्यांचीं जोडपींसुद्धां समागमाला आतुर होऊन आपल्या अंतरांतला उत्कट प्रेमभाव कृतींनीं व्यक्त करूं लागलीं.

**' मधु द्विरेफः कुसुमैकपात्रे पपौ प्रियां स्वामनुवर्तमानः ।**
**शृङ्गेण च स्पर्शनिमीलिताक्षीं मृगीमकण्डूयत कृष्णसारः ॥ '**

[ भ्रमर फुलाच्या एकाच पात्रांत भ्रमरीच्या मागून पुष्परस पिऊं लागला आणि काळविटाच्या स्पर्शानें हरिणी सुखावून तिचे डोळे मिटले व तो आपल्या शिंगानें तिचा गळा खाजवूं लागला. ]

**' ददौ रसात्पङ्कजरेणुगन्धि गजाय गण्डूषजलं करेणुः ।**
**अर्धोपभुक्तेन बिसेन जायां सम्भावयामास रथाङ्गनामा ॥ '**

[ कमलपरागांनीं सुगंधित झालेलें सरोवरांतलें पाणी हत्तिणीनें आपल्या सोंडेंत ओढून घेऊन प्रेमानें हत्तीच्या तोंडांत घातलें आणि चक्रवाकानें अर्धवट चघळलेला कमलतंतूंचा घास चक्रवाकीच्या मुखवटींत भरविला. ]

[ रसिक लोक प्रेमाच्या रंगांत आले कीं, प्रेयसी पीत असलेल्या मद्याच्या चषकालाच दुसऱ्या बाजूनें आपणहि तोंड लावतात, हें कवीनें कुठें तरी पाहिलेलें दृश्य प्राणिसृष्टींतल्या भ्रमरावर आरोपित केलें आहे. प्रेमी पुरुषाला वाटतें कीं, आपल्या आधीं आपल्या रमणीनें घास घ्यावा. आधीं तिनें प्यावें. आपल्या आधीं तिनें तृप्त व्हावें. तिनें उपभोगल्यावर उरल्यासुरल्यांत तो समाधान मानून घेतो. वस्तुतः प्राणिसृष्टींत आपल्या आधीं दुसऱ्याचा स्वार्थ साधून देण्याची ही प्रवृत्ति नाहीं. पण अंतरांत उगवलेली प्रेमभावना त्यांनाहि या गोष्टी शिकविते. चपल हरिणी याच प्रेमोद्भवामुळें स्पर्शाला आसुसून काळविटाच्या पुढें स्थिर उभी राहिली, आणि त्यानेंहि तिचें मनोगत ओळखून शिंगानें तिचें अंग खाजविलें. हत्तिणीनें पाण्याची चूळ हत्तीच्या मुखांत घातली आणि चक्रवाकानें चघळलेला घास मादीच्या तोंडांत भरविला. हे प्रकार मानवसृष्टींतहि आढळून येतात. कामोन्मत्त ललना आपलें उष्टें अगर मुखांतलें मद्यहि प्रियकराला पाजतात आणि त्यांत प्रेमाचा रस असल्यामुळें प्रियकरालाहि तें गोड वाटतें. चर्वित तांबूल एकमेकांना देणें यांतहि कांहीं अश्लाघ्य वाटत नाहीं. अर्थात् या गोष्टी माणसें प्राण्यांकडून शिकलीं का प्राणी माणसांकडून शिकले हरि जाणे! कालिदास हा ‘ शृंगारैकरस ’ कवि आहे. त्याच्याच शब्दांत सांगायचें तर तो ‘ रतिपंडित ’ आहे. नगरांत राहून मानवी जोडप्यांमधलीं प्रेम-प्रदर्शनें त्यानें जितकीं बारकाईनें अभ्यासिलीं आहेत, तितकेच रानावनांत हिंडून तिर्यग्योनीमधील रतिभावहि पाहून ठेवायला तो विसरला नाहीं. वरच्या दोन श्लोकांवरून ही गोष्ट कळून येते. ]

किन्नरी गाऊं लागली. गाण्याच्या श्रमानें तिचें मुख घामानें डबडबलें. स्वेदामुळें त्याच्यावरची पत्रशोभा विस्कटली. मद्याच्या प्रभावानें डोळे तरळूं लागले. किन्नराला ती अत्यंत आकर्षक दिसली आणि एक गाणें संपून दुसरें सुरू होण्याच्या मध्यंतरांत त्यानें तिचें चुंबन घेतलें. फुलांचे भरघोस गुच्छ हेच ज्यांचे स्तन, आणि हालणारे तांबूस पल्लव हेच ज्यांचे मनोहर ओठ, अशा लतावधू आपल्या खालीं वांकलेल्या शाखांनीं वृक्षांना कवळूं लागल्या.

अशा प्रकारें सर्व सचेतन जीवांच्या अंतरांत कामाचें उद्दीपन करणाऱ्या या काळीं अप्सरांचें गायन ऐकत असूनहि शंकराचें आत्मानुसंधान सुटलें नाहीं.

‘ आत्मेश्वराणां न हि जातु विघ्नाः समाधिभेदप्रभवो भवन्ति । ’

[ ज्यांनीं आपलें मन आणि इंद्रियें आपल्या स्वाधीन ठेवलीं आहेत अशा पुरुषांना कोणतींहि विघ्नें बाधूं शकत नाहींत. ]

डाव्या हातांत सुवर्णदंड घेऊन नंदीश्वर शंकराच्या आश्रमद्वारांत उभा राहून पहारा करीत होता. त्यानें शिवगणांचीहि वृत्ति बिथरलेली पाहिली व नाकावर बोट ठेवून त्यांना दटावलें. त्याच्या भयानें शिवगणच स्तब्ध राहिले असें नाहीं; तर वृक्षहि निष्कंप झाले. भ्रमर निश्चल बसले. पक्ष्यांनीं मौन धरलें. मृगांचा स्वैर संचार बंद पडला. त्याच्या आज्ञेनें सर्व प्राणिमात्र चित्रासारखे निश्चल बसले.

प्रवासाला निघतांना सन्मुख शुक्र जसा वर्ज्य करतात, त्याप्रमाणें मदन नंदीश्वराचा डोळा चुकवून निराळ्याच मार्गानें नागकेशर वृक्षांच्या गर्द राईत असलेल्या शंकराच्या समाधिस्थानीं प्रविष्ट झाला. मदनाचा मरण-काळ जवळ आला होता. आणि म्हणूनच तो शंकरापुढें जाऊन उभा राहिला. एका देवदारु वृक्षाच्या पारावर व्याघ्रचर्म आंथरून शंकर त्यावर बसला होता आणि समाधिसुख अनुभवीत होता. त्यानें वीरासन घातलें होतें. आपला पूर्वदेह सरळ रेषेंत आणला होता. दोन्ही खांदे किंचित् वांकविले होते. आपले दोन्ही हात उताणे करून फुललेल्या कमलांसारखे मांड्यांवर ठेवले होते. जटाजूटाच्या भोंवतीं सर्पांच्या दोऱ्या आवळल्या होत्या. कानांत दुहेरी रुद्राक्षमाला घातली होती. निळ्या कंठाची प्रभा पसरून अधिकच गडद दिसणारें मृगाजिन गळ्याभोंवतीं गांठ देऊन पांघरलें होतें. चमकत्या डोळ्यांतल्या पुतळ्या स्थिर केल्या होत्या. भुंवया निश्चल ठेवल्या होत्या. नेत्रांतलें तेज खालीं पसरत होतें. आपल्या तिन्ही डोळ्यांनीं नासाग्राकडे टक लावून तो बसला होता. त्यानें शरीरांत संचार करणाऱ्या पंचप्राणांचें निरोधन केलें होतें. त्यामुळें तो वर्षाव न करणारा मेघ, लाटा न उठलेला शांत सागर किंवा निवांतींचा निश्चल दीप यांच्यासारखा दिसत होता. नेत्र आणि ब्रह्मरंध्र यांच्यामधून उठणाऱ्या तेजोंकुरांनीं मस्तकींच्या चंद्रकलेची कमलतंतूंसारखी सुकुमार शोभा तो निस्तेज करीत होता. नेत्र, कर्ण इत्यादि नव इंद्रियांचा नव संचार रोधून समाधीच्या अभ्यासानें त्यानें

मन स्वाधीन केलें होतें आणि त्याला हृदयांत स्थिर करून तो अविनाशी परमात्म्याचा आपल्या जीवात्म्यामध्यें साक्षात्कार अनुभवीत होता.

अशा त्या त्रिनयन शंकराला पाहिल्यावर, मनानेंहि याचा पराभव करणें अशक्य आहे अशी मदनाची खात्री झाली. तो घाबरला. त्याचा हात 'वेंबळ' झाला आणि हातांतून धनुष्यबाण केव्हां गळून पडले तेंहि त्याला समजलें नाहीं. इतक्यांत विजया आणि मालिनी या दोन वनदेवतांसह पार्वती तेथें आलेली त्याला दिसली. तिचें तें लोकोत्तर सौंदर्य पाहून कामदेवाला थोडा धीर आला. आपलें मरूं पाहणारें तेज हिच्या सान्निध्यानें थोडेंबहुत सांवरतें आहे असा त्याला अनुभव आला.

पद्मरागमण्याला लाजवितील अशीं अशोकपुष्पें, सोन्याच्या कांतीला मागें टाकतील अशीं कर्णिकारें आणि मोत्यांसारखीं शुभ्र सिंदुवारें यांच्या आभरणांनीं ती सजली होती. पुष्ट स्तनांच्या भारानें ती किंचितशी वांकली होती. अरुणप्रभेसारखी तांबूस साडी ती नेसली होती. भरदार पुष्पगुच्छांचें ओझें तिला पेलत नव्हतें. असें वाटे कीं, पालवीनें बहरलेली ही चालती फिरती वेलच आहे! तिची मेखला म्हणजे जणूं कामदेवाच्या धनुष्याची दुसरी दोरीच. कोणती वस्तु कोठें ठेवावी हें तो जाणत असल्यामुळें त्यानें ती पार्वतीच्या कमरेवर ठेवली होती. बकुळीच्या फुलांची ती बनविलेली होती. चालतांना ती खालीं ओघळत असल्यामुळें पार्वती पुनः पुन्हां तिला आपल्या हातांनीं वर उचलून धरीत होती. मुखांतून निघणाऱ्या निःश्वासांच्या सुगंधाला लुब्ध होऊन एक भुंगा तिच्या टपोऱ्या ओठांभोवतीं फिरत होता. त्याच्या भयानें तिचे डोळे व्याकुळपणें तरळत होते आणि हातांतल्या लीलाकमलानें ती त्याला सारखी वारीत होती.

पार्वती सर्वांगांनीं सुंदर होती. रतीलासुद्धां ती लाजवीत होती. कामानें जेव्हां तिला निरखून पाहिलें तेव्हां जितेंद्रिय शंकराला वश करण्याचें कार्य आपण तडीला नेऊं अशी त्याला पुनश्च आशा वाटूं लागली. एवढ्यांत पार्वतीहि आपल्या भावी पतीच्या द्वारभागीं उभी राहिली आणि शंकरानेंहि ध्यानानें अंतरांत परमात्मरूपाचा साक्षात्कार घेऊन आपली समाधि उतरली. त्यानंतर त्यानें एवढा वेळ नियमन करून ठेवलेला प्राणवायु हळूहळू सोडला. मस्तकीं पृथ्वी धारण करणाऱ्या शेषाला समाधींतून खालीं आलेल्या शंकराचा

भार असह्य झाल्यामुळें त्यानें आपल्या सर्व फणा शंकराच्या तपोवनभूमीच्या खालीं एकत्रित करून तो भाग कसाबसा सांवरून धरला असतां महादेवानें आपलें वीरासन शिथिल केलें.

एवढ्यांत नंदीश्वरानें पुढें येऊन शंकराला प्रणाम केला आणि पार्वती सेवेला आली असल्याचें निवेदन केलें. शंकरानें 'ठीक आहे, येऊं दे,' असें डोळ्यांच्या इशाऱ्यानें सांगितल्यावर नंदीनें तिला आश्रमांत प्रवेश करायला सांगितलें. आंत गेल्यावर तिच्या सख्यांनीं आपल्या हातांनीं पल्लवांसह खुडलेला वासंतिक पुष्पसंभार शंकराच्या चरणांवर प्रणामपूर्वक उधळला. पार्वतीहि मस्तक झुकवून नमस्कार करीत असतां तिच्या केशबंधांतलें कर्णिकारपुष्प गळून पडलें आणि कानावर खोवलेला पल्लव तेथून निसटला. शंकरानें तिला आशीर्वाद दिला कीं, 'तुला एकपत्नीव्रतानें वागणारा पति मिळो.' त्या आशीर्वादांत तथ्य होतें. कारण—

**'न हीश्वरव्याहृतयः कदाचित्पुष्णन्ति लोके विपरीतमर्थम् ।'**

[ महात्म्यांचें वचन कोणत्याहि अवस्थेंत खोटें ठरत नाहीं. ]

पार्वती-परमेश्वरांचा असा परिचय घडत असतांना मदनाला वाटलें कीं, ही संधि ठीक आहे. पतंग जसा अग्निज्वालेवर तसा मदन शंकरावर झडप घालूं पाहत होता. तो शंकराला बाणाचें लक्ष्य करून धनुष्याची दोरी वारंवार छेडूं लागला. नंतर पार्वतीनें सुकलेल्या कमलबीजांची माळ, आपल्या आरक्त हातांनीं शंकराला अर्पण करण्यासाठीं पुढें केली. भगवान् भक्तप्रिय असल्यामुळें त्यानें ती घेण्यासाठीं हात पुढें केला. आणि मदनानें ही संधि नामी आहे असें समजून आपल्या धनुष्यावर मोहनास्त्र चढविलें.

चंद्रोदय झाला कीं, सागर जसा क्षुब्ध होतो तसा शंकरहि त्या शरसंधानानें थोडासा अधीर झाला आणि पार्वतीचा पिकलेल्या तोंडल्यासारखा अधरोष्ठ प्रणयभावनेनें न्याहाळूं लागला. पार्वतीवरहि त्या मदनास्त्राचा परिणाम झाल्यावांचून राहिला नाहीं. कदंब फुलांनीं बहरून यावा तसे तिच्या अंगावर पुलक तरारले. तिचीं सर्वांगें रतिभाव व्यक्त करूं लागलीं. महादेव आपणाकडे साभिलाष दृष्टीनें पाहत आहे हें कळल्यावर ती लाजून चूर झाली आणि आपलें सुंदर मुख तिरपें करून शंकराकडे किंचित् पाठ फिरवून उभी राहिली.

पण शंकर जितेंद्रिय होता. त्यानें आपल्या इंद्रियांचा प्रक्षोभ प्रयत्नानें आवरला आणि एकाएकीं आपलें मन विकृत व्हायला काय कारण झालें असेल, तें पाहण्यासाठीं चौफेर दृष्टि फेकली. तों मदन आपला डावा पाय आकुंचित करून, खांदे नमवून आकर्ण धनुष्य ओढीत आहे आणि आपल्यावर प्रहार करायला उद्युक्त झाला आहे असें त्याला दिसलें. आपला तपोभंग करूं पाहणाऱ्या त्या मदनाचा त्याला अत्यंत राग आला. त्याच्या भ्रुकुटि चढल्या. मुखावर नजर ठरेना आणि एकाएकीं त्याच्या तृतीय नेत्रांतून अग्नीची ज्वाळा उफाळत बाहेर निघाली.

गगनांत संचार करणाऱ्या देवांनीं हा प्रकार पाहिला. ‘ हे प्रभो, राग आवरा, राग आवरा ! ’ असा त्यांनीं टाहो फोडला. पण तो शंकराच्या कानीं पडण्यापूर्वींच त्या आगीच्या लोळानें कामदेवाची राख करून टाकली. मदनाच्या मृत्यूनें रतीवर दुःखाचा घाला पडला. तिला एकदम मूर्च्छा आली. डोळे असून कांहीं दिसेना. कान असून कांहीं ऐकूं येईना. ती निपचित पडली आणि तेवढ्या दोन घटकांच्या काळांत पतिनिधनाची जाणीवहि नष्ट करून मूर्च्छेनें तिच्यावर जणूं उपकारच केले !

वज्रानें जसा उभा वृक्ष मोडून पाडावा, त्याप्रमाणें शंकरानें तपाचें मूर्तिमंत विघ्न अशा कामदेवाला भस्म केल्यावर त्याला वाटलें कीं, मन अविचल राहण्यासाठीं आपण स्त्री-सहवास टाळला पाहिजे. म्हणून तो आश्रमस्थानांतून त्या क्षणीं अंतर्धान पावला.

शंकराच्या गुप्त होण्यानें पार्वतीला भारी दुःख झालें. आपलें सुंदर रूप कुचकामी ठरलें आणि आपल्या मानी पित्याचा शंकराला जामात करण्याचा मनोरथहि विफल झाला, असें तिला वाटलें. मैत्रिणींच्या देखत शंकरानें आपला तिरस्कार केला याबद्दल तिला अधिकच लज्जा उत्पन्न झाली. शून्य आणि उदास होऊन ती मोठ्या कष्टानें आपल्या घराकडे वळली. वाटेंतच तिला हिमाचल भेटला. शंकराच्या क्रोधाला भिऊन पार्वतीचे डोळे मुकुलित झाले आहेत आणि एकंदर तिची अवस्था अनुकंपनीय झाली आहे, हें पाहून त्यानें आपल्या लाडक्या मुलीला उचलून घेतलें. ऐरावत जसा कमलिनीला सोंडेंत धरून जातो, त्याप्रमाणें हिमाचल हा मुलीला घेऊन वेगानें आपल्या निवासस्थानाकडे निघाला.

## रतिविलाप : : ४

त्यानंतर मूर्च्छा येऊन पडलेल्या रतीला नववैधव्यदुःख उपभोगायला लावण्यासाठीं दुर्दैवानें जागृत केलें. सावध झाल्यावर तिनें डोळे उघडून पाहिलें. पण तिचा प्रियकर तिला कुठें आढळेना. तिचे नेत्र अतृप्त राहिले. 'आपल्याला मदनदर्शन आतां अत्यंत दुर्लभ आहे' हें तिला बिचारीला उमगलें नाहीं. 'प्राणनाथ! तुम्ही कुठें दिसत नाहीं. तुम्हांला कांहीं बरं-वाईट झालं नाहीं ना?' असें म्हणत ती उठली. आणि पुढें पाहते तों पुरुषाच्या आकाराचें शंकराच्या क्रोधाग्नीचें भस्म जमिनीवर पसरलेलें तिला दिसलें. त्यामुळें ती पुन्हा विह्वल होऊन धरणीवर कोसळली. धुळीनें तिचें ऊर माखलें. केस अस्ताव्यस्त पसरले. तिचें दुःख पाहून जणूं त्या साऱ्या तपोवनभूमीला आणि तिच्यांतला पशुपक्ष्यांनाहि दुःख झालें. ती अनेक प्रकारें विलाप करूं लागली.

"हे प्रियकरा, तुझा देह किती सुंदर आणि कांतिमान् होता! विलासी पुरुषांच्या शरीराला तुझी उपमा दिली जात असे. पण आज त्याची रक्षा झाली. आणि तरीहि मी अजून जिवंत आहें. तुला मृत्यु आला तरी मी मेलें नाहीं. स्त्रियांचं हृदय कठिण असतं म्हणतात तेंच खरं!"

**'क्व नु मां त्वदधीनजीवितां विनिकीर्य क्षणभिन्नसौहृदः।**
**नलिनीं क्षतसेतुबन्धनो जलसंघात इवासि विद्रुतः॥'**

[ तुझ्या आधीन जीवित असलेल्या मला टाकून तूं कुठें बरें निघून गेलास ? माझ्याविषयींचें तुझें सौहार्द एका क्षणांत कसें नष्ट झालें ? तळ्याला घातलेला बंधारा मोडला म्हणजे कमलिनींभोंवतीं घुटमळणारा जलप्रवाह जसा निचरून वाहून जातो तसें तूं केलेंस आणि कमलिनी जशी जलाविना मलूल होऊन मान टाकते तशी माझी अवस्था झाली. ]

[ या श्लोकांतली नलिनी आणि जलप्रवाह यांची उपमा हृदयंगम आहे. रति मदनाला म्हणते कीं, 'तूं मुलखाचा चंचल आहेस. जसा प्रवाह तसा तूं. प्रेमाचा बांध घालून कोंडून ठेवला तेवढा वेळ माझ्याभोंवतीं घुटमळलास, मला आपल्या मायेच्या जळांत आकंठ बुडवून ठेवलेंस. पण एका क्षणांत तो बांध कसा फुटला कोण जाणे ! तूं माझा सहवास विसरलास आणि चालता झालास. मी उघडी पडलें. माझ्यांतला जीवनरस आटला. कांति हरपली. सुकणें, करपून जाणें हेंच आतां माझें ठरलेलें भवितव्य !' रतीला नलिनीचें उपमान योजून कवीनें अधिक एकहि शब्द न घालतां इतका ध्वन्यर्थ सांगितला आहे. 'पुरुष एका क्षणांत प्रेम विसरतात आणि स्नेहबंध तोडूं शकतात' असा स्त्रियांचा पुरुषांवर जुनाट आरोप आहे. आणि कालिदासानें तोहि येथें एका शब्दांत सूचित केला आहे. ]

एखाद्या वेळीं पत्नी कांहीं तरी अक्षम्य अपराध करते आणि त्या रागानें पति तिचा त्याग करतो. एखाद्या वेळीं असेंहि होतें कीं, पुरुषच कांहीं तरी करूं नये तें करतो व मग त्याला आपल्या पत्नीला तोंड दाखवायची लाज वाटते, म्हणून तो तिच्यापासून दूर होतो. पण आपणां दोघांच्या बाबतींत असा कांहीं प्रकार घडला नाहीं, या अर्थानें रति म्हणते :

'कृतवानसि विप्रियं न मे प्रतिकूलं न च ते मया कृतम् ।
किमकारणमेव दर्शनं विलपन्त्यै रतये न दीयते ॥'

[ हे नाथ ! तुम्हीं माझें कांहीं वाईट केलें नाहीं आणि मींहि तुम्हांला प्रतिकूल होईल असें कांहीं आचरिलें नाहीं. मग विनाकारण तुम्ही मजवर कां रुष्ट झालांत ? मी येथें विलाप करीत असून तुम्ही मला दर्शन कां बरें देत नाहीं ? ]

[ मदन भस्मीभूत झालेला आहे हें माहीत असूनहि तो जिवंत आहे आणि कुठें तरी लपून बसला आहे असें गृहीत धरून रति हें बोलत आहे. प्रिय व्यक्ति गतप्राण होऊन पडलेली पहात असतां नात्याचीं माणसें ती सजीव आहे अशा भावनेनें तिच्याशीं बोलूं लागतात, असें करुण दृश्य अनेक वेळां पहायला सांपडतें. आत्यंतिक प्रेमामुळें हें जाणतें अज्ञान माणूस पांघरतो आणि तें पाहून सहृदयाच्या अंतराला करुणेचा पाझर फुटतो. कालिदासानें रतीच्या ठिकाणीं असें हें लटकें अज्ञान उत्पन्न करून तिला दयनीय बनविलें आहे. ]

पण रति जेव्हां विचार करूं लागली तेव्हां आपण एकदां पतीला छळल्याचें तिला आठवलें आणि ती म्हणते :

**‘ स्मरसि स्मर मेखलागुणैरुत गोत्रस्खलितेषुबन्धनम् ।**
**च्युतकेशरदूषितेक्षणान्यवतंसोत्पलताडनानि वा ॥ ’**

[ “ हे मदना ! पूर्वी एकदां एकान्तांत तूं मला हाक मारीत असतां चुकून दुसऱ्या कोण्या तरी स्त्रीच्या नांवानें मला संबोधलेंस. तें ऐकून मला तुझा राग आला आणि मीं कमरेंतली मेखला काढून तुला बांधून ठेवलें होतें. इतकेंच नव्हे तर कानांतलें कमळ काढून त्यानें तुला खूप मारलें होतें आणि त्यामुळें कमलांतले पराग डोळ्यांत उधळून तुझे डोळे चुरचुरूं लागले होते. या प्रकाराची आठवण होऊन का आज तूं मजवर रागावलास ? ” ]

[ कामिजनांच्या प्रणयकलहांतला एक मनोज्ञ प्रकार कवीनें या श्लोकांत दाखविला आहे. काठीनें मारलें तर वळ उठतो, दगडानें मारलें तर रक्त येतें. पण कमळासारख्या नाजूक वस्तूनें मारल्यावर परागकण डोळ्यांत खुपण्याव्यतिरिक्त दुसरी कसली इजा होणार ! कारण, अशा प्रसंगीं रमणीकडून मिळालेला मार इजा करण्यासाठीं नसतोच मुळीं. तिला फक्त क्षणभर अधिकार गाजवायचा असतो. ]

तुझें मजवरचें प्रेम ही एक भुलावण होती अशा आशयानें ती पुढें म्हणते :

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. ग्रंथालय
अनुक्रम 23644 दि: [illegible]
क्रमांक 99840 नों दि: 30/11/64

'हृदये वससीति मत्प्रियं यदवोचस्तदवैमि कैतवम् ।
उपचारपदं न चेदिदं त्वमनङ्गः कथमक्षता रतिः ॥'

[ 'हे रति ! तूं माझ्या हृदयांत आहेस' असें तूं वारंवार म्हणत होतास आणि मला ते शब्द फार गोड वाटत. पण ती केवळ धूर्त लबाडी होती असें आतां मला वाटतें. तें जर खरें असतें आणि मी तुझ्या हृदयांत असतें तर तूं भस्मीभूत झाल्यावर, एकाहि अवयवाचा दाह न होतां अथवा अंगावर एकहि फोड न येतां जशीच्या तशी मी कशी जिवंत राहिलें असतें ! ]

[ हा मोठ्या चातुर्याचा श्लोक लिहून कवीनें रतीच्या द्वारा मदनाला एक नाजूक पेच टाकला आहे. पेटी जळून खाक झाली आणि आंतली वस्तु मात्र म्हणे सुरक्षित राहिली हें कसें शक्य आहे ? मी बिचारी भोळी, तुझ्यावर विश्वास टाकला. तुझे साखरेनें माखलेले बोल खरे मानले. पतीच्या हृदयांत अढळ स्थान मिळणें यापरतें सतीचें दुसरें सौभाग्य कोणतें, या भावनेनें मी स्वतःला धन्य समजलें. पण ती सारी फसवणूक होती, त्या शब्दांना प्रेमाचा ओलावा नव्हता हें आज मला कळून आलें, असा रतीच्या बोलण्याचा आशय आहे. ]

" तूं प्रेम विसरलास; पण मला माझ्या कर्तव्याला जागलें पाहिजे. परलोकाचा नवा प्रवासी बनून तूं चालता झालास. मीहि तुझ्या मागोमाग पावलावर पाऊल टाकून येईन आणि तुला भेटेन. तुझ्या हातांत हात घालून मीं वस्तुतः यायचें, पण त्या वेळीं मला अचानक मूर्च्छा आल्यामुळें मी तुला अंतरलें. दैवानें मला दगा दिला. केवळ माझेंच नव्हे तर साऱ्या प्राणिमात्रांचें सुख तुझ्या आधीन आहे. कसें तें पहा :

" वर्षाऋतूचे दिवस आहेत. आकाश कृष्ण मेघांनीं भरून आलें आहे. मधून मधून गडगडाटहि होत आहे. भयाण काळी रात्र पसरली आहे. अशा वेळीं नगराच्या मार्गावरून निघालेल्या अभिसारिकांना त्यांच्या प्रियकरांच्या घरीं पोंचवायला तुझ्यावांचून कोण बरें समर्थ आहे ? स्त्रिया मद्य पितील. त्यांचे डोळे लाल होऊन गरगर फिरूं लागतील. बोलतांना पदोपदीं शब्द अडखळतील. भाषणांत असंबद्धता येईल. पण ही मद्याची

नशा तूं नसतांना आतां काय उपयोगाची आहे ! ती केवळ त्यांच्या उपहासाला मात्र कारणीभूत होईल. हे अनंगा ! आपला प्रियमित्र निघून गेला हें समजल्यावर चंद्राला आतां आपला उदय निष्फल वाटेल आणि कृष्णपक्ष संपला तरी तो मोठ्या कष्टानें वाढेल. आंब्याला आलेला हा नवा मोहोर. कसे हिरवे तांबूस त्याचे देठ. कोकिल गाऊं लागला कीं, समजावें कुठें तरी आंबा मोहोरला आहे. तूं होतास तोंवर त्याला आपला बाण बनवीत असस. आतां तो कोणाचा बाण होईल बरें ? या भ्रमरपंक्तीला तूं अनेक वेळां आपल्या धनुष्याची दोरी बनविलें होतेंस. आणि तीच भ्रमरपंक्ति शोकमग्न होऊन करुण स्वरानें माझ्यासारखीच रडत आहे.

"म्हणून हे अनंगा ! तूं पुनश्च ऊठ. तुझ्या मनोहर रूपाचा स्वीकार कर. आणि कामीजनांचें परस्पर मीलन करण्याच्या कामीं मधुर आलाप काढण्यांत पटाईत असलेल्या कोकिळेला आज्ञा कर. मी रुसलें कीं, मस्तक नमवून तूं माझा अनुनय करीत होतास. मी प्रसन्न झालें कीं, मला सकंप आलिंगन देत होतास. या आणि इतर अनेक लीलाविलासांचें स्मरण होऊन माझें हृदय तगमग करीत आहे. हे रतिपंडिता, ऋतूंत फुललेलीं अनेक फुलें गोळा करून स्वतःच्या हातानें माझीं अंगप्रत्यंगें सजविलींस. तो पुष्पसाज अजून माझ्या कायेवर खुलतो आहे. पण तुझें सुंदर रूपडें मात्र कुठें दिसत नाहीं. अळित्याचा रंग तयार करून तूं माझीं पावलें रंगविण्या-साठीं उद्युक्त झालास. उजवें पाऊल रंगवून होतें तोंच निष्ठुर देवांनीं तुला बोलावणें धाडलें. तूं निघून गेलास. पण प्रियकरा, माझें डावें पाऊल अजून तसेंच आहे. तेव्हां त्वरित ये आणि त्याला अळिता लाव.

"हे वल्लभा, स्वर्गामध्यें पुरुषांचें चित्त आकळून घेणाऱ्या अनेक चतुर देवांगना आहेत. त्यांनीं तुला आपल्या जाळ्यांत अडकवण्यापूर्वीं मी अग्निज्वाळांच्या मार्गानें तेथें पोंचेन आणि तुझ्या अंकावर बसेन. मी जरी आतां तुझ्या पाठीमागून स्वर्गांत गेलें तरी 'मदन मृत झाल्यावर रति क्षणभर का होईना जिवंत राहूं शकली. त्याच्या प्राणांबरोबरच हिचें प्राणोत्क्रमण झालें नाहीं,' हा लोकापवाद माझ्या कपाळीं चिकटलाच !

"तूं तर परलोकीं गेलासच. पण तुझ्या मृत शरीराला शेवटचें सजवणें नटवणें हेंसुद्धां माझ्या नशिबीं उरलें नाहीं. इतर लोक मरतात, पण त्यांचें

शरीर तरी कांहीं काळ अवशिष्ट राहतें. पण तूं मात्र प्राणानें आणि शरीरानेंहि एकदमच नष्ट झालास! पुष्पचाप मांडीवर घेऊन वांकडा बाण सरळ करीत असतांना तूं वसंताशीं नर्मविनोदाच्या गोष्टी बोलत असस आणि त्याच वेळीं कटाक्षदृष्टीनें मजकडेहि पाहत असस. या गोष्टी मी कशा बरें विसरूं?

" तुझ्यासाठीं पुष्पधनुष्य निर्माण करून देणारा तुझा जिवाभावाचा सखा वसंत आतां कुठें बरें गेला? उग्र क्रोधी शंकरानें तुझ्यासारखीच त्याचीहि अवस्था केली नसेल ना?"

रतीचा असा हा विलाप ऐकून विषारी बाणानें हृदयाचें विंधान केल्यासारखें वसंताला दुःख झालें. शोकावेगानें घायाळ झालेल्या रतीचें सान्त्वन करण्यासाठीं तो लगेच पुढें झाला. त्याला पाहिल्यावर ती अधिकच रडूं लागली.

**' स्वजनस्य हि दुःखमग्रतो विवृतद्वारमिवोपजायते । '**

[ प्रियजन भेटला कीं, दुःखाला उमाळा फुटतो. जणूं त्याचें दार उघडल्यासारखें होतें. ती त्याला म्हणाली— ]

" वसंता! पहा बरें तुझ्या मित्राची कशी दशा झाली ती! तो गतप्राण झाला आणि त्याच्या देहाची कबूतराच्या रंगासारखी दिसणारी ही राख कणाकणानें वाऱ्यावर उडत आहे! हे मदना! तुझा मित्र तुझ्या दर्शनासाठीं उत्कंठित झाला आहे. त्वरित ये आणि त्याला भेट. स्त्रीवरचें पुरुषाचें प्रेम चंचल असलें तरी मित्रावरचें प्रेम दृढ असतें. कोणत्याहि अवस्थेंत तें कमी होत नाहीं. देवदानवांसह सारें जग तुझ्या नाजूक पुष्पचापाच्या आधीन झालें, तें हा वसंत तुझा साहाय्यकारी झाला म्हणूनच. यासाठीं आपल्या उपकारकर्त्याला तरी दर्शन देणें हें तुला उचित आहे.

" वसंता, पाहिलेंस ना, मीं इतकी काकुळती केली तरी तो परत येत नाहीं. छेः! गेला तो गेलाच!! जसा वाऱ्यानें झडपलेला दिवा. दिवा गेला तरी धूर ओकणारी वात जशी शिल्लक राहते. तशी मी काळतोंडी त्याची भार्या त्याच्या मागून अवशिष्ट उरलें आहें. कामाला मारून मला मागें ठेवणाऱ्या दुर्दैवानें हिंसा केली खरी, पण ती अर्धवट केली. हत्तीनें

एखादा वृक्ष कोसळून पाडल्यावर त्याच्या आधारानें वर चढलेली वेलहि खालीं पडतेच असें आपण पाहतों. मग माझ्या बाबतींत तसें कां बरें झालें नाहीं ?

" असो. झालें तें झालें ! वसंता, तूं आतां तुझ्या मित्राचें एक कार्य कर. सरपण गोळा करून आण. चिता रच. पतिनिधनानें निराधार झालेल्या मला त्या चितेवर ठेवून अग्नि दे आणि मला माझ्या प्राणेश्वराकडे पोंचती कर. सहगमन करणें हा आम्हां स्त्रियांचा धर्मच आहे.

**' शशिना सह याति कौमुदी सह मेघेन तडित्प्रलीयते ।**
**प्रमदाः पतिवर्त्मगा इति प्रतिपन्नं हि विचेतनैरपि ॥ '**

[ " चंद्र मावळला कीं, त्याच्याबरोबरच चंद्रिकाहि नष्ट होते. मेघाबरोबरच वीजहि निघून जाते. प्रमदांनीं पतीचा मार्ग अनुसरावा ही रीत अचेतन सृष्टींतल्या स्त्रियांनींहि अंगीकारलेली आहे. ]

[ कालिदास रतीच्या भावनांशीं येथें किती समरस झाला आहे पहा. आपलें निराळें अस्तित्व विसरून तो तिच्या डोळ्यांनीं जगाकडे पाहत आहे आणि म्हणूनच पतिव्रता स्त्रीच्या भावनेला अनुरूप असे चंद्र-चंद्रिका, मेघ-विद्युल्लता हे दृष्टान्त त्याला सुचले आहेत. अंगावर रोमांच उभारणारे, चित्त गुंग करणारे असे हे दृष्टान्त आहेत. आणि त्या दृष्टान्तांवरून श्लोकाच्या उत्तरार्धांत काढलेलें तात्पर्यहि हृदयंगम आहे. या आणि याच्या पुढच्या तीन-चार श्लोकांचें सौंदर्य कवीच्या तन्मयतेंतून प्रगटलेलें आहे. काव्यविषयभूत व्यक्तीशीं कवि जितका तद्रूप होईल तितकें त्याचें काव्य अधिक मोलाला चढतें याचा हा उत्तम पुरावा आहे. ]

**' अमुनैव कषायितस्तनी सुभगेन प्रियगात्रभस्मना ।**
**नवपल्लवसंस्तरे यथा रचयिष्यामि तनुं विभावसौ ॥ '**

[ " सती जाणाऱ्या स्त्रीला वस्त्राभूषणांनीं नटवितात. पण मला त्याची गरज नाहीं. माझ्या प्रियकराच्या देहाचें हें सुंदर भस्म येथें पडलेलें आहे, तें मी उरोजांना लावीन आणि नवपल्लवांच्या शय्येवर पहुडावें तसें माझें अंग जळत्या चितेंत टाकीन. ]

[ प्रिय व्यक्तीचें निधन झाल्यावर त्याच्या वस्तूंची किंमत वाढते. त्या वस्तूंचें दर्शन प्रियजनाचें वारंवार स्मरण करून देतें. रक्षेची ती किंमत काय? पण ती प्रियपतीची असल्यामुळें रतीला ती 'सुभग' वाटत आहे. देहाला राख फासणें म्हणजे संसाराची आसक्ति सोडणें. ऐहिक भोगांना विटणें. तें करून ती आगींत जळायला निघाली. पल्लवशय्या तिला शीतल वाटली होती ती पतीच्या सान्निध्या-मुळें. आतां अग्निशय्याहि आवडत होती तीहि प्रियसमागमाच्या आशेनेंच. देहाला चटके बसणार होते, फोड उठणार होते, पण त्याची तिला पर्वा नव्हती. वैधव्यदुःखाचा वणवा तिच्या अंतरांत डोंबाळला होता, त्यापुढें लाकडाचा अग्नि कःपदार्थ होता. शिवाय ती 'देहीं देहातीत' झाली होती. तिच्या जीवात्म्यानें पार्थिव शरीराचें बिऱ्हाड सोडलें होतें. असो. आर्यावर्तांतल्या या तेजस्वी सती-धर्मानें कवीचें मन किती आकृष्ट केलें असेल त्याची या श्लोकावरून कल्पना येते. ]

**'कुसुमास्तरणे सहायतां बहुशः सौम्य गतस्त्वमावयोः ।**
**कुरु सम्प्रति तावदाशु मे प्रणिपाताञ्जलियाचिताश्चिताम् ॥ '**

[ "हे वसंता, पूर्वी आम्हां दोघांची पुष्पशय्या निर्माण करण्यासाठीं नाना प्रकारचीं फुलें देऊन तूं साहाय्य केलेंस. आतां माझ्या सहगमना-साठीं चिताहि तूंच रच. विलंब लावूं नको. मी तुला हात जोडतें. ]

**'तदनु ज्वलनं मदर्पितं त्वरयेर्दक्षिणवातवीजनैः ।**
**विदितं खलु ते यथा स्मरः क्षणमप्युत्सहते न मां विना ॥ '**

[ "त्या चितेवर मी आरूढ होईन. मग तूं मला अग्नि दे आणि दक्षिण दिशेहून येणाऱ्या वाऱ्याच्या पंख्यानें तो ताबडतोब भडकेल असें कर. तुला ठाऊकच आहे कीं, माझ्या प्रियकराला मजवांचून क्षणभरहि चैन पडत नाहीं. ]

[ वसंत ऋतु सुरू झाला कीं, दक्षिणेचे वारे वाहूं लागतात हें सर्वांच्या परिचयाचें आहे. कालिदासानें या घटनेचा आपल्या श्लोकांत सूक्ष्म अर्थ व्यक्त करण्यासाठीं उपयोग करून घेतला आहे. रति म्हणते कीं, दक्षिणेच्या वाऱ्यानें अग्नीला झडप. वारा ज्या दिशेला वाहत असतो, त्याच दिशेला अग्निज्वालाहि

जात असतात. दक्षिण ही नरकाची दिशा असून उत्तर ही स्वर्गाची वाट आहे. उत्तरेकडे वळणाऱ्या लाटांच्या लोळाबरोबर मी एकदम स्वर्ग गांठीन, असा रतीच्या सांगण्याचा आशय आहे. कालिदासाची शब्दयोजना बहुतेक ठिकाणीं सहेतुक असते. प्रकृत रसाला पोषक असा एखादा सूक्ष्म अर्थ तिच्यांतून व्यक्त होत असतो. जो विचार करील त्याचे श्रम सार्थकीं लागतात. 'वर्म जाणे तो पारखी.' ]

'इति चापि विधाय दीयतां सलिलस्याञ्जलिरेक एव नौ ।
अविभज्य परत्र तं मया सहितः पास्यति ते स बान्धवः ॥'

[ " एवढें झाल्यावर प्रेततर्पण करण्याच्या प्रसंगीं आम्हां दोघांना उद्देशून एकच जलांजलि समर्पण कर. तें पाणी वांटून न घेतां आम्ही दोघें एकत्रच प्राशन करूं. ]

[ एका ताटांत जेवणें आणि एका भांड्यांत पाणी पिणें हा प्रेमिकांचा आवडता प्रणयप्रकार कवीनें या श्लोकांत सूचित केला आहे. ]

'परलोकविधौ च माधव स्मरमुद्दिश्य विलोलपल्लवाः ।
निवपेः सहकारमञ्जरीः प्रियचूतप्रसवो हि ते सखा ॥'

[ " आणि हे वसंता ! ज्या वेळीं तूं मदनाचें क्रियाकर्मांतर करशील त्या वेळीं मित्राच्या उद्देशानें हालत्या डोलत्या पालवीसह आम्रमंजरी खुडून समर्पण कर. तुझ्या सुहृदाला त्या फार आवडतात." ]

[ मृताला परलोकीं ज्या वस्तु मिळाव्या असें वाटत असेल त्या वस्तु येथें ब्राह्मणाला दान दिल्या जातात. श्राद्धाच्या दिवशीं मृताच्या आवडीचें पक्वान्न करतात. अशा रीतीनें जिवंतपणींच नव्हे तर मेल्यावरहि आपल्या प्रिय व्यक्तीवर प्रेम करून त्याचे नातेवाईक मनःसमाधान उपभोगतात. रतिहि त्याच भावनेनें वसंताला वरील गोष्ट सांगत आहे. वर दिलेल्या पांच श्लोकांत रतीच्या कोमल-करुण भावनांचा आविष्कार कालिदासानें अत्यंत सहानुभूतीनें केला आहे. हा सगळा सर्ग रतीच्या विलापानेंच भरलेला आहे. माणसाला सुखदुःखांचा आवेग असह्य झाला कीं, तो खूप बोलूं लागतो. सुखाच्या वेळीं हसत हसत बोलतो, तर दुःखाच्या वेळीं रडत रडत बोलतो. रतीचेंहि तसेंच झालें आहे. हे बोल स्त्रियांचें मार्दव आणि त्यांचे मनोधर्म अभ्यासून कालिदासानें काव्यबद्ध केले आहेत. ]

रति अशा प्रकारें प्राणत्याग करायला प्रवृत्त झाली असतां एकाएकीं आकाशवाणी झाली आणि आटून गेलेल्या डोहांत तडफडणाऱ्या मासोळीला पहिला पाऊस जसा जीवन देतो, तसें तिनें रतीचें समाधान केलें. आकाशवाणी म्हणते :

" हे मदनभार्ये, तुझा पति आज नष्ट झाला असला तरी थोड्याच कालांत तो पुनश्च भेटेल. ज्या कारणामुळें तो शंकराच्या क्रोधानलांत भस्म झाला तें तूं ऐक. सृष्ट्युत्पत्तीच्या वेळीं ब्रह्मदेवानें सरस्वतीला निर्माण केली आणि तिचें सुंदर रूप पाहून तो तिला भुलला. त्याच्या मनांत अभिलाषा उत्पन्न झाली. थोड्या वेळानें त्यानें आपलें मन आवरलें आणि आपल्या अंतरांत हा विकार कां उत्पन्न झाला म्हणून तो जेव्हां विचार करूं लागला, तेव्हां हें कामदेवाचें अपकृत्य आहे हें त्याला समजलें. लगेच त्यानें मदनाला शाप दिला कीं, ' तूं शंकराच्या तृतीय नेत्रांतल्या आगींत भस्म होशील ! '

" काम नष्ट झाला तर सृष्टिचक्र चालणार नाहीं हें जाणून धर्म नांवाच्या प्रजापतीनें मदनाला उःशाप मिळावा म्हणून विधात्याची प्रार्थना केली. ब्रह्मदेव म्हणाला, ' ठीक आहे. ज्या वेळीं शंकर पार्वतीच्या तपस्येनें प्रसन्न होऊन तिच्याशीं विवाह करील, त्या वेळीं दांपत्यसुखाचा अनुभव घेतल्यावर मदनाला पुनश्च सजीव करील. ' हे रति, ज्याप्रमाणें मेघांत पाणी व वीज या दोन परस्परविरुद्ध वस्तु असतात, त्याप्रमाणें संयमी महापुरुषांच्या अंगांत क्रोध आणि प्रसाद या दोन्ही शक्ति वास्तव्य करीत असतात. म्हणून हे शोभने ! तुला प्रियसमागम अवश्य घडणार आहे. पण त्यासाठीं तुला स्वतःचें शरीर राखलें पाहिजे. ग्रीष्म ऋतूंत सूर्याच्या प्रखर तापानें नदी आटून जाते खरी; पण पावसाळ्यांत तीच दुथडी भरून वाहूं लागते. "

अशा प्रकारें कोण्या तरी अदृश्य भुतानें रतीला देहत्यागाच्या निश्चया-पासून परावृत्त केलें. आणि त्या देववाणीवर विश्वास धरून वसंतानेंहि आपल्या मित्रपत्नीचें युक्तिपूर्ण वचनांनीं सांत्वन केलें. रति आपल्या कृश शरीरानें पतीच्या शापान्ताच्या समयाची वाट पाहत राहिली. निस्तेज झालेली दिवसाची चंद्रकोर रात्र कधीं पडेल अशी वाट पाहत नाहीं का ? तसेंच रतीनें केलें.

## तपःफलोदय : : ५

आपल्या डोळ्यांदेखत मदन भस्म झालेला पाहून पार्वतीचे सारे मनोरथ भग्न झाले. ती आपल्या सुंदर रूपाचा मनापासून तिरस्कार करूं लागली. प्रियकराच्या अंतराला जें रिझवूं शकत नाहीं त्या सौंदर्याचा काय उपयोग ! तिनें मग आपलें मन एकाग्र केलें. मोठें तप करून शंकराला प्रसन्न करून घेण्याची आपली आकांक्षा सफल करावी असें तिनें ठरविलें. शंकरासारखा देवाधिदेव पति हवा असेल आणि त्याचें एकान्तिक, लोभनीय प्रेम मिळवायचें असेल तर तें तपावांचून अन्य कोणत्याहि उपायानें मिळणार नाहीं हें तिला कळून चुकलें.

पार्वतीची एक सखी होती, तिच्या तोंडून मेनेला कळलें कीं, आपली मुलगी शंकरावर अनुरक्त झाली असून त्याच्या प्राप्तीसाठीं ती तप करायला उद्युक्त झाली आहे. तिला तें बरें वाटलें नाहीं. पार्वती नाजूक आहे, वयानें लहान आहे, तेव्हां तिला हें मुनिव्रत झेपणार नाहीं हें भय मनांत धरून मेनाराणी पार्वतीजवळ गेली आणि तिला हृदयाशीं कवटाळून म्हणाली :

" मुली, तुला अभीष्ट अशा इंद्राणी इत्यादि देवता घरींच आहेत. तूं त्यांची इथें राहूनच आराधना कर. तप हें कष्टसाध्य आहे. तुझ्या सुकुमार शरीराला तें झेपायचें नाहीं. शिरीषाचें कोमल फूल भ्रमराचें ओझें सहन करूं शकेल, दुसरा कोणी पक्षी जर त्याच्यावर येऊन बसेल तर तें चुरगळून पडेल. "

पण हा मेनाराणीचा उपदेश निरुपयोगी ठरला. ती पार्वतीचा तपोनिश्चय मोडूं शकली नाहीं.

**‘ क ईप्सितार्थस्थिरनिश्चयं मनः पयश्च निम्नाभिमुखं प्रतीपयेत् ’**

[ वांच्छित वस्तु मिळविण्याचा दृढनिश्चय आणि उताराकडे वाहणारा जलप्रवाह यांना कोण रोधूं शकणार ! ]

एक दिवस योग्य अवसर पाहून पार्वतीनें सखीच्या द्वारा आपला तपस्येचा मनोदय हिमाचलाच्या कानावर घातला व त्याच्याकडे वनवासाला जाण्याची आज्ञा मागितली. सदाशिव पति मिळावा म्हणून आपली कन्या तपाला उद्युक्त झाली आहे हें पाहून हिमाचलाला परम संतोष झाला. त्यानें तिला अनुज्ञा दिली. पार्वती लगेच घरांतून निघाली आणि मागाहून ‘ गौरीशिखर ’ म्हणून प्रसिद्धीस आलेल्या एका पर्वतशिखरावर गेली.

तिचा निश्चय अभेद्य होता. तेथें गेल्यावर तिनें तपाची पूर्वसिद्धता आरंभिली. तिच्या गळ्यांत मोत्यांचा हार होता. तिनें हृदयाला लावलेला चंदन-लेप त्याच्या मोत्यांना लागला होता. तो हार तिनें गळ्यांतून काढून टाकला आणि बालसूर्यासारखें तांबूस वल्कल आपल्या हृदयाभोंवतीं घट्ट आवळून बांधलें. पार्वतीचे केस रेशमासारखे मृदु होते. फुलें माळल्यावर तर ते फारच सुंदर दिसत. आतां तिनें त्यांच्या जटा बांधल्या. पण म्हणून कांहीं तिची मुखशोभा कमी झाली नाहीं. कमळाचें फूल भ्रमरानें जितकें सुरेख दिसतें तितकेंच शेवाळानेंहि दिसतें. ज्या हातांनीं पार्वती आपला अधरोष्ठ रंगवीत होती आणि चेंडू खेळत होती, त्याच हातांनीं ती आतां जपमाळ ओढूं लागली आणि दर्भ तोडतांना बोटें चिरून घेऊं लागली. ती इतकी नाजूक होती कीं, परांच्या गादीवर लोळतांना केसांतलें फूल जर अंगाखालीं चुरगळलें तर तें सुद्धां तिला खुपत असे. पण तीच पार्वती आज उघड्या जमिनीवर निजत होती. आपल्या बाहूची उशी करीत होती. एखादा माणूस प्रसंगानुसार आपलें धन दुसऱ्याकडे ठेव म्हणून ठेवतो व अनुकूल वेळ येतांच ती परत घेतो; त्याप्रमाणें पार्वतीनें जणूं तपाच्या वेळीं जवळ नको या भावनेनें आपल्या दोन वस्तु परतबोलीनें दोघांकडे ठेव म्हणून ठेवल्या. कोमल

वेलींकडे आपलें अंगविक्षेप ठेवले आणि हरिणींच्या जवळ आपली तरल दृष्टि ठेवली. ती निरलस होती. तिनें आपल्या आश्रमाच्या भोंवतालीं झाडें लावलीं आणि घागरी भरून ती स्वहस्तें त्यांना शिंपूं लागली. त्या वृक्षांवरचें तिचें अपत्यवात्सल्य कार्तिकेयाचा जन्म झाल्यावर देखील कमी झालें नाहीं. तपोवनांतल्या हरिणांना ती आपल्या हातानें तृणधान्यांच्या मुठी चारीत होती. त्यामुळें त्यांचा तिच्यावर विश्वास बसला होता. इतका कीं, एखाद्या वेळीं ती त्यांना जवळ घेई आणि मैत्रिणींच्या देखत आपल्या व त्यांच्या डोळ्यांत काय फरक आहे तें ताडून पाही.

ती प्रातःकाळीं स्नान करी. अग्नीला समिधा देई. वल्कलें पांघरी आणि अध्ययनाला बसे. तिची ही व्रतचर्या ऐकून मोठमोठे ऋषि तिच्या दर्शनाला येत. धर्माचरणानें वृद्ध असलेली व्यक्ति वयानें लहान असली तरी लोक तिला मोठेपण देतात. तिच्या तपोवनांतल्या पशूंनीं आपसांतलें जन्मजात वैर सोडलें. ते गुण्यागोविंदानें राहूं लागले. वृक्ष सदा आपल्या मधुर फलांनीं अतिथि-सत्कार करूं लागले. तिच्या आश्रमाभोंवतीं नव्या नव्या पर्णशाला उभारल्या जाऊं लागल्या. प्रत्येक आश्रमांतून होमाग्नि प्रज्वलित दिसूं लागले. तें तपोवन आल्यागेल्याला पावन करूं लागलें.

पण इतकी तपस्या करूनहि तिची इच्छा पूर्ण झाली नाहीं. शंकर तिजवर प्रसन्न झाला नाहीं. मग तिला वाटलें कीं, याहून अधिक कडक तप आचरायला हवें. आणि खरोखर ती आपल्या नाजूक शरीराकडे लक्ष न देतां उग्र तप करूं लागली. थोडा वेळ चेंडू खेळूनहि जी दमत-भागत असे, तिनेंच आतां ऋषींचा कठोर मार्ग अनुसरला. तिची काया जणूं सुवर्णकमलाची बनविली होती. कमलासारखी कोमल आणि सोन्यासारखी कठीण! कडक उन्हाळ्यांत ती आपल्याभोंवतीं चार अग्नि पेटवून हसतमुखानें आपण त्यांच्यामध्यें बसे. पांचवा अग्नि म्हणजे वरून जळत तापत जाणारा सूर्य. डोळे दिपविणाऱ्या त्याच्या प्रखर तेजाला न जुमानतां ती त्याच्याकडे टक लावून पाही आणि अशा प्रकारें तिचें पंचाग्निसाधन चाले. कमल जसें सूर्यकिरणांनीं विकसित आणि तजेलदार दिसतें तसें तिचें मुख सूर्यतापानें मलूल न होतां अधिकच शोभूं लागलें. फक्त तिच्या टपोऱ्या डोळ्यांच्या कडा तेवढ्या हळूहळू काळसर दिसूं लागल्या. न मागतां

कोणीं पाणी आणून दिलें तर तेवढें ती पीत असे. रात्रीच्या वेळीं रसात्मक चंद्राचीं किरणेंच जेवीत असे. वृक्ष जसे जगत तशीच ती जगे.

'निकामतप्ता विविधेन वह्निना नभश्चरेणेन्धनसंभृतेन सा ।
तपात्यये वारिभिरुक्षिता नवैर्भुवा सहोष्माणममुञ्चदूर्ध्वगम् ॥'

[अशा प्रकारें सबंध उन्हाळाभर अग्नि आणि सूर्य यांनीं ती अतिशय तापली, आणि वर्षाऋतूच्या आरंभीं जेव्हां पहिली पावसाची सर पडली तेव्हां पृथ्वीसह तिनें दीर्घ ऊर्ध्व उसासा सोडला.]

[या श्लोकांत कवीनें 'सहोक्ति' अलंकार दाखविला आहे. जनमनाचें रंजन करणाऱ्या दोन वस्तूंचा सहभाव, म्हणजे दोघांनींहि एकाच वेळीं एकच क्रिया करणें. असा प्रकार जेव्हां घडेल तेव्हां सहोक्ति अलंकार होतो. उन्हानें तापून फुटून निघालेल्या भूमीवर पहिला पाऊस पडला कीं, तिच्यांतून वाफारे निघूं लागतात. पार्वतीहि तशीच तापली होती. जेव्हां आकाशांतून जलधारा कोसळूं लागल्या, तेव्हां तिनेंहि वर पाहून उसासा सोडला. भूमीची आणि पार्वतीची उसासा सोडण्याची क्रिया एकाच वेळीं घडली. 'चार महिने उन्हानें करपल्यावर आला एकदांचा पाऊस' अशा अर्थाचा तो उसासा होता.]

'स्थिताः क्षणं पक्ष्मसु ताडिताधराः पयोधरोत्सेधनिपातचूर्णिताः ।
वलीषु तस्याः स्खलिताः प्रपेदिरे चिरेणनाभिं प्रथमोदबिन्दवः ॥'

[ते पहिले पावसाचे थेंब आकाशांतून पडले ते क्षणभर तिच्या पापण्यांवर स्थिरावले. तिथून खालीं टपकून त्यांनीं तिच्या अधरोष्ठावर ताडन केलें. नंतर ते तिच्या घट्ट उरोजांवर पडून चुरगळले गेले. तेथून ते तिच्या पोटाच्या वळयांत शिरले आणि सरतेशेवटीं किती तरी वेळानें ते तिच्या नाभींत शिरले.]

[या श्लोकांत जलबिंदूंच्या पतनाचा क्रम दाखवून कवीनें पार्वतीच्या त्या त्या अवयवांचें वैशिष्ट्यपूर्ण सौंदर्य प्रच्छन्नपणें सूचित केलें आहे. पावसाचे थेंब तिच्या पापण्यांवर क्षणभर स्थिरावले. कां, तर त्या लांब आणि सांद्र होत्या म्हणून. मागून ते तिच्या खालच्या ओठावर तडतडले. कां, तर तो तोंडल्यासारखा

टप्पोरा होता म्हणून. इत्यादि. पाऊस पडूं लागला कीं, 'तड्तड्' 'सड्सड्', असा आवाज होतो ना? हा श्लोक म्हणतांनाहि तसेंच कांहीं तरी वाटतें. कठोर वर्णांचें आधिक्य आणि विसर्गांच्या पुढें घातलेलीं जोडाक्षरें यांनीं या श्लोकालाहि कठिण-पणा आणला गेला आहे.]

**' शिलाशयां तामनिकेतवासिनीं निरन्तरास्वन्तरवातवृष्टिषु ।**
**व्यलोकयन्नुन्मिषितैस्तडिन्मयैर्महातपः साक्ष्य इव स्थिताः क्षपाः ॥'**

[वर्षाऋतूंत पावसाच्या सरीवर सरी कोसळूं लागत. मधून मधून वाराहि घोंगावे. अशा वेळीं भर रात्रीं काजळी अंधारांत पार्वती आश्रमांतून बाहेर निघे आणि एका शिळेवर झोंपून राही. तो वारा आणिं ती अविरत वृष्टि सहन करी. आणि तिच्या उग्र तपस्येला जणूं साक्षीदार असलेल्या त्या पावसाळ्या रात्री, विद्युद्रूपी नेत्रांनीं तिला वारंवार पाहत असत.]

[मनुष्य जरी एकटा एकान्तांत बसला असला तरी त्याच्या बऱ्या-वाईट कृत्यांना सूर्य-चंद्र, वारा-पाणी, दिवस-रात्र इत्यादि देवता साक्षीदार असतात असें एक महाभारतांत वचन आहे. त्याचा आधार घेऊन कवीनें येथें सुंदर उत्प्रेक्षा केली आहे. विजांचें चमकणें म्हणजे रात्रीचें अधूनमधून डोळे उघडणें. त्या कशाला डोळे उघडीत, तर पार्वतीच्या तपाचरणाचा पुरावा करण्याची वेळ आली तर आपण प्रत्यक्ष पाहिलें असल्याची साक्ष देतां यावी म्हणून. हिमालयावरच्या त्या रात्री किती भयाण असत तें कवीनें याच श्लोकांत दाखविलें आहे. पण अशाहि त्या कृष्ण रात्रीच्या अंतरांत पार्वतीच्याबद्दल वात्सल्यमूलक स्नेह होता असा जेव्हां त्या उत्प्रेक्षेच्या सामर्थ्यानें प्रत्यय येतो, तेव्हां वाचकाच्या मनावर भीषणते-ऐवजीं कृपेचा आणि मांगल्याचाच ठसा उमटतो.]

**' निनाय सात्यंतहिमोत्किराऽनिलाः सहस्यरात्रीरुदवासतत्परा ।**
**परस्पराक्रन्दिनि चक्रवाकयोः पुरो वियुक्ते मिथुने कृपावती ॥ '**

[पावसाळा संपल्यावर हिंवाळा येई. गार वारे सुटूं लागत. जिकडे तिकडे बर्फाची वृष्टि होई. थंडी मी म्हणे. अशा वेळीं रात्रीच्या प्रसंगीं

पार्वती पाण्यांत उभी राही, आणि समोर विरहवेदनेनें तळमळून एकमेकांसाठीं आक्रंदन करणाऱ्या चक्रवाकांच्या जोडप्यांकडे सहानुभूतीच्या दृष्टीनें पाहत रात्र घालवी.]

[ऑस्कर वाइल्ड म्हणतो कीं, "I was merely expressing sympathy......If there was less sympathy in the world there would be less trouble in the world." पण सहानुभूति किंवा दया दाखवा म्हणून कोणाला सांगावें लागत नाहीं. समदुःखी व्यक्ति पाहिली कीं, आपोआप अंतरांत सहानुभूति उत्पन्न होते आणि अश्रूंच्या वा उद्गारांच्या द्वारें व्यक्त होते. विरही चक्रवाकांच्या जोडप्याविषयीं पार्वतीला सहानुभूतीचा कळवळा आला, त्याचें कारण ती स्वतः तसलेंच दुःख भोगीत होती. शंकराच्या विरहव्यथेनें तीहि तशीच तळमळून मूक आक्रंदन करीत होती. दुःखितालाच दुःखिताची कणव येऊं शकते. तोच त्याचें अंतर जाणूं शकतो.]

'मुखेन सा पद्मसुगन्धिना निशि प्रवेपमानाधरपत्रशोभिना ।
तुषारवृष्टिक्षतपद्मसम्पदां सरोजसन्धानमिवाकरोदपाम् ॥'

[पार्वती गळ्यापर्यंत पाण्यांत बुडून राहत असे. फक्त तिचें मुख तेवढें वर दिसत असे. थंडीनें तिचें ओष्ठदल थरथरत असे. तिचा निःश्वासवायु दशदिशांना सुगंध पसरीत असे. हिमवृष्टीमुळें सरोवरांतलीं कमलें नष्ट झालेलीं असूनहि तिच्या त्या मुखकमळामुळें त्यांची उणीव दूर होत असे.]

झाडांचीं पिकून गळलेलीं पानें खाऊन राहणें ही तपःक्लेशांची पराकाष्ठा समजली जाते. पण पार्वतीनें तें पर्णभक्षणहि सोडून दिलें. आणि म्हणूनच पुराणवेत्ते लोक तिला 'अपर्णा' म्हणूं लागले. पार्वतीची काया कमलनालासारखी कोमल होती. अग्निवास, जलवास, उपवास इत्यादि व्रतनियमांनीं तिनें ती शुष्क करून टाकली. तिचीं गात्रें अहर्निश क्षीण होऊं लागलीं. ऋषि तप करतात यांत कांहीं आश्चर्य नाहीं. कारण, लहानपणापासून त्यांना क्लेश सहन करायची संवय असते. पण पार्वतीच्या तपानें ऋषींनासुद्धां लाजविलें.

अशा रीतीनें कांहीं काल गेल्यावर एके दिवशीं एक तपोधन पार्वतीच्या तपोवनांत प्रविष्ट झाला. त्यानें पळसाचा दंड हातीं घेतला होता. जटा वाढविल्या होत्या. त्याचें बोलणें मोठें गोड आणि प्रगल्भ होतें. ब्रह्मतेजानें तो तळपत होता. त्याच्याकडे पाहिल्यावर कोणालाहि वाटावें कीं, ब्रह्मचर्यच याच्या रूपानें देहधारी बनलें आहे. पार्वती आतिथ्यशील अशी स्त्री होती. तो येत असलेला दिसतांच हातीं पूजासाहित्य घेऊन ती त्याला सामोरी गेली. पुढें जाऊन तिनें बहुमानपूर्वक त्याचें स्वागत केलें. अंतरांतले रागद्वेष निमाल्यावर महात्म्यांची सर्वत्र समबुद्धि होते. उच्चनीच भेद मावळतात. पण तरीहि एखाद्या महानुभाव पुरुषाला पाहून ते त्याचा अत्यंत गौरवानें सत्कार करतात.

त्या तपोधन तरुणानें पार्वतीनें केलेल्या विधियुक्त पूजेचा स्वीकार केला. थोडा वेळ स्वस्थ बसून वाटचालीचे श्रम घालविल्यासारखें केलें. आणि नंतर पार्वतीकडे सरळ नजरेनें पाहत तो कुशलप्रश्नपूर्वक तिच्याशीं बोलूं लागला :

" हे तपस्विनि ! तुला या तपोवनांत नित्यकर्मासाठीं कुश व समिधा भरपूर मिळतात नो ? या पर्वतावरच्या सरोवरांतलें पाणी स्नानाला योग्य आहे ना ? आपल्या शक्तीचा अदमास पाहूनच तुझें तप चाललें आहे ना ? कारण, शरीर सर्वांत पहिलें धर्माचें साधन आहे. तें सुदृढ असलें तरच इतर साधनांचा अवलंब करतां येईल. तूं पाणी घालून वाढविलेल्या वेलींना सारखी पालवी फुटत राहते ना ? बरेच दिवस अळिता न लावल्यामुळें स्वाभाविक रंगानें दिसणाऱ्या तुझ्या ओठासारखा त्या पालवीचा रंग दिसतो. तुझ्या हातांतले दर्भ प्रेमानें ओढून घेऊन खाणाऱ्या हरिणांवर तुझें मन प्रसन्न आहे ना ? हे कमलनयने ! हीं हरिणें तुझ्याच दृष्टीचें अनुकरण करतात बरें !

" हे पार्वती ! सुंदर आकृति या नेहमीं सदाचरणी असतात असें जें सामुद्रिकवेत्ते सांगतात तें सत्य आहे, हें तुझ्या उदाहरणावरून कळून येतें. हे रूपवति ! महर्षींनींसुद्धां तुझ्या शीलाचें अनुकरण करावें. हा हिमाचल, सप्तर्षींनीं केलेल्या पूजेच्या फुलांनीं आणि स्वर्गांतून पडणाऱ्या गंगाप्रवाहानें जितका पावन झाला नाहीं, तितका तुझ्या निर्मळ चारित्र्यानें झाला आहे.

हिमाचलाचीं दोन्ही कुलें तुझ्या शीलानेंच पुनीत झालीं आहेत. तुझ्या पित्याच्या घरीं तुला अर्थ आणि काम हे सुलभ होते. पण त्यांचा त्याग करून ज्याअर्थीं तूं धर्माचाच सादर स्वीकार केलास, त्याअर्थीं त्रिवर्गांमध्यें धर्मच श्रेष्ठ आहे हें सिद्ध होतें.

"नतगात्रि, पंडितांचें सांगणें असें आहे कीं, सात पावलें एकत्र चालल्यानें सज्जनांची परस्पर मैत्री होते. तूं केलेल्या सत्कारानें मी तुझा बांधव झालों आहें. मला तूं परका समजूं नकोस. मी जातीचा ब्राह्मण आहें, त्यामुळें ज्याची त्याची चौकशी करणें हा माझा स्वभाव आहे. तुझ्याशीं निर्माण झालेल्या बंधुत्वाच्या नात्यानें मी तुला कांहीं प्रश्न विचारणार आहें. जर त्यांत तुझें कांहीं रहस्य नसेल तर तूं माझ्या प्रश्नांचीं उत्तरें दे.

"ब्रह्मदेवाच्या वंशांत तुझा जन्म झाला आहे. तुझें रूप तर तिन्ही लोकांत अत्यंत सुंदर आहे. धनदौलत आणि सुखविलास हे तर तुझेच आहेत. तुझ्या यौवनाला नुकताच कुठें बहर येऊं लागला आहे. इतक्या सर्व गोष्टी अनुकूल असतां तूं हें तप कां करतेस, तें मला सांग. दुसऱ्या कोणीं दुःख दिलें अथवा संकटांत पाडलें, तर मानिनी स्त्रिया त्याचा प्रतिकार करण्यासाठीं कधीं कधीं तप आचरतांना दिसतात. पण विचाराअंतीं तसा कांहीं प्रसंग तुझ्यावर आला असेल असें मुळींच वाटत नाहीं. शोक आणि पराभव तुझ्या वांट्याला कधींहि येणार नाहींत. पित्याच्या घरीं तुझा अपमान कोण करूं शकेल ? तूं तर हिमाचलाची लाडकी लेक आहेस. बरें, बलात्कारानें तुझें हरण करण्याचा कोणीं प्रयत्न केला असेल असें म्हणावें तर तेंहि संभवत नाहीं. कारण, तुझा पिता हिमाचल प्रतापी पर्वतराज आहे. त्याच्याकडून तुला हिरावून नेण्याची अभिलाषा धरणें म्हणजे नागाच्या फणेवरील रत्नासाठीं हात पसरणें आहे. कोण असलें धाडस करील ?

"तूं नवयौवना युवति असल्यामुळें हिऱ्यामोत्यांच्या दागिन्यांनीं मढलेली असायचीस. पण तुझ्या अंगाखांद्यावर तर एकहि अलंकार दिसत नाहीं. तलम वस्त्रांच्या अभावीं तूं वल्कलेंच पांघरलीं आहेस. असें कां बरें ? वल्कलें शोभा देतात खरीं; पण तीं म्हाताऱ्या माणसांना, तरुणांना नव्हेत. आवशीस चंद्र आणि तारका यांनीं शोभणारी रात्र, अरुणोदयाची कधीं तरी अपेक्षा करील काय ? स्वर्ग मिळावा म्हणून तूं तप करीत असशील,

हिमाचलाचीं दोन्ही कुलें तुझ्या शीलानेंच पुनीत झालीं आहेत. तुझ्या पित्याच्या घरीं तुला अर्थ आणि काम हे सुलभ होते. पण त्यांचा त्याग करून ज्याअर्थीं तूं धर्माचाच सादर स्वीकार केलास, त्याअर्थीं त्रिवर्गांमध्यें धर्मच श्रेष्ठ आहे हें सिद्ध होतें.

" नतगात्रि, पंडितांचें सांगणें असें आहे कीं, सात पावलें एकत्र चालल्यानें सज्जनांची परस्पर मैत्री होते. तूं केलेल्या सत्कारानें मी तुझा बांधव झालों आहें. मला तूं परका समजूं नकोस. मी जातीचा ब्राह्मण आहें, त्यामुळें ज्याची त्याची चौकशी करणें हा माझा स्वभाव आहे. तुझ्याशीं निर्माण झालेल्या बंधुत्वाच्या नात्यानें मी तुला कांहीं प्रश्न विचारणार आहें. जर त्यांत तुझें कांहीं रहस्य नसेल तर तूं माझ्या प्रश्नांचीं उत्तरें दे.

" ब्रह्मदेवाच्या वंशांत तुझा जन्म झाला आहे. तुझें रूप तर तिन्ही लोकांत अत्यंत सुंदर आहे. धनदौलत आणि सुखविलास हे तर तुझेच आहेत. तुझ्या यौवनाला नुकताच कुठें बहर येऊं लागला आहे. इतक्या सर्व गोष्टी अनुकूल असतां तूं हें तप कां करतेस, तें मला सांग. दुसऱ्या कोणीं दुःख दिलें अथवा संकटांत पाडलें, तर मानिनी स्त्रिया त्याचा प्रतिकार करण्यासाठीं कधीं कधीं तप आचरतांना दिसतात. पण विचाराअंतीं तसा कांहीं प्रसंग तुझ्यावर आला असेल असें मुळींच वाटत नाहीं. शोक आणि पराभव तुझ्या वांट्याला कधींहि येणार नाहींत. पित्याच्या घरीं तुझा अपमान कोण करूं शकेल ? तूं तर हिमाचलाची लाडकी लेक आहेस. बरें, बलात्कारानें तुझें हरण करण्याचा कोणीं प्रयत्न केला असेल असें म्हणावें तर तेंहि संभवत नाहीं. कारण, तुझा पिता हिमाचल प्रतापी पर्वतराज आहे. त्याच्याकडून तुला हिरावून नेण्याची अभिलाषा धरणें म्हणजे नागाच्या फणेवरील रत्नासाठीं हात पसरणें आहे. कोण असलें धाडस करील ?

" तूं नवयौवना युवति असल्यामुळें हिऱ्यामोत्यांच्या दागिन्यांनीं मढलेली असायचीस. पण तुझ्या अंगाखांद्यावर तर एकहि अलंकार दिसत नाहीं. तलम वस्त्रांच्या अभावीं तूं वल्कलेंच पांघरलीं आहेस. असें कां बरें ? वल्कलें शोभा देतात खरीं; पण तीं म्हाताऱ्या माणसांना, तरुणांना नव्हेत. आवशीस चंद्र आणि तारका यांनीं शोभणारी रात्र, अरुणोदयाची कधीं तरी अपेक्षा करील काय ? स्वर्ग मिळावा म्हणून तूं तप करीत असशील,

तर तुझे श्रम व्यर्थ आहेत. कारण, तुझ्या पित्याचें राज्य हीच स्वर्गभूमि आहे. तरुणींना अत्यंत आवडती अशी वस्तु म्हणजे अनुरूप वर! पण तो मिळवण्यासाठींहि तुला तप करायला नको. रत्न कधीं ग्राहक हुडकायला जात नाहीं. त्याचाच शोध करीत सर्व लोक वणवण हिंडतात.

"तूं जो आतां माझें बोलणें ऐकून उष्ण श्वास सोडलास त्यावरून मला कळून चुकलें कीं, योग्य वर मिळावा म्हणूनच तुझी ही उग्र तपस्या आहे. पण तरीहि माझा संशय फिटत नाहीं. तुझ्यासारख्या लोकोत्तर रूपवतीनें एखाद्या पुरुषाची वर म्हणून अपेक्षा करावी, आणि तो तिला दुर्लभ व्हावा ही गोष्ट मला तर अशक्य दिसते. तूं ज्याच्यावर प्रेम करतेस तो तरुण मोठा दांभिक आणि निर्दय दिसतो. कर्णभूषणांनीं रहित अशा तुझ्या गालांवर अस्ताव्यस्तपणें विखुरलेल्या या केसांच्या पिंगट बटा तो पुढें येऊन आपल्या हातानें मागें सारीत नाहीं, यावरूनच त्याचा कठोरपणा सिद्ध होतो. खरेंच हें मोठें नवल आहे. मुनिव्रतानें तुझी काया फारच रोडावली आहे. जिथें अलंकार घालायचे ते ते अवयव सूर्यतापानें करपले आहेत. दिवसाच्या चंद्रकलेसारखी तूं मलूल दिसतेस. तुला अशा स्थितींत पाहिल्यावर कोणाहि सचेतन प्राण्याच्या मनाला वेदना झाल्यावांचून राहणार नाहींत. ज्याला तूं आपला प्रियकर समजतेस त्याला आपल्या सौंदर्याबद्दल फार घमेंड असली पाहिजे. नाहीं तर तो तुझ्यापासून कधींहि दूर राहिला नसता. धनुष्यासारख्या भुंवया असलेल्या तुझ्या या डोळ्यांना त्यानें आपलें मुख सदा सामोरें ठेवलें असतें.

"गौरि! किती श्रमशील! किती देह झिजवशील! पुरें झालें हें तप! मींहि माझ्या ब्रह्मचर्याश्रमांत खूप तप संपादिलें आहे. त्यांतलें अर्धें मी तुला देतों. त्या तपाच्या बलावर तूं तुझा इच्छित वर मिळवून घे. माझी एवढीच इच्छा आहे कीं, तुझ्या भावी पतीचें नांव काय तें मला कळावें."

त्या बटूचा हा प्रश्न ऐकून पार्वती लज्जित झाली. आपलें मनोगत आपल्याच तोंडानें सांगायला तिला संकोच वाटला. तिनें मग आपल्या सखीला डोळ्यांनीं खूण केली आणि बटूच्या प्रश्नाचें उत्तर देण्याबद्दल सुचविलें. सखी त्याला म्हणाली, "हे साधो! तुला जर कुतूहल असेल तर

ऐक. या पार्वतीनें आपलें कुसुमकोमल शरीर कोणासाठीं तप करून झिजवलें तें मी तुला सांगतें.

" इंद्र, यम, वरुण आणि कुबेर हे चार दिक्पाल हिला मागणी घालीत होते. पण हिनें त्यांना नाकारलें. या सर्वांपेक्षां शंकर श्रेष्ठ असून तो आपल्याला पति मिळावा अशी हिची महत्त्वाकांक्षा आहे. आपलें लोकाधिक सौंदर्य पाहून तो आपल्याला वरील अशी हिची कल्पना होती. पण शंकरानें मदनदहन करून ती फोल ठरविली. शंकर रूपाला भुलणारा नाहीं हें तिला कळून चुकलें. अन्य कोणत्या उपायांनीं तो लाभणें शक्य नाहीं अशी खात्री झाल्यावर हिनें आतां हा तपाचा मार्ग धरला आहे.

" मदनानें शंकरावर जो बाण मारला तो शंकराला न लागतांच त्याच्या तीव्र हुंकारानें परत फिरला आणि ही पार्वती शंकराची सेवा करीत जवळच बसली होती, तिच्या हृदयाला लागला. मदन ताबडतोब दग्ध झाला खरा; पण मरतां मरतां त्यानें हिला घायाळ केलें. पुढें ही परत बापाच्या घरीं आली. पण त्या दिवसापासून तिचा कामज्वर वाढूं लागला. तो शमावा म्हणून अनेक शीत उपचार केले गेले. कपाळीं चंदनाचा लेप लावला. बर्फाचा थर पसरलेल्या शिलाखंडावर नेऊन झोपविलें. पण हिला कशानेंच उतार पडेना. कशांतच सुख लागेना. ती मग वनांत जाई आणि संगीत शिकण्याच्या मिषानें किन्नरस्त्रियांना आपल्याभोंवतीं गोळा करी. त्या गायच्या आधीं ही आपणच शिवचरित्रावरचीं गाणीं गाऊं लागे. गातां गातां शंकराच्या वीरकृत्यांशीं तन्मय झाल्यामुळें तिचा गळा भरून येई, आणि डोळ्यांतून अश्रु पाझरूं लागत. तिची ही शोकाकुल अवस्था पाहून त्या किन्नरीहि रडूं लागत.

" विरहव्यथेमुळें तिला रात्रीं झोंपहि लागत नसे. पहाटेच्या प्रहरीं जरा कुठें डोळा लागला तर लगेच खडबडून जागी होई. ' हे नीलकंठ ! मला टाकून कुठें बरें निघालांत ! ' असें कांहीं तरी बडबडतच ती उठे आणि आपला स्वामी निघून जाऊं नये म्हणून त्याच्या गळां मिठी घालण्याचा अभिनय करी. कधीं कधीं आपल्या हातानें ती शंकराचें चित्र काढी आणि एकान्तीं त्याच्यापुढें बसून त्याला दोष लावी. ' ज्ञानी पुरुष तूं सर्वभूतीं

व्यापून राहिला आहेस आणि सर्वांच्या अंतरांतले भाव जाणतोस असें सांगतात. मग विभो, माझें प्रेम तुला कां बरें कळत नाहीं ? '

" जेव्हां हिला कळलें कीं, शंकराच्या प्राप्तीसाठीं तपावांचून अन्य उपाय नाहीं, तेव्हां हिनें आपल्या पित्याची अनुज्ञा घेतली आणि आम्हां कांहीं मैत्रिणींना सांगातीं घेऊन ती या तपोवनांत आली. किती तरी काळ लोटला या गोष्टीला. आश्रमाभोंवतीं हे जे वृक्ष दिसतात त्यांचीं बीजें पार्वतीनें रुजवलीं आहेत. आज ते वाढले आहेत, विस्तारले आहेत, हिच्या तपाचे साक्षीदार म्हणून उभे आहेत. त्यांच्या डहाळ्या-डहाळ्यांना फळें लटकलीं आहेत. पण पार्वतीच्या मनोरथाला मात्र अद्यापि अंकुरहि फुटलेला दिसत नाहीं. मग फळ दूरच राहिलें. नांगरलेल्या आणि उन्हांत तापलेल्या भूमीवर पावसानें कृपा करावी. त्याप्रमाणें शंकर हिच्यावर कधीं प्रसन्न होतो कोण जाणे ! ही तपानें किती कृश झाली आहे पाहा. हिच्याकडे पाहिलें कीं आमच्या डोळ्यांत अश्रु उभे राहतात. "

पार्वतीचा हृदयगत अभिप्राय सखीनें जसा जाणला तसा तो तिनें बटुवेषधारी शंकराला निवेदिला. तो ऐकून शंकराला होणारा हर्ष त्यानें कसाबसा झांकून ठेवला आणि तो म्हणाला—" पार्वति, तुझी सखी सांगते तें सत्य आहे, का ही माझी तुम्ही दोघींनीं थट्टा चालविली आहे ? "

ब्रह्मचाऱ्याचें बोलणें ऐकून पार्वतीनें आपली जपमाळ बोटांत अडकवली आणि घसा साफ करून ती मोजक्या शब्दांत त्याला म्हणाली— " हे वेदपारंगत बटो, माझ्या मैत्रिणीच्या मुखांतून तूं जें ऐकलेंस तें सगळें सत्य आहे ! हा जीव शंकराच्या समागमाचें उच्चपद मिळविण्यासाठीं उत्सुक झाला आहे. त्याचें साधन म्हणून माझी ही तपस्या आहे. "

**' मनोरथानामगतिर्न विद्यते । '**

[ मनोरथांना अगम्य असें जगांत कोणतेंहि स्थान नाहीं. ]

हें ऐकून तो बटु बोलला :

" मी त्या महादेवाला पुरा ओळखतों. पूर्वीं तूं त्याची जीवेंभावें सेवा करूनहि त्यानें तुझे मनोरथ भग्न केले. आणि हें सगळें माहीत असून पुनश्च तूं त्याच्या नादीं लागली आहेस. त्याची ती अमंगळ वृत्ति जाणून

ग्रं. क्र. ८८५२

तुझ्या या प्रयत्नांना मी अनुमोदन देऊं शकत नाहीं. भलत्याच वस्तूवर प्रेम करणारी तूं मुलगी आहेस. विवाहसमयीं शंकर आपल्या सर्पवेष्टित हातानें, तुझा मंगलसूत्रानें शोभणारा नाजूक हात ग्रहण करील, त्या वेळीं तुला तो स्पर्श सहन होईल का ? हंसाकृतीची खडी छापलेलें तुझें शुभ्र वधूवस्त्र, आणि ज्यांतून रक्ताचे थेंब गळत आहेत असें त्यानें पांघरलेलें हत्तीचें कातडें या दोन वस्तूंचा संयोग होणें योग्य आहे का, याचा तूंच विचार कर. जन्मापासून तुला फुलांनीं आच्छादिलेल्या राजवाड्याच्या चौकांतून चालण्याची संवय, शंकराशीं विवाहबद्ध झालीस कीं, अळित्यानें रंगवलेलीं हीं तुझीं पावलें तुला कुठें टाकावीं लागतील ठाऊक आहे ? इतस्ततः केसांची गुंतवळ पसरलेल्या स्मशानभूमीवर ! ही गोष्ट तुझ्या शत्रूलाहि बरी वाटणार नाहीं ! चंदनाची उटी लावलेलें तुझें हृदय चिताभस्मानें माखलेल्या शिवहृदयाशीं संघटित होणें यापरतें दुसरें दुर्दैव तें कोणतें ! इतकेंच काय पण आणखीहि एक विटंबना तुझ्यापुढें उभी आहे. हत्तिणीवर बसवून तुझी वरात निघायची तिथें शिवासह एका म्हाताऱ्या बैलावर आरूढ होऊन तूं जेव्हां मिरवीत जाऊं लागशील तेव्हां नगरवासी लोक हसून तुझी चेष्टा करतील.

" शंकराच्या समागमाची इच्छा धरून आज दोन व्यक्ति शोचनीय ठरल्या आहेत. एक त्याच्या मस्तकावर राहणारी चंद्रकोर आणि दुसरी त्रिलोकाला नयनानन्द देणारी तूं ! त्या शंकराचें रूप तर कांहीं विचारूंच नका. त्याला दोहोंऐवजीं तीन डोळे. तो कधीं आणि कुठें जन्मला त्याचा तर पत्ताच नाहीं. तो दिगंबर राहतो त्यावरून त्याची धनदौलत किती तें कळून येतें. मुलीचे नातलग वराच्या ठिकाणीं ज्या रूप-गुणांची अपेक्षा करतात त्यांपैकीं एकसुद्धां त्याच्याजवळ नाहीं.

" म्हणून तुला सांगतों कीं, तूं त्याच्या प्राप्तीची आशा सोडून दे. कुठें तूं सुलक्षणी मुलगी आणि कुठें तो अमंगळ शंकर ! स्मशानांतल्या सुळाला कोणी यज्ञस्तंभाला उचित असे वैदिक संस्कार करीत नाहीं. तुझ्यासारख्या सौभाग्यशालिनी कन्येचा त्या मसणवटींत राहणाऱ्या शिवाशीं कधींहि संयोग होतां कामा नये ! "

हें त्या ब्राह्मणाचें प्रतिकूल भाषण ऐकून पार्वतीचा अधरोष्ठ क्रोधानें

थरथरूं लागला. दृष्टींत लाली उत्पन्न होऊन ती तिरळी झाली आणि भुवया वक्र झाल्या. ती त्या बटूला म्हणाली :

" शंकराचें यथातथ्य स्वरूप तुला कळलें नाहीं म्हणून तूं अभद्र कांहीं तरी बरळलास.

'अलोकसामान्यमचिंत्यहेतुकं द्विषन्ति मन्दाश्चरितं महात्मनाम् ।'

[" महात्म्यांचें चरित्र अलौकिक असतें. त्याचा हेतु अचिंत्य असतो. बुद्धिमंद पुरुषांना त्याचें आकलन होत नाहीं, आणि म्हणूनच ते त्यांचा द्वेष करतात !]

" अमंगलाचा निरास करण्यासाठीं अथवा अंतरांतली वैभवाची वासना तृप्त करण्यासाठीं लोक मंगल पदार्थांचें सेवन करतात. जगाचा संरक्षक आणि निरभिलाष अशा त्या शंकराला, तृष्णेनें अंतःकरण कलुषित करणाऱ्या असल्या वस्तूंशीं काय कर्तव्य आहे ! तो दरिद्री असला तरी महान् वैभवाचा निर्माता आहे. स्मशानांत राहत असूनहि त्रिलोकाचा स्वामी आहे. त्याचें रूप भयंकर असलें तरी तो शिव आहे—कल्याणकर्ता आहे, असें पुराणें वर्णितात. त्याला यथार्थपणें जाणणारा कोणीहि नाहीं. अष्टमूर्ति शिव सर्पवेष्टित आहे का अलंकारांनीं विभूषित आहे, तो गजचर्म पांघरतो का रेशमी वस्त्र नेसतो, तो नर-कपालांची माळ गळ्यांत घालतो का मस्तकीं चंद्रकला वागवतो, हें कोणीहि जाणूं शकणार नाहीं.

" चितेंतली राख अपवित्र खरी, पण तीच शंकराच्या अंगाला लागली कीं, ती त्रिभुवनाला पावन करायला समर्थ होते. त्यानें मुक्तहस्तानें चर्चिलेलें तें भस्म शंकर तांडवनृत्य करूं लागला म्हणजे खालीं झडतें आणि तेंच इंद्रादि देव श्रद्धेनें मस्तकीं धारण करतात. तो दरिद्री आहेना, बैलावर बसून जातोना, पण ऐरावतावर आरोहण करणारा इंद्र त्याच्या चरणीं मस्तक नमवतो आणि मुकुटांतल्या कल्पवृक्षाच्या पुष्पपरागांनीं त्याच्या पायांचीं बोटें रंगवितो. "

" तुझा स्वभावच दुष्ट असल्यामुळें तुला शंकराच्या चरित्रांत दोषच दिसले आणि तेच तूं माझ्यापुढें प्रगट केलेस. पण तसें करीत असतांनाहि

'शंकराच्या जन्माचा ठावठिकाणा लागत नाहीं' हें जें तूं म्हणालास तें मात्र योग्य आहे. अरे, सृष्टिकर्ता ब्रह्मदेवहि ज्याच्यापासून उत्पन्न झाला त्याची उत्पत्ति केव्हां आणि कुठें झाली हें कळणें कसें शक्य आहे ? असो. वादविवाद करण्यांत काय अर्थ आहे ? तूं त्याचें हिडीस वर्णन केलेंस तसा जरी तो असला तरी मला चालेल. माझें त्याच्यावर मन जडलें आहे.

'न कामवृत्तिर्वचनीयमीक्षते।'

[" स्वच्छंद वृत्तीचा माणूस लोकापवादाला भीक घालीत नाहीं. ]

" हे सखि, हा बटु पुनः कांहीं तरी असलेंच अमंगल बोलण्याच्या विचारांत दिसतो. पहा त्याचे ओठ स्फुरण पावत आहेत. याला आश्रमाच्या बाहेर घालव.

'न केवलं यो महतोऽपभाषते शृणोति तस्मादपि य स पापभाक्।'

[" महापुरुषांची निंदा करणाऱ्यालाच पाप लागतें असें नाहीं, तर ती निंदा कानांनीं ऐकणारासुद्धां पापी ठरतो.]

" अथवा तो निघून जात नसेल तर मीच कुठें तरी चालती होतें." असें म्हणून पार्वती उठली. तिच्या गतीच्या वेगामुळें पांघरलेलें वल्कल हृदयप्रदेशावरून खालीं घसरलें. इतक्यांत शंकरानें आपलें मूळ स्वरूप प्रगट करून हसत हसत पार्वतीचा हात धरला.

'तं वीक्ष्य वेपथुमती सरसाङ्गयष्टि
निक्षेपणाय पदमुद्धृतमुद्वहन्ती।
मार्गाचलव्यतिकराकुलितेव सिन्धुः
शैलाधिराजतनया न ययौ न तस्थौ॥'

[एकाएकीं शंकर प्रगट झाल्यावर त्याच्या दर्शनानें पार्वती घाबरली. तिच्या गात्रांना कंप सुटला. अंगयष्टि घामानें डबडबली. पुढें टाकण्यासाठीं तिनें उचललेलें पाऊल तसेंच अधांतरीं राहिलें. नदीच्या प्रवाहाच्या मार्गांत डोंगर आडवा आला कीं, ती पुढें जाऊं शकत नाहीं आणि थांबतहि नाहीं, फक्त घोटाळत राहते, तशी पार्वती घुटमळली.]

[ किती सुंदर आणि यथार्थ उपमा! नदी जशी जोरानें खळाळत फेसाळत वाहते, तशीच पार्वती क्रोधानें खवळून निघाली होती. शंकरहि पर्वतप्राय उंच होताच. येथें शंकराचा उन्नतपणा आणि पार्वतीचें क्रोधस्फुरण यांविषयीं एक शब्दहि न लिहितां उपमानांच्या गुणधर्मांच्या द्वारें कवीनें त्या गोष्टी सूचित केल्या आहेत. कालिदासाच्या उपमेचें हें वैशिष्टय पदोपदीं दिसून येतें. ' न ययौ न तस्थौ ' हीं वाक्येंसुद्धां तशींच हृदयंगम आहेत. डोंगर आडवा आला कीं पुढें जाण्याची इच्छा असूनहि नदीची वाट अडते. बरें ती थांबते म्हणावें, तर तसेंहि दिसत नाहीं. ती लगेच मुरडते आणि पाणी वळसा घेऊन तेथल्या तेथें उचंबळूं लागतें. पार्वतीची त्या वेळची स्थिति वर्णन करायला याच्याइतकें अन्वर्थक उपमान कोणतें असूं शकेल! ]

' अद्यप्रभृत्यवनताङ्गि तवास्मि दासः
क्रीतस्तपोभिरिति वादिनि चंद्रमौलौ।
अह्नाय सा नियमजं क्लममुत्ससर्ज
क्लेशः फलेन हि पुनर्नवतां विधत्ते॥ '

[ " हे विनयवती पार्वति, आजपासून मी तुझा दास आहें. तूं मला आपल्या तपानें विकत घेतलें आहेस." असें जेव्हां सदाशिव म्हणाला तेव्हां तिचे इतक्या दिवसांचे तपश्चर्येचे श्रम कुठल्या कुठें नाहींसे झाले. कष्टांना फळ आलें कीं, माणूस त्यांना विसरतो आणि लगेच ताजातवाना होतो. ]

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत.
अनुक्रम 23688 वि: [illegible]
क्रमांक 11280 नों: दि: 30/10/58

# उमाप्रदान : : ६

सदाशिव प्रगट झाल्यावर कांहीं वेळानें पार्वतीनें आपल्या सखीला एकान्तीं बोलावून घेतलें आणि म्हटलें कीं, 'तूं शंकराकडे जाऊन त्याला माझ्या पित्याकडे मजबद्दल मागणी घालायला सांग.' सखीनें तो निरोप शंकराकडे पोंचविला. वसंतऋतूचें आगमन झालें कीं मोहोरलेली आम्रशाखा कोकिलेच्या द्वारा त्याच्याशीं वार्तालाप करते, तोच प्रकार पार्वतीनें अवलंबिला. शंकरानें तिचें वचन मान्य केलें आणि तिला मोठ्या कष्टानें थोडा वेळ मनांतून दूर करून सप्तर्षींचें स्मरण केलें. त्यासरशीं आपल्या प्रभावलयानें आकाश उजळीत अरुंधतीसह ते सप्तर्षि शंकरापुढें प्रगट झाले.

आकाशगंगेचा प्रवाह धो धो वाहत होता. तीरावरच्या कल्पवृक्षांचीं फुलें त्या प्रवाहांत पडून लाटांवर नाचत होतीं. दिग्गजांनीं जलक्रीडा केल्यामुळें त्यांचा मद पात्रांत सांडला होता आणि त्यामुळें तिचें जल सुगंधित झालें होतें. सप्तर्षि एवंगुणविशिष्ट त्या गंगेंत स्नान करून आले होते. त्यांचीं यज्ञोपवीतें मोत्यांचीं होतीं. सोनेरी वल्कलें ते पांघरले होते. त्यांच्या हातांतल्या जपमाळा रत्नांच्या होत्या. त्यांच्याकडे पाहिलें म्हणजे कल्पवृक्षांनींच तपोव्रताची दीक्षा घेतली आहे असें वाटे. ते येत असलेले पाहून सूर्यानें आपल्या रथाचे घोडे त्यांच्या गमनमार्गाच्या खालून घेतले होते, आपला ध्वज त्यांना लागेल म्हणून थोडा नमविला होता आणि प्रणाम करून तो त्यांच्याकडे पाहत राहिला होता. कल्पान्ताच्या वेळीं सगळें जलमय

झालें असतां आदिवराहाच्या सुळक्याला धरून पृथ्वी कशीबशी उभी राहिली होती आणि तिच्यावर त्यांनीं विश्रांति घेतली होती. कल्पारंभीं ब्रह्मदेवानें जगताचा एक भाग निर्माण करून उरलेलें सृजनकार्य यांच्यावर सोंपविलें होतें आणि म्हणूनच पुराणें ' विधाते ' या पदवीनें त्यांना गौरवीत होतीं. पूर्वजन्मींच्या तपस्येचें शुभ फल भोगीत असूनहि ते तपाचरणांत निमग्न होते. वसिष्ठांची भार्या अरुंधती त्या ऋषींच्या मध्यभागीं उभी होती. तिची दृष्टि पतीच्या चरणांवर जडलेली होती. जणूं त्या सप्तर्षींच्या तपःसिद्धीसारखी ती शोभत होती.

स्त्री-पुरुष हा भेद न मानतां शंकरानें त्यांच्याकडे समदृष्टीनें पाहिलें. महापुरुषांचें सच्चरित हें सदैव पूजनीय असतें. तेथें ही स्त्री, हा पुरुष, असा भेद करणें उचित नसतें. अरुंधतीच्या दर्शनानें शंकराच्या मनांत नारी-जातीविषयीं मोठा आदर निर्माण झाला. धार्मिक क्रियांच्या ठिकाणीं पतिव्रता स्त्री हें एक अनुकूल साधन आहे हें कळून आल्यामुळें आपणहि गृहस्थाश्रमी व्हावें, असें त्याला वाटलें. अशा रीतीनें गृहस्थधर्मानें शंकराच्या मनांत पार्वतीविषयीं प्रेमादर निर्माण केल्यावर पूर्वीच्या अपराधानें भ्यालेल्या मदनाला थोडें हायसें वाटलें. शंकराला दया येऊन तो माझें पुनरुज्जीवन करील अशी आशा त्याच्या मनांत अंकुरित झाली.

नंतर सांगवेदाचे प्रवक्ते ते सप्तर्षि जगद्‌गुरु शंकराला प्रणाम करते झाले. भक्तिप्रेमानें त्यांच्या अंगांवर रोमांच उभे राहिले. ते शंकराला म्हणतात :

" हे प्रभो ! आजवर आम्हीं केलेल्या वेदाध्ययन, यज्ञ आणि तप या क्रिया आज सफल झाल्या. तूं जगताचा अध्यक्ष आहेस. तुझें मन मनोरथांनाहि अगम्य आहे. त्या मनांत आज आम्हांला स्थान मिळालें. तूं ज्याच्या हृदयांत वास्तव्य करतोस तो कृतकृत्य पुरुषांमध्यें श्रेष्ठ ठरतो. मग तुझ्या हृदयांत वसति करणाराचें भाग्य काय वर्णावें ! आम्ही सप्तर्षि नेहमींच चंद्र-सूर्य मंडलांच्याहि वर राहतों. पण आज तूं आमचें स्मरण केल्यामुळें आमचें स्थान त्याहूनहि उंच झालें आहे. तूं आमचा बहुमान केल्यामुळें आम्ही स्वतःला धन्य समजतों.

'प्रायः प्रत्ययमाधत्ते स्वगुणेषूत्तमादरः ।'

[" उत्तम पुरुषांनीं आदर केला म्हणजे आपल्या गुणांविषयीं विश्वास उत्पन्न होतो. ]

" तूं आमची आठवण केल्यामुळें आमच्या हृदयांत जें प्रेम उत्पन्न झालें आहे तें कोणत्या शब्दांनीं तुला सांगूं ? तूं प्राणिमात्रांचा अंतर्यामी आहेस. तुला सर्व कांहीं कळतें. तुला आम्ही प्रत्यक्ष पाहतों हें खरें; पण तत्त्वतः तुझें ज्ञान आम्हांला नाहीं. हे देवाधिदेवा ! प्रसन्न हो आणि तुझें स्वरूप आम्हांला कथन कर. तूं बुद्धीच्याहि पलीकडे असल्यामुळें आम्हांला आकळितां येत नाहींस. तूं या सृष्टीचा विधाता, पालनकर्ता अथवा संहारकर्ता हें आम्हांला उघड करून सांग. किंवा ही आमची मोठी प्रार्थना तूर्त राहूं दे. तूं आमचें स्मरण कां केलेंस आणि आम्ही तुझें कोणतें कार्य करूं तेंच आधीं सांग. "

सप्तर्षींची ही विनंती ऐकून शंकरानें स्मित केलें. त्या स्मितानें त्याच्या मस्तकींच्या चंद्रकलेचें मंद तेज वृद्धिंगत झालें. तो म्हणाला :

" मुनिजन हो ! माझे कोणतेहि व्यापार स्वार्थपर नसतात हें तुम्हांला विदितच आहे. पृथ्वी, आप, तेज इत्यादि माझ्या अष्ट मूर्तींनीं पण हेंच सिद्ध केलेलें आहे. ज्याप्रमाणें तृषार्त चातक मेघाकडून वृष्टीची अपेक्षा करतात, त्याप्रमाणें तारकासुरानें पराभूत आणि संत्रस्त केलेले देव मजकडून पुत्रोत्पत्तीची अपेक्षा करीत आहेत. म्हणून, यज्ञकर्ता यजमान अग्नि निर्माण करण्यासाठीं अरणींची अपेक्षा करतो, त्याप्रमाणें पुत्रप्राप्तीसाठीं मी पार्वतीशीं विवाह करूं इच्छितों. याकरितां तुम्ही माझ्या वतीनें हिमाचलाकडे पार्वतीची मागणी घाला.

'विक्रियायै न कल्पन्ते सम्बन्धाः सदनुष्ठिताः ।'

[" कारण, विवाहादि संबंध सज्जनांच्या मध्यस्थीनें केले म्हणजे त्यांत कांहीं बिघाड उत्पन्न होत नाहीं. ]

" उन्नत, स्थिर आणि भूमीचा भार वाहणाऱ्या त्या हिमवंताशीं सोयरीक संबंध जुळून येईल तर मीहि कृतार्थ होईन असें तुम्ही समजा.

कोणत्या शब्दांनीं आणि कोणत्या प्रकारें तुम्हीं कन्या मागावी तें मी तुम्हांला उपदेशूं शकत नाहीं. कारण, साधुजन तुम्हीं घालून दिलेल्या लौकिक, वैदिक आचारांचें पालन करीत असतात. या कार्यांत तुम्हांला अरुंधतीचें साहाय्य होईल. लग्न-कार्याच्या गोष्टींत स्त्रिया मोठ्या चतुर असतात. तेव्हां तुम्ही आतां ' ओषधिप्रस्थ ' नांवाच्या हिमाचलनगरींत जाऊन हें कार्य संपादा. आणि तिथून परत आल्यावर महाकोशी नदीच्या धबधब्याजवळ मला भेटा. "

संयमशील पुरुषांमध्यें अग्रगण्य असलेल्या शंकरानें विवाहाविषयीं एवढी उत्सुकता दाखवलेली पाहून, सप्तर्षींच्या मनांत आपण कुटुंबी झाल्याबद्दल जो एक न्यूनतेचा संकोच होता तो नाहींसा झाला. ' आज्ञा प्रमाण ' म्हणून ते हिमाचलाकडे निघाले. शंकरहि पूर्वी सांगितलेल्या संकेतस्थलीं प्राप्त झाला. नील आकाशांत मनोवेगानें उड्डाण करून ऋषि ओषधिप्रस्थाला आले.

कुबेराच्या धनकनकसंपन्न अलका नगरीपेक्षांहि भरभराटलेलें असें तें नगर होतें. स्वर्गांतल्या अतिरिक्त संपत्ति आणून तें बनविलें आहे असें वाटे. गंगेच्या प्रवाहाचा सभोंवतीं वेढा होता. त्याच्या तटबंदीच्या उंच बुरुजांवर तेजाळ वनस्पतींचा प्रकाश पसरत होता. मोठमोठ्या रत्नांच्या शिलांनीं त्याच्या प्राकारांतली फरसबंदी केलेली होती. तें सुरक्षित असूनहि मनोहर होतें. तेथले हत्ती सिंहांनाहि भारी होते. तेथले घोडे भुयारांतून उत्पन्न झालेले होते. तेथें यक्ष-किन्नरांची वस्ती होती. तेथल्या स्त्रिया म्हणजे वनदेवताच होत्या. तेथल्या घरा-घरांतून नित्य उत्सव चालत. मृदंगादि वाद्यें एकसारखीं दुमदुमत. घराच्या माथ्यावर वळंघून आलेल्या मेघांची गर्जनाहि त्यांतच मिसळे. कित्येक वेळां लोकांना अशी शंका येई कीं, हा घनगर्ज आहे का मृदंगनाद आहे ! जेव्हां लयबद्धता आणि ताल यांचा प्रत्यय येई, तेव्हां त्यांना हा मृदंग वाजत आहे असें ओळखतां येई. पल्लवरूपी वस्त्रखंड हालवणारे कल्पवृक्ष हेच तेथल्या घरांचे स्वतःसिद्ध ध्वज होते. तेथलीं पानगृहें स्फटिकांचीं बनविलेलीं होतीं. रात्रीच्या वेळीं त्यांमध्यें नक्षत्रांचीं प्रतिबिंबें पडत आणि त्यामुळें तेथें फुलें विखुरलीं आहेत असें भासे. आकाश मेघांनीं भरलेलें असलें तरी रात्रीच्या

वेळीं ओषधींच्या प्रकाशानें रस्ता स्वच्छ दिसे. तेथल्या अभिसारिकांना अंधारी रात्र कशी असते तें ठाऊकच नव्हतें. तेथले लोक नित्यतरुण होते. मदनबाधा हाच त्यांचा मृत्यु आणि सुरतश्रमामुळें आलेली झोंप हीच त्यांची मूर्च्छा. तेथें कामुक तरुणांवांचून अन्य कोणी याचक नव्हते. मानिनी स्त्रियांनीं भ्रुकुटिभंग केला, त्यांचे ओठ थरथरूं लागले आणि आपल्या कोमल सुंदर अंगुलींनीं त्या दूर ढकलूं लागल्या कीं, ते मात्र त्यांचा राग शमून त्यांनीं आपल्यावर प्रसन्न व्हावें ही भिक्षा मागत. त्या नगराच्या बाह्यभागीं असलेलें उद्यान म्हणजे सुगंधानें भरलेला गंधमादन पर्वत. तेथें मोठाले कल्पवृक्ष होते आणि त्यांच्या छायेंत पांथस्थ विद्याधर झोप घेत होते.

असें तें दिव्य नगर पाहिल्यावर ‘ आपण येथें न राहतां स्वर्गांतच पुण्यफलाचा भोग घेत बसलों ही आपली फसवणूक झाली ’ असें ऋषींना वाटलें. चित्रांत दाखविलेल्या अग्निज्वालांसारखा त्यांचा जटाभार होता. ते जेव्हां हिमाचलाच्या राजवाड्याच्या रोखानें खालीं उतरूं लागले, तेव्हां नगरवासी जन वर माना करून त्यांच्याकडे पाहूं लागले. एकामागून एक अशा रीतीनें खालीं उतरलेली ती सप्तर्षींची मालिका पाण्यांत सूर्याचीं अनेक प्रतिबिंबें पडावीं तशी दिसली.

ते उतरलेले पाहून हिमाचलानें अर्घ्य-पाद्य इत्यादि पूजासामग्री घेतली आणि आपल्या जड आणि दृढ पदक्षेपानें भूमीला नमवीत तो त्यांना सामोरा गेला. तो उंच होता. गैरिक धातु हाच त्याचा तांबूस अधरोष्ठ. देवदारुवृक्ष हेच त्याचे पुष्ट भुजदंड. मोठमोठ्या शिला हेंच त्याचें विशाल वक्षःस्थळ !

त्यानें सप्तर्षींची विधियुक्त पूजा केली आणि आपण पुढें होऊन मार्ग दाखवीत त्यांना आपल्या अंतःपुरांत आणलें. बसायला वेत्रासनें दिलीं. आणि आपण हात जोडून त्यांना म्हणाला :

“ तुमचें हें अकल्पित आगमन मेघ नसतांना वृष्टि व्हावी अथवा फूल न येतां फळ धरावें तसें मला वाटत आहे. तुमच्या या दर्शनानुग्रहामुळें मी स्वतःला अज्ञ असूनहि ज्ञानी, लोहमय असूनहि सुवर्णमय आणि भूलोकीं असूनहि स्वर्गाधिरूढ समजत आहें. आजच्या दिवसापासून मी प्राण्यांना, काशी, प्रयाग यांच्यासारखा तीर्थरूप झालों. कारण—

' यदध्यासितमर्हद्भिस्तद्धितीर्थं प्रचक्षते । '

[ " ज्या स्थानीं साधुसंत वास्तव्य करतात त्यालाच ' तीर्थ ' असें म्हणतात. ]

" माझ्या मस्तकावर कोसळणारा गंगाप्रवाह, आणि तुमचे चरण धुऊन मीं अंगावर प्रोक्षिलेलें पादवणी या दोन गोष्टींनींच मी स्वतःला पुनीत समजतों. माझ्या जंगम शरीराला आपलें दास्य करायला लावून आणि स्थावर शरीरावर आपलीं पावलें ठेवून तुम्हीं माझ्या उभय देहांवर अनुग्रह केला आहे. तुमच्या आगमनानें मला झालेला हर्ष माझ्या एवढ्या अवाढव्य देहांतहि सामावत नाहीं. तुम्ही देदीप्यमान ऋषिश्रेष्ठ आहां. तुमच्या दर्शनानें माझ्या दऱ्याखोऱ्यांत दडून राहिलेला अंधकारच नष्ट झाला असें नसून, माझ्या हृदयांतलें अज्ञानतमहि दूर झालें आहे. तुम्ही निःस्पृह आहां. तुम्हांला मजकडून कोणत्याहि लाभाची अपेक्षा असणें शक्य नाहीं. जें हवें असेल तें तपोबलानें तुम्ही मिळवूं शकतां. कांहीं मागण्यांच्या इच्छेनें नव्हे; तर केवळ मजवर अनुग्रह करण्यासाठींच तुमचें आगमन झालें आहे, असें मी समजतों.

" तरीहि तुम्ही एखाद्या कार्याविषयीं मला आज्ञा करा. कारण स्वामीनें सेवकाला काम सांगणें हेंच त्याच्यावर प्रसन्न असल्याचें लक्षण होय. हा मी, ही माझी सहचारिणी आणि ही माझी आवडती कन्या पार्वती. यांपैकीं कोणाकडून तुमची कार्यसिद्धि होणार असेल तें सांगा. तुम्हांला इतर धनकनकादि वस्तूंचा लोभ नाहीं आणि त्यासाठीं तुम्ही मजकडे आला नाहीं हें निश्चित ! "

हिमाचलाचें हें भाषण तेथल्या दऱ्यादऱ्यांतून घुमलें. जणूं आपल्या जंगम शरीराच्या मुखानें त्यानें जो आशय प्रगट केला त्यालाच त्यानें स्थावर शरीराच्या मुखानें दुजोरा दिला.

हिमाचलाची ही विनंती ऐकून, सप्तर्षींनीं शंकराचा संदेश सांगण्यासाठीं अंगिरा ऋषीला पुढें केलें. तो म्हणाला :

" हिमाचला ! तूं आतां जें बोललास हें तुला सर्वतोपरी उचितच आहे. तुझीं शिखरें जशीं तसेंच तुझें मनहि उंच आहे. ' स्थावरांमध्यें हिमाचल

ही माझी विभूति आहे ' असें जें भगवंतांनीं सांगितलें तें खरें आहे. विष्णूच्या उदरांत चराचर ब्रह्मांड जसें सांठवलें आहे, तसाच तूंहि असंख्य प्राण्यांचा आधार आहेस. सप्त पातलांसह या पृथ्वीला तूं जर वरच्यावर झेलून धरलें नसतेंस तर कमलनालांसारख्या नाजूक फणांनीं शेषाला तिचा भार वाहतां आला नसता. गंगा-यमुना इत्यादि नद्या तुझ्यावर उगम पावल्या आहेत. त्या धावत जाऊन सागराला भेटतात. सागर आपल्या तरंगरूपी हातांनीं त्यांना दूर लोटीत नाहीं. त्या सरिता जशा जगाचीं पापें धुऊन टाकतात, तशीच तुझी कीर्तिहि अघनाशिनी आहे. विष्णूच्या चरणापासून उत्पत्ति झाल्याबद्दल गंगा स्वतःला जितकी धन्य समजते तितकीच तुझ्या शिखरांवरून वाहण्याबद्दलहि तिला धन्यता वाटते. बलीच्या यज्ञांत श्रीविष्णूनें वामनाच्या रूपांत एकदांच तीन पावलें टाकून त्रिभुवन व्यापलें. तूं मात्र सर्वदाच सर्वव्यापक आहेस. यज्ञभोक्त्या देवांमध्यें स्थान मिळवून तूं मेरुपर्वताचें उंच सोनेरी शिखरहि विफल केलेंस. कारण अति उंच आणि सोन्याचा असूनहि त्याला कांहीं यज्ञांत हविर्भाग मिळत नाहीं. तूं आपलें सारें काठिण्य स्थावर देहाला बहाल केलें आहेस. तुझें हें जंगम शरीर भक्तिनम्र असून सज्जनांच्या सेवाशुश्रूषेचें साधन आहे.

"आतां आम्ही ज्या कारणासाठीं आलों आहों तें ऐक. तुझ्या हिताचेंच आहे तें. तुला कल्याणाचा मार्ग दाखविणें एवढाच आमचा त्यांत संबंध ! आम्हीं भगवान् शंकराचा संदेश सांगण्यासाठीं तुझ्याकडे येणें केलें. तो कसा आहे तें तुला सांगतों. अणिमादि अष्टसिद्धि त्याच्या दारीं राबतात. 'ईश्वर' या नांवानें लोक त्याला हाकारतात. त्यानें आपल्या जटाजूटावर अर्धचंद्र बसविला आहे. मार्गामध्यें घोडे जसे रथ वाहून नेतात त्याप्रमाणें शंकराच्या पृथिव्यादि अष्टमूर्ति एकमेकांचें बल वाढवीत विश्वाची धारणा करतात. योगी लोक त्याला आपल्या अंतरात्म्यामध्यें पाहतात. मन्वादि महात्मे शिवस्वरूप संसारभयनिवर्तक मोक्षपद आहे असें सांगतात.

"विश्वांतल्या सर्व बऱ्या-वाईट कर्मांचा साक्षी असा तो शंभु तुझ्या कन्येचें पाणिग्रहण करूं इच्छितो. आणि तिची मागणी करण्यासाठीं त्यानें आम्हांला धाडलें आहे. वाणी जशी अर्थाशीं निगडित करतात तशी तुझी पार्वती शंकराशीं संयुक्त होऊं दे.

'अशोच्या हि पितुः कन्या सद्भर्तृप्रतिपादिता ।'

[ " आवडती मुलगी चांगल्या नवऱ्या मुलाला दिली कीं तिच्याबद्दलची काळजी दूर होते. ]

" शंकर हा सर्व प्राणिमात्रांचा पिता असल्यामुळें तुझी कन्या सगळ्या विश्वाची माता होईल. सारे देव शंकराला प्रणाम केल्यावर लगेच पार्वतीच्या पावलांना आपल्या मुकुटांतल्या रत्नांच्या प्रभेनें रंजित करतील. पार्वती वधू, तूं दाता, आम्ही याचक आणि शंकर वर यापरतें तुझ्या कुलाचें सौभाग्य तें कोणतें ! तो कोणाची स्तुति करीत नाहीं, पण विश्व त्याची स्तुति करतें. तो कोणापुढें मान वांकवीत नाहीं, पण विश्व त्याच्या पुढें नमतें. अशा त्या जगद्गुरूला कन्या समर्पून तूं त्याचाहि गुरु म्हणजे सासरा हो ! "

अंगिरा ऋषींचें हें बोलणें ऐकून पित्याच्या शेजारीं बसलेली पार्वती, लाजून अधोमुख झाली आणि हातांतल्या कमळाच्यां पाकळ्या मोजूं लागली. हिमाचलाचा मनोमन निश्चय झाला खरा; पण मेनाराणीचा अभिप्राय जाणण्याकरितां त्यानें तिच्या मुखाकडे पाहिलें. कारण—

'प्रायेण गृहिणीनेत्राः कन्यार्थेषु कुटुंबिनः ।'

[ " बहुधा गृहस्थाश्रमी पुरुष मुलीच्या लग्नाच्या बाबतींत भार्येच्या मनालाच प्राधान्य देतात. ]

पतीचें मनोगत जाणून मेनेनेंहि या विवाहाला अनुमति दिली.

'भवन्त्यव्यभिचारिण्यो भर्तुरिष्टे पतिव्रता ।'

[ पतिव्रता स्त्रिया पतीला इष्ट असलेल्या कार्यांत विघ्न करीत नाहींत. ]

शंकरानें ऋषींच्या द्वारें केलेली कन्यायाचना सर्वस्वीं उचित आहे असें मानून हिमाचल पार्वतीला म्हणाला, " मुली ! ये. सदाशिवानें मजपाशीं तुझी भिक्षा मागितली आहे. हे सप्तर्षि त्याचे प्रतिनिधि बनून याचना करायला आले आहेत. आज माझा गृहस्थाश्रम कृतार्थ झाला असें मी समजतों." बापाचें वचन ऐकून पार्वती पुढें आली. हिमाचल ऋषींना म्हणाला, " ही शंकराची भावी पत्नी तुम्हां सर्वांना प्रणाम करीत आहे."

पार्वती लाजत लाजत त्यांच्या पायां पडली. आपला इष्ट हेतु साध्य झालेला पाहून सप्तर्षींनीं हिमाचलाचें अभिनंदन केलें आणि पार्वतीला आशीर्वाद दिले. अरुंधतीनें वात्सल्यभावानें तिला आपल्या मांडीवर बसवून घेतलें. आतां थोड्याच दिवसांनीं आपणाला लाडक्या कन्येचा विरह सोसावा लागणार ही जाणीव उत्पन्न होऊन मेना राणीचे डोळे भरून आले. तेव्हां अरुंधतीनें ' शंकरासारखा जांवई तुला लाभतो हें महद्भाग्य समज ' अशी त्याची महती सांगून तिचा शोक दूर केला.

' विवाहाची तिथि कोणती ? ' असें हिमाचलानें विचारलें. ' आजपासून चवथ्या दिवशीं ' असें सांगून ऋषि आसनांवरून उठले. त्यांनीं हिमालयाचा निरोप घेतला आणि तेथून निघाले ते पुनश्च शंकराजवळ आले. यशस्वी झालेलें कार्य शंकराला निवेदन केलें. आणि शंकराची आज्ञा मिळाल्यावर नभोमार्गानें स्वस्थानीं निघून गेले.

पार्वतीच्या समागमासाठीं शंकर उत्कंठित झाला. ते तीन दिवस त्यानें मोठ्या कष्टानें घालविले. सांसारिक भाव शंकरासारख्या जितेंद्रिय पुरुषाला जेथें कासावीस करतात तेथें इतरांची काय कथा !

# उमापरिणय : : ७

नंतर सप्तर्षींच्या आज्ञेनुसार शुक्लपक्षांत सप्तमस्थान शुद्ध असलेल्या लग्नीं शुभ तिथीवर हिमाचलानें आपल्या आप्तेष्टांना बोलावून पार्वती शंकराला समर्पिली. त्या मंगल प्रसंगीं नगरांत घरोघर पताका तोरणें बांधलीं गेलीं. नागरिक आणि अंतःपुरवासी जन समान प्रेमानें एकत्र मिसळले. जणूं सगळे एकाच कुटुंबांतले लोक. सर्वांनाच आनंद वाटला. नगरांतल्या राजमार्गांवर मंदाराचीं फुलें उधळलीं गेलीं. पट्टवस्त्रांचे ध्वज फडकावले. सोन्याचीं लखलखीत तोरणें बांधलीं. ती शोभा पाहून लोकांना असें वाटलें कीं, आज मेरूचें सुवर्णशिखर सोडून स्वर्ग या ओषधिप्रस्थांत आला आहे.

हिमाचलाला अनेक मुलें होतीं. पण पार्वती आतां थोड्याच कालांत लग्न होऊन पतिगृहीं जाणार असल्यामुळें त्याला आणि मेना राणीला पार्वती जीव-प्राण झाली होती. तीं तिच्याकडे स्नेहाळ दृष्टीनें पाहत होतीं. प्रत्येक वडिलधाऱ्या स्त्री-पुरुषांनीं तिला मांडीवर बसवावी, अलंकार घालावे, आणि पोटभर आशीर्वाद द्यावे असें चाललें होतें. साऱ्या हिमाचलाच्या कुलाचें प्रेम त्याप्रसंगीं पार्वतीच्या ठिकाणीं एकवटलें होतें.

सूर्योदयापासून तिसऱ्या मुहूर्तावर उत्तरा नक्षत्रीं सुवासिनी आणि पुत्रवती स्त्रियांनीं पार्वतीच्या देहावर वैवाहिक अलंकार चढविले. अभ्यंगासाठीं तिला रेशमी वस्त्र नेसविलें. तिच्या मस्तकावर पांढऱ्या मोहऱ्या आणि

दूर्वांकुर टाकले. हातांत एक बाण दिला. त्या वैवाहिक बाणामुळें सूर्यकिरणांनीं वाढणाऱ्या शुक्ल प्रतिपदेच्या चंद्रकलेसारखी ती शोभूं लागली. नंतर तिच्या अंगाला सुगंधी तेल आणि उटणें लावलें. स्नानाला योग्य असें वस्त्र नेसवून स्नानगृहांत नेलें. तेथें मोत्यांची झालर लावून एक चौखांबी मंडप उभारला होता व त्याच्या खालीं मरकतमण्याची शिला ठेवली होती. स्त्रियांनीं तिला त्या शिलेवर बसविलें आणि वाद्यांच्या गजरांत सोन्याच्या घागरी पाण्यानें भरून तिला न्हाऊं घातलें. स्नानानें तिचें शरीर स्वच्छ झालें. लगेच ती शुभ्र वस्त्र नेसली. पाऊस पडून धुवून निघालेल्या पृथ्वीवर शरदृतूंत काशतृणाचीं पांढरीं फुलें फुललीं म्हणजे ती जशी शोभते तशी पार्वती शोभली.

स्नानानंतर सुवासिनींनीं तिला दुसऱ्या एका छत लावलेल्या मणिमंडपांत नेली आणि शृंगारलेल्या आसनावर तिला पूर्वाभिमुख बसविली. आतां त्या तिला अलंकारांनीं सजविणार होत्या. दागिन्यांनीं भरलेलीं तबकें त्यांच्या जवळच होतीं. पण पार्वती स्वभावतःच इतकी सुंदर होती कीं, तिच्याकडे पाहतांना स्त्रियांच्या नेत्रांना टक लागली. त्या थोडा वेळ तिला सजविण्याचें कार्य विसरूनच गेल्या.

एकीनें अगरु-चंदन इत्यादि धूपांच्या उष्णतेनें तिचे केस वाळविले आणि मधून मधून दूर्वांकुर गुंफलेली पांढऱ्या मधूकपुष्पांची वेणी तिच्या डोक्यांत माळली. बाकीच्या स्त्रियांनीं शुभ्र अगरूची उटी तिच्या अंगाला लावली. गोरोचनेचीं पानें जाळीदार कातरून तिच्या अंगावर योग्य त्या ठिकाणीं चिकटविलीं. त्यायोगें पांढऱ्या वाळवंटांत लाल रंगाचे चक्रवाक बसल्यामुळें गंगेला जी शोभा येते, तीहि पार्वतीच्या शोभेपेक्षां कमी प्रतीची ठरली. मऊ कुरळ्या केसांनीं आच्छादिलेल्या तिच्या मुखानें भ्रमरयुक्त कमल आणि मेघाच्छन्न चंद्रबिंब यांचा तिरस्कार करून जगांत आपलें सादृश्य कुठेंच दिसूं दिलें नाहीं. कर्णभूषण म्हणून कानांत खोचलेले शुभ्र यवांकुर तिच्या तांबूस गोऱ्या गालांवर रुळूं लागतांच त्यांच्या सौंदर्याचा प्रकर्ष झाला आणि प्रेक्षकांचे नेत्र तेथेंच खिळून राहिले. पार्वतीच्या अधरोष्ठांच्या मध्यभागीं एक उभी रेषा होती आणि तिच्यामुळें तो विभागल्यासारखा दिसत होता. स्त्रियांनीं सिक्थकाचा लेप देऊन तो अधिक तांबूस केला.

थोड्याच कालानें त्याचें सौंदर्य सार्थकीं लागणार होतें. अशा त्या ओठानें आपल्या सूक्ष्म कंपनानें तिच्या मुखाला अनुपम शोभा दिली.

सखीनें तिचीं पावलें रंगविलीं आणि तिची थट्टा केली—'पार्वति, याच पावलांनीं नवऱ्याच्या डोक्यावर बसलेल्या चंद्रकलेला ताडन कर बरें का!' मैत्रिणीचा हा परिहास ऐकून पार्वतीनें कांहीं न बोलतां हातांतल्या पुष्पमालेनें तिला मारलें. पार्वतीचे डोळे निळे आणि टपोरे होते. प्रसाधन करणाऱ्या स्त्रीनें त्यांच्यामध्यें काजळ घातलें तें केवळ मंगल उपचार म्हणून. त्यांचें सौंदर्य वाढविण्यासाठीं काजळाची मुळींच आवश्यकता नव्हती. सर्व अलंकार घातल्यावर पार्वती फुलांनीं डंवरलेल्या वेलीसारखी, तारकांनीं खुलणाऱ्या रात्रीसारखी अथवा हंसांच्या थव्यानें शोभणाऱ्या सरितेसारखी दिसूं लागली. आपली अलंकारांनीं नटलेली काया तिनें जेव्हां आरशांत पाहिली तेव्हां आपण केव्हां एकदां शंकराच्या नजरेस पडूं असें तिला झालें. कारण स्त्रियांच्या शृंगाराला पतीनें पाहिल्यावांचून सार्थक्य नाहीं.

सख्यांकडून असें प्रसाधन झाल्यानंतर मेना राणी पुढें आली. पार्वती जेव्हां दिवसेंदिवस वाढूं लागली तेव्हां, कधीं एकदां हिच्या कपाळीं विवाह-तिलक लागेल अशी तिच्या हृदयाला अधीरता आली होती. आज तो दिवस उगवला होता. तिनें मनशीळ आणि हरताळ यांचा ओला कल्क बोटांना लावून घेऊन पार्वतीचें कर्ण-कुंडलांनीं शोभणारें मुख वर उचललें आणि हर्षानें कांपणाऱ्या हातानें तिच्या भालीं टिळा लावला. विवाहाच्या आधीं 'कौतुक' या नांवानें एक लोकरीचा धागा मुलीच्या हातांत बांधतात. तो बांधीत असतांना मेना राणीचे डोळे आनंदाश्रूंनीं भरून आले आणि तो कोपराकडे बांधला गेला. तिच्या दाया जवळच होत्या. त्यांनीं मग तो योग्य जागीं सरकवला. नवी साडी नेसल्यावर मैत्रिणींनीं तिच्या हातांत आरसा दिला. त्या वेळीं ती क्षीरसागराच्या फेसाळ वेलेसारखी किंवा पूर्णचंद्रयुक्त रात्रीसारखी शोभली.

मेना राणीला विवाहाच्या रीतीभाती पूर्ण माहीत होत्या. तिनें पार्वतीला आधीं कुलदेवांना वंदन करायला लावलें आणि नंतर लग्नसमारंभ पाहायला आलेल्या साध्वी स्त्रियांच्या चरणांवर घातलें. 'आपल्या पतीचें अखंड प्रेम

तुला मिळूं दे ' असा सतींनीं तिला आशीर्वाद दिला. पण पुढें पार्वतीनें शंकराच्या अर्धांगाची धनीण बनून तो आशीर्वाद उणा ठरविला.

इकडे हिमाचलानेंहि उत्साह आणि ऐश्वर्य यांच्या समृद्धीनें विवाहपूर्व कृत्यें उरकलीं आणि आप्तेष्टांसह जनसंमर्दानें भरलेल्या मंडपांत बसून तो वराच्या आगमनाची मार्गप्रतीक्षा करूं लागला.

त्याच वेळीं कैलासावर सप्तमातृका जमा झाल्या आणि वराला योग्य अशीं वस्त्राभरणें त्यांनीं शंकराच्या पुढें ठेवलीं, पण त्यानें तीं अंगावर घातलीं नाहींत. मातृकांना बरें वाटावें म्हणून फक्त त्यांना हस्तस्पर्श केला. त्याचा स्वाभाविक वेषच मंगल अलंकारांच्या रूपांत परिणत झाला. भस्म हेंच चंदनाची उटी बनलें. नर-कपालाचाच निर्मल मुकुट झाला. गजचर्माचेंच कांठपदर रंगविलेलें रेशमी वस्त्र बनलें. कपाळींचा तेजाळ, पिवळ्या बाहुलीचा तिसरा नेत्रच हरताळाचा टिळा बनला. त्याच्या अंगावरचे सर्पच तेथलीं तेथलीं भूषणें झाले. त्यांचीं शरीरें बदललीं तरी फणांमधल्या रत्नाचें तेज पूर्ववत् कायम होतें. दिवसांहि प्रकाश देणारी आणि एक-कलात्मक असल्यामुळें निष्कलंक अशी चंद्रकोरच मुकुटांतल्या चूडामणीच्या ठिकाणीं झाली.

शंकर हा अद्‌भुतरसप्रधान होता. त्यानें अशा प्रकारें आपल्या सामर्थ्यानें अलौकिक भूषणें निर्माण केलीं आणि सेवकगणांच्या हातांतल्या लखलखीत खड्गांत आपलें प्रतिबिंब पाहिलें. तो निघाल्यावर सप्तमातृका आपापल्या वाहनांत बसून त्याच्या मागोमाग चालूं लागल्या. कर्णकुंडलें हालणाऱ्या त्यांच्या मुखांनीं आकाशाला कमळें फुललेल्या सरोवराची शोभा दिली. त्या सुवर्णवर्णी मातृकांच्या पाठोपाठ भद्रकाली चालत होती. तिच्या अंगावर शुभ्र कपालांचे अलंकार दिसत होते. काळ्या ढगांत बिजली चमकत असावी आणि त्यांच्याभोंवतीं बगळ्यांची रांग उडत असावी तशी ती भद्रकाली दिसत होती. शंकराच्या पुढें नंदी, भृंगी इत्यादि गण होते. त्यांनीं मंगलतुरें वाजविलीं आणि तीं ऐकून स्वर्गांतल्या देवांना वाटलें कीं, आतां आपल्याला शिवसेवेची सुसंधि लाभली आहे.

विश्वकर्म्यानें मुद्दाम बनविलेलें छत्र सूर्यानें त्याच्यावर धरलें. त्या छत्रावरून जो शुभ्र वस्त्राचा पट्टा खालीं लोंबत होता तो गंगाप्रवाह खालीं

पडत असल्यासारखा शोभत होता. गंगा-यमुना सुंदर नारीरूप धारण करून त्याच्यावर चवऱ्या ढाळूं लागल्या. ब्रह्मा-विष्णूंनीं तुपाच्या आहुति देऊन अग्नीचें तेज वाढवावें, त्याप्रमाणें शंकराचा जयजयकार करून त्याचें स्वाभाविक महत्त्व वृद्धिंगत केलें. मुळांत मूर्ति एकच; पण सृष्टीचे उत्पत्ति, स्थिति आणि प्रळय यांच्यासंबंधानें तिचे ब्रह्मा, विष्णु आणि शिव असे तीन भाग झाले. या तिघांत कोण आधींचा आणि कोण नंतरचा तें सांगतां येत नाहीं. इंद्रादि लोकपालांनीं आपलीं वैभवचिह्नें टाकलीं आणि विनीत वेषानें नंदीच्या द्वारें शंकराचें दर्शन घेऊन त्याला प्रणाम केला. शंकरानें मस्तक हालवून ब्रह्मदेवाचा, चार शब्द बोलून विष्णूचा, मंद स्मित करून इंद्राचा आणि केवळ दृष्टिपातानें इतर देवांचा यथोचित सन्मान केला.

सप्तर्षींनींहि पुढें होऊन ‘ जय ’ शब्दानें शिवाला आशीर्वाद दिला. त्या वेळीं शंकर स्मितपूर्वक त्यांना म्हणाला, ‘ ऋषिश्रेष्ठ हो ! या विवाह-यज्ञांत मीं आपणाला प्रथमच अध्वर्यु नेमलें आहे. ’

शंकराचें वरप्रस्थान निघालें तेव्हां विश्वावसुप्रभृति गंधर्व वीणा वाजवून त्रिपुरदहनादि शिवचरित्र गाऊं लागले. शंकराला पाठीवर वाहून नंदी आकाशांतून डौलदार गतीनें चालूं लागला. त्याच्या गळ्यांतल्या सोन्याच्या घागऱ्या खुळखुळत होत्या. नदीचे तट पाडून शिंगांना चिखल लागावा तसे मेघ त्याच्या शिंगांना चिकटत होते आणि तो तीं वारंवार हालवीत होता. शंकराची हिमाचलाच्या ओषधिप्रस्थाकडे लागलेली पिंगट दृष्टि हेंच जणूं सोनेरी दावें, त्यानें ओढून नेल्यासारखा तो त्वरित नगराच्या वरच्या आकाशभागीं आला. नगरवासी जन उत्सुकतेनें वर माना करून त्याच्याकडे पाहूं लागले. थोड्याच वेळांत तो गगनमार्गावरून पृथ्वीवर उतरला.

शंभूच्या आगमनानें पर्वतराजाला अत्यानंद झाला. तो त्याला सामोरा जाण्यासाठीं निघाला. पुष्पित वृक्षांनीं भरलेल्या पर्वतशिखरांसारखे वस्त्रा-लंकारांनीं सजलेले त्याचे आप्तेष्ट हत्तींवर बसून त्याच्याबरोबर चालूं लागले. शिवगण आणि इंद्रादि देव आणि इकडून मेरु-हिमाचलाकडची मंडळी हे दोन्ही समुदाय उघड्या नगरद्वारीं एकत्र मिसळले. जसे कांहीं बांध फुटलेले जलप्रवाहच. त्यांच्या कोलाहलाचा ध्वनि दूरवर जाऊं लागला. त्रिलोकवंद्य शंकरानें सासरा या नात्यानें हिमाचलाला जेव्हां प्रणाम केला, तेव्हां हिमाचल

लाजल्यासारखा झाला. पण त्याच्या आधींच आपलें मस्तक शंकरापुढें नम्र झालेलें आहे, हें मात्र त्याला उमगलें नाहीं.

प्रसन्नवदनानें तो पुढें झाला आणि आपल्या भावी जामाताला, फुलांचा सडा टाकलेल्या आणि मोती-माणकांनीं सुशोभित केलेल्या मार्गानें त्यानें नगरांत नेलें. शंकराला पाहायला उत्सुक झालेल्या नगरांतल्या पुरंध्री, कामधंदा सोडून गच्च्या-खिडक्यांतून गोळा झाल्या.

**' आलोकमार्गं सहसा व्रजन्त्या कयाचिदुद्वेष्टनवान्तमाल्यः।**
**बद्धुं न सम्भावित एव तावत्करेण रुद्धोऽपि च केशपाशः॥ '**

[ कोणी एक रमणी केसांत फुलें गुंफून त्यांचा अंबाडा बांधीत होती. इतक्यांत नवरदेवाच्या मिरवणुकीचा कोलाहल तिच्या कानीं आला. ती तसेंच एका हातांत केस धरून घाईघाईनें खिडकीजवळ निघाली. त्यामुळें केसांचें वळण सुटलें आणि फुलें गळून पडलीं, तरी तिला त्याची शुद्ध राहिली नाहीं. हातांतले केस तसेच मोकळे राहिले. ]

**' प्रसाधिकाऽऽलम्बितमग्रपादमाक्षिप्य काचिद्द्रवरागमेव ।**
**उत्सृष्टलीलागतिरागवक्षादलक्तकाङ्कां पदवीं ततान ॥ '**

[ दुसरी एक स्त्री दासीच्या करवीं आपल्या पावलांना रंग लावीत होती. मिरवणुकीची गडबड ऐकल्यावर दासीच्या हातांत असलेला पाय खसकन् ओढून घेऊन ती पळतच खिडकीकडे गेली. आणि त्यामुळें ओल्या रंगाचीं तिचीं पदचिन्हें महालापासूनच तों खिडकी-पर्यंत जमिनीवर उमटलीं. ]

**' विलोचनं दक्षिणमञ्जनेन सम्भाव्य तद्वञ्चितवामनेत्रा।**
**तथैव वातायनसंनिकर्षं ययौ शलाकामपरा वहन्ती ॥ '**

[ तिसरी एक पुरवधू आपल्या डोळ्यांत काजळ घालण्याच्या उद्योगांत होती. उजव्या डोळ्यांत काजळ घालून झालें होतें. डाव्या डोळ्यांत घालायचें होतें. तेवढ्यांत मिरवणुकीचा ध्वनि ऐकूं आला आणि ती तशीच हातांत सळई घेऊन खिडकीकडे धावली. ]

'जालान्तरप्रेषितदृष्टिरन्या प्रस्थानभिन्नां न बबन्ध नीवीम् ।
नाभिप्रविष्टाभरणप्रभेण हस्तेन तस्थाववलम्ब्य वासः ॥'

[चवथी एक रमणी खिडकीकडे दृष्टि ठेवून पळत जात असतां तिची वस्त्रग्रंथि सुटली. पण ती पुनश्च दृढ करण्याचें तिला भान राहिलें नाहीं. तिनें एका हातानें तें गळणारें वस्त्र सावरून धरलें आणि तसें करीत असतांना हातांतल्या रत्नकंकणांची प्रभा तिच्या अनावृत नाभिप्रदेशां-वर पडली.]

'अर्धाचिता सत्वरमुत्थितायाः पदे पदे दुर्निमिते गलन्ती ।
कस्याश्चिदासीद्रशना तदानीमङ्गुष्ठमूलार्पितसूत्रशेषा ॥'

[कोणी एक स्त्री मणि गुंफून आपली मेखला तयार करीत होती. त्यासाठीं ती पाय पसरून बसली होती व दोऱ्याचें एक टोंक पायाच्या आंगठ्याला बांधून दुसरें टोंक तिनें हातीं धरलें होतें. मिरवणुकीचा ध्वनि ऐकतांच ती उठली आणि खिडकीकडे जाऊं लागली, तों गुंफलेले सर्व मणि वाटभर ओघळून पडले आणि खिडकीशीं जाईपर्यंत आंगठ्याचें सूत तेवढें शिल्लक राहिलें.]

'तासां मुखैरासवगन्धगर्भैर्व्याप्तान्तराः सान्द्रकुतूहलानाम् ।
विलोलनेत्रभ्रमरैर्गवाक्षाः सहस्रपत्राभरणा इवाऽऽसन् ॥'

[हरदर्शनासाठीं उत्सुक अशीं त्या रमणींचीं मधुगन्धित मुखें आणि भ्रमरांसारखे त्यांचे काळेभोर चंचल नेत्र यांनीं त्या राजपथावरच्या खिडक्या कमलांनीं अलंकृत केल्यासारख्या दिसल्या.]

[पुरुषांपेक्षां स्त्रिया अधिक उत्सवप्रिय असतात. लग्न, मुंज इत्यादि मंगल-समारंभांत जाऊन हौसेनें मिरवणें त्यांना फार आवडतें. म्हाताऱ्या झाल्या तरी त्यांची ही हौस कमी होत नाहीं. लग्न-मुंजींतले कित्येक उपचार आणि सोहळे हे स्त्रियांच्या उत्सवप्रियतेंतूनच जन्माला आले आहेत. वरात वाजली रे वाजली कीं, बायका झोपेंतून जाग्या होतात. जेवत असल्या तरी हातांतला

घास टाकून उठतात. मुलाला पाजीत असल्या तरी त्याला कडेवर घेऊन तशाच धावतात. कोणी गच्चीवर चढतील, कोणी सज्जांत जमतील, तर कोणी रस्त्याच्या कडेला येऊन उभ्या राहतील. गोपालकृष्ण गोकुळांतून मथुरेंत आला तेव्हां त्याला पाहण्यासाठीं तेथल्या स्त्रियांना कशी घाई सुटली आणि त्यांच्या जिवाची कशी धांदल उडाली तें एकनाथमहाराजांनीं आपल्या एका पदांत वर्णिलें आहे—

" कृष्ण आला परिसुनि मथुरे नारी । चपळ धावति अति सुंदरी ।
एकी त्या भोजन-कवळ करीं । एकी त्या आलिया मार्जन शिरीं ।
एकी त्या काजळ सूदल्या मुखीं । जावड कुंकुम लाविती नाकीं ।
एकी त्या अर्धांगीं लेइल्या चोळी । गुडघिया बांधिली मोतिया जाळी ।
एकी त्या कडिये घेतिल्या झारी । बाळकें विसरल्या घरिंच्या घरीं ॥

वर दिलेल्या सहा श्लोकांत कालिदासानें ओषधिप्रस्थानांतल्या स्त्रियांनीं नवरदेव शंकराला पाहण्याच्या गडबडींत केलेल्या चुका आणि त्यांचे परिणाम यांचें मोठें गोड वर्णन केलें आहे. कालिदासाची दृष्टि सूक्ष्म आणि सौंदर्यशोधक असल्यामुळें त्यानें दाखविलेले प्रकारहि तसेच हृदयंगम आहेत. शेवटल्या श्लोकांतलें कमळांचें रूपक तर मागच्या सर्व वर्णनाला कळसासारखें शोभतें. नदींत कमळें फुलतात. सरोवरांत फुलतात. क्वचित् जमिनीवरहि. पण त्या वेळीं म्हणे खिडकींत कमळें उगवलीं. हीं खिडक्यांतलीं कमळें कोणतीं, तर रमणींचीं मुखें. कारण, तींच तेवढीं बाहेरून दिसत होतीं. बाकीचा देहाकार दिसत नव्हता. आणि या कमळांवर भुंगे कोणते तर मिरवणुकीच्या लांबच लांब दृश्यावरून भिरभिर फिरणारे त्यांचे चंचल नेत्र.]

राजपथावरून मिरवत जाणाऱ्या शंकरानें दोहों बाजूंचीं चुनेगची प्रासादशिखरें आपल्या मस्तकींच्या चंद्रकलेनें अधिक प्रकाशित केलीं. त्याला पाहतां पाहतां स्त्रिया तन्मय झाल्या. त्यांना अन्य विषयांचें भान राहिलें नाहीं. जणूं त्यांचीं सकल इंद्रियें त्या वेळीं डोळ्यांत गोळा झालीं होतीं. त्या एकमेकींना म्हणूं लागल्या.

" नाजूक प्रकृतीच्या पार्वतीनें असा वर मिळविण्याकरितां खडतर तप आचरलें तें योग्यच होतें. जी स्त्री या महादेवाचें दासीपद मिळवील तीसुद्धां कृतकृत्य होईल, मग जिला याची मांडी मिळेल तिचें सौभाग्य काय वर्णावें ! हीं अनुरूप वधू-वरें विधात्यानें जर एकत्र आणलीं नसतीं तर

तर त्यांच्या ठिकाणीं सौंदर्य निर्माण करण्याकरितां त्यानें केलेला प्रयत्न विफल ठरला असता. शंकरानें सक्रोध होऊन मदनाला जाळून टाकलें ही गोष्ट खोटी आहे. याचें असामान्य सौंदर्य पाहून मदन लाजला आणि त्यानें स्वतःच आपलें शरीर योगाग्नीनें दग्ध केलें, असें आम्हांला वाटतें. पृथ्वीला सांभाळून धरण्याचें महत्तम कार्य संपादून हा हिमाचल आजच वरच्या मानेनें उभा आहे. आतां महादेवाचा सासरा होऊन तो अधिकच उंच होईल."

ओषधिप्रस्थांतल्या स्त्रियांचीं अशीं श्रुतिमधुर भाषणें ऐकत ऐकत शंभु हिमाचलाच्या राजवाड्यांत प्रविष्ट झाला. तेथें खूप गर्दी जमली होती. सुवासिनी स्त्रिया लाह्यांच्या ओंजळी भरून घेऊन उभ्या होत्या, त्या त्यांनीं शंकरावर उधळल्या. पण त्या लाह्यांचें इतरांच्या बाहुभूषणांशीं घर्षण होऊन पीठ झालें होतें. तेथें आल्यावर विष्णूनें पुढें होऊन शंकराला हात दिला. शरत्कालीन मेघावरून सूर्यानें खालीं उतरावें तसा शंकर नंदीवरून खालीं उतरला आणि ज्या ठिकाणीं ब्रह्मदेव पूर्वींच येऊन बसला होता त्या अंतर्भवनांत गेला. त्याच्या मागोमाग इंद्रादि देव, सप्तर्षिप्रमुख महर्षि आणि गण हिमाचलाच्या घरीं आले.

शंकर आसनावर बसतांच हिमाचलानें रत्नयुक्त अर्घ्य, मधमिश्रित दहीं आणि नवी वस्त्रजोडी या वस्तु त्याला समर्पिल्या. आणि उपाध्याय मंत्रोच्चार करीत असतां शंकरानें त्या ग्रहण केल्या. भरतीच्या वेळच्या फेसाळ समुद्राला नुकत्याच उगवलेल्या चंद्राच्या किरणांनीं वेळेकडे न्यावा, त्याप्रमाणें शुभ्र वस्त्र नेसलेल्या शंकराला अंतःपुरांतल्या लोकांनीं पार्वतीच्या समीप नेलें. शरदृतु आला म्हणजे लोक जसे आनंदित होतात, तसे पार्वतीचा मुखचंद्र पाहून शंकराचे नेत्र खुलले आणि मन जलासारखें निर्मल झालें. उभयतांचे नेत्र एकमेकांना भिडले, लगेच मागें फिरले. अशा प्रकारें त्या वधू-वरांनीं लज्जा म्हणजे काय असते तिचा अनुभव घेतला. पार्वतीचा हात म्हणजे शंकराच्या भयानें पार्वतीच्या अंतरांत छपून राहिलेल्या कामदेवाचा जणूं अंकुरच. तांबूस तांबूस त्याचीं बोटें. हिमाचलाच्या पुरोहितानें जेव्हां तो पुढें केला तेव्हां शंकरानें त्याचें ग्रहण केलें. शंकराचा करस्पर्श होतांच पार्वतीची काया पुलकित झाली. शिवाचींहि बोटें घामानें

सर्द झालीं. त्या क्षणीं कामदेवानें आपली वृत्ति जणूं दोघांच्या ठिकाणीं विभागून दिली. विवाहकालीं शंकर-पार्वतीचें केवळ स्मरण केल्यानेंच इतर वधू-वरांची शोभा वाढते. मग तीं स्वतः दोघें विवाहबंधनानें एकत्र होत असतां जी शोभा निर्माण झाली तिचें वर्णन कोण करूं शकेल !

हविर्द्रव्यांनीं प्रदीप्त झालेल्या विवाहहोमाच्या अग्नीभोंवतीं जेव्हां तें जोडपें प्रदक्षिणा घालूं लागलें, तेव्हां मेरुपर्वताच्या भोंवतीं दिन-रात्रीची जोडी फिरत असल्यासारखें दिसलें. एकमेकांचे हात धरून अशा तीन प्रदक्षिणा झाल्या. त्या वेळीं स्पर्शसुखानें त्यांचे नेत्र मुकुलित झाले होते. नंतर त्यांना आसनावर बसवून पुरोहितानें त्यांच्याकरवीं लाजाहोम करविला. पुरोहिताच्या आज्ञेनें पार्वतीनें तो लाह्यांचा धूर ओंजळींत ग्रहण करून तोंडाशीं आणून हुंगला. तो धूर तेथून सुटला तो तिच्या गालांकडे वळला आणि क्षणभर तिच्या हालत्या कर्णफुलांसारखा शोभला. त्या धूमग्रहणानें पार्वतीचें तोंड आरक्त आणि घामाघूम झालें. डोळ्यांत घातलेलें काजळहि पसरलें आणि कानांत खोंचलेला यवांकुर म्लान झाला.

पुरोहितानें तिला म्हटलें. ‘ हे पार्वति, हा अग्नि तुमच्या विवाहाचा साक्षी आहे. तूं निस्संदेहपणें आपल्या पतीबरोबर धर्माचें आचरण कर. ’ ग्रीष्मकालानें तप्त झालेली भूमि आकाशांतून पडणाऱ्या पहिल्या जलबिंदूंचा ज्या आदरानें स्वीकार करते, तशाच आदरानें पार्वतीनें पुरोहिताचें हें आज्ञावचन सोत्सुकपणें ऐकलें. नंतर तीं दोघें ध्रुवदर्शनासाठीं गेलीं. ‘ हा ध्रुवतारा पहा ’ असें शंकर तिला म्हणाला. तिनें वर मान केली आणि लाजून कसेंबसें ‘ पाहिला ’ असें म्हटलें.

पुरोहितानें विवाहविधि संपूर्ण केल्यावर शिव-पार्वतींनीं कमलासनावर बसलेल्या ब्रह्मदेवाला प्रणाम केला. ‘ तुला वीरपुत्र होवोत ! ’ असा विधात्यानें तिला आशीर्वाद दिला. पण स्वतः वाणीचा अधिपति असूनहि शंकराला काय आशीर्वाद द्यावा तें त्याला कळेना. नंतर तीं दोघें फुलांनीं सजविलेल्या आणि सुवर्णाचें आसन घातलेल्या बहुल्यावर बसलीं व मग बांधवांनीं त्यांच्या मस्तकावर हळदीनें माखलेल्या आर्द्राक्षता टाकल्या. लक्ष्मीनें स्वतः त्यांच्या मस्तकावर श्वेत छत्र धरलें. त्या कमलाचा दांडा लांब होता व मोत्यासारखे स्वच्छ जलबिंदु त्याच्या पानांच्या टोकावर चमकत होते.

साक्षात् सरस्वतीनें संस्कृत भाषेच्या द्वारें शंकराची आणि प्राकृत भाषेनें पार्वतीची स्तुति केली. अप्सरांनीं त्यांच्यासमोर नवरसप्रधान आणि अभिनयपूर्ण असें नाटक करून दाखविलें. नाटक संपल्यावर इंद्रादि देवांनीं करसंपुट जोडून शंकराला प्रणाम केला व ' शापावधि समाप्त झाल्यावर मदन परत सजीव व्हावा आणि आपण त्याच्याकडून सेवा घ्यावी ' अशी प्रार्थना केली.

शंकरानें प्रसन्न चित्तानें म्हटलें, ' ठीक आहे. मदन पुनश्च जिवंत होऊं दे. मजवर शरसंधानहि करूं दे. मी त्याच्यावर क्रोध करणार नाहीं. ' देवांची प्रार्थना फळाला आली.

' कालप्रयुक्ता खलु कार्यविद्भिर्विज्ञापना भर्तृषु सिद्धिमेति । '

[ सेवकांनीं अनुकूल वेळ पाहून जर स्वामीला विनंती केली तर ती निश्चयानें सिद्धीला जाते. ]

नंतर शंकरानें इंद्रादि देवांची रवानगी केली आणि पार्वतीचा हात धरून तो शयनगृहांत गेला. तेथें त्याच्यासाठीं उत्तम प्रकारची शय्या अंथरलेली होती. जिकडे तिकडे फुलांचा साज केलेला होता आणि सुवर्णाचे कलश भरून ठेवलेले होते. पार्वती नवोढा असल्यामुळें लाजून चूर झाली होती. शंकरानें तिचें मुख वरतीं उचललें कीं ती तें चटकन् खालीं करीत होती. जिवाभावाच्या मैत्रिणींनाहि ती मोठ्या कष्टानेंच उत्तरें देत होती. शंकरानें मग आपल्या सेवकगणांच्या अनेक प्रकारच्या नकला करून दाखवून तिच्या मुखावर अस्पष्टसें हसूं आणलें.

## उमासुरतवर्णन : : ८

विवाहविधि पूर्ण झाल्यावर शंकराची एकान्तीं भेट घेण्याच्या प्रसंगीं, पार्वतीला बावरल्यासारखें झालें. प्रेम असूनहि भय वाटलें. आणि तें पाहून शंकराची वृत्ति कामप्रवण झाली. त्यानें कांहीं विचारलें तरी ती प्रत्युत्तर देईना. वस्त्र धरलें तरी दूर जायला बघूं लागली. शयन करी तेंहि त्याच्याकडे पाठ करूनच. पण तिचें हें प्रतिकूल वर्तन पाहूनहि शंकराला राग न येतां ती त्याला अधिकच आवडूं लागली. त्यानेंहि मग झोंप आल्याचें सोंग केलें. तशी पार्वती तोंड फिरवून त्याच्याकडे प्रेमळ दृष्टीनें पाहूं लागली. इतक्यांत शंकरानें डोळे उघडले आणि तो हसूं लागला. त्यामुळें पार्वती लाजली आणि विजेच्या झटक्यासारखे तिनें आपले नेत्र मिटून घेतले. 'तूं पतीजवळ धीटपणें वाग. त्याच्यासह विलाससुखांचा मनसोक्त उपभोग घे' असा तिच्या मैत्रिणींनीं तिला एकान्तीं पाठवीत असतांना उपदेश केला होता. पण शंकराच्या पुढें येतांच तिला त्या उपदेशाचें भान राहिलें नाहीं.

तिनें कांहीं तरी बोलावें म्हणून शंकरानें तिला इकडच्या तिकडच्या अनेक गोष्टी विचारून पाहिल्या. पण पार्वती तोंडांतून शब्दहि काढीना. प्रश्नांचीं उत्तरें फक्त मान हालवूनच देई. आणि चोरट्या नजरेनें त्याच्याकडे पाहत राही. शंकरानें वस्त्र ओढलें कीं, ती आपल्या दोन्ही हातांनीं त्याचे डोळे झांकी. पण शंकराचा तृतीय नेत्र उघडाच राही

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत.
अनुक्रम २३८८८ वि: ...
क्रमांक ९९.३८० नों: दि: ...



त्याला ती काय करणार ! बिचारीचा तो प्रयत्न निष्फल होई. तो चुंबनाला सरसावला कीं, ती तोंड मागें घेई. त्यानें दृढ आलिंगन दिलें तरी तिचे हात शिथिलच राहत. ती आपल्यापरीनें कामवृद्धीला अवसर देत नसे खरी; पण तरीहि तिच्याशीं रममाण होऊन शंकर संतुष्ट होत असे. शंकरानें सदयपणें केलेल्या विलासक्रीडा ती सहन करी, पण त्याचे निर्दय उपभोग तिला सोसत नसत.

सकाळीं ती शयनगृहांतून बाहेर आली कीं, मैत्रिणी तिला घेरीत आणि रात्रीं काय घडलें त्याची बारीक चौकशी करूं लागत. पण मनांत सांगण्याची उत्सुकता असली तरी ती लज्जेमुळें मैत्रिणींची जिज्ञासा ती पूर्ण करूं शकत नसे. ती आरशापुढें उभी राहून आपल्या कायेवर कांहीं उपभोगाचीं चिह्नें उमटलीं आहेत कीं काय, तें पाहूं लागली कीं शंकर नेमका तिच्यामागें येऊन उभा राही. आणि त्याचें प्रतिबिंब आरशांत दिसलें कीं, लाजून तिचा जीव अगदीं थोडा थोडा होत असे.

शंकराचें पार्वतीवर उत्कट प्रेम आहे, हें पाहून मेना राणीला समाधान वाटलें. कारण, जांवयाला आपली मुलगी आवडते असें एकदां कळलें कीं, कोणत्याहि मातेची काळजी दूर होत असते. पार्वतीचे थोडे दिवस असेच संकोचावस्थेंत गेले. नंतर हळूहळू तिला विलासांतील गोडी कळूं लागली. प्रणयप्रकारांतल्या दुःखाची कळ जाणवेनाशी झाली. ती मग शंकराला विरोध करीनाशी झाली. एकमेकांचे भाव एकमेकांना कळूं लागले. क्षणाचाहि वियोग असह्य होऊं लागला. लीला-विनोद आणि मनधरण्या सुरू झाल्या. थोड्याच दिवसांत त्यांच्या अन्योन्य प्रेमाला भरतीचें उधाण आलें. गंगा नदी सागरापासून दूर होत नाहीं आणि सागरालाहि तिच्या मुखरसावांचून दुसरें कसलेंच सुख नसतें. तशींच हीं दोघेंहि परस्परांच्या अनुरागाचें सुख लुटूं लागलीं.

शंकरानें आपली प्रिय शिष्या समजून पार्वतीला एकान्तीं रतिशास्त्र पढविलें आणि तिनेंहि त्यांत आपलें कसब दाखवून जणूं शंकराला गुरुदक्षिणा दिली. शंकरानें तिचा अधरोष्ठ खंडित केला, तेव्हां तिनें हातानें त्याचें मुख दूर केलें. तिला ती वेदना असह्य झाली. पण जेव्हां तिनें आपलें मुख पतीच्या जटाजूटावर टेकलें तेव्हां तेथल्या शीतल चंद्रकलेनें तिची वेदना

क्षणांत नाहींशी केली. उलट, पार्वतीनें जेव्हां शंकराच्या मुखाचें चुंबन घेतलें तेव्हां तिचें कचचूर्ण शंकराच्या तृतीय नेत्रांत उधळलें आणि तो चुरचुरूं लागला. मग पार्वतीनें आपल्या सुवासिक मुखानें जेव्हां फुंकर घातली तेव्हांच तो स्वच्छ होऊन खुपणें थांबलें. अशा प्रकारें पार्वतीसह विषय-सुखाचा उपभोग घेत शंकरानें हिमाचलाच्या घरीं एक मास घालविला.

नंतर तेथून निघण्यासाठीं त्यानें हिमाचलाची अनुज्ञा घेतली. तीं दोघें नंदीवर बसून जाऊं लागलीं तेव्हां हिमाचलाला कन्येच्या विरहाचें दुःख असह्य झालें. वायुगतीनें नंदी निघाला. त्याचा वेग सोसेनासा होऊन पार्वतीनें शंकराला मिठी घातली. थोड्याच वेळांत तीं मेरुपर्वतावर आलीं. तेथें वृक्ष-लतांचे सोनेरी पल्लव तोडून त्यानें त्यांची शय्या बनविली आणि ती रात्र त्यांनीं भोगसुखांत घालविली. पार्वतीचें मुख कमलासारखें होतें. शंकर त्याच्यावर भ्रमरासारखा आसक्त होता. तिला घेऊन तो मेरूवरून मंदर-पर्वतावर आला. तिथल्या दगडांवर श्रीविष्णूच्या कंकणांचीं चिन्हें उमटलेलीं होतीं. आणि समुद्रमंथनप्रसंगीं अमृताचे तुषार उडाले होते. तेथून तो कुबेराच्या पर्वतावर आला. तेथें रावण शंकराच्या प्रसन्नतेसाठीं तप करीत होता. तो जेव्हां गर्जना करी, तेव्हां पार्वती घाबरून आपल्या कोमल बाहुलतांनीं शंकराच्या गळ्याला विळखा घाली. तेथें शंकरानें अनेक चांदण्या रात्रींचें सुख अनुभविलें. तेथून त्यांनीं मलयपर्वतावर आरोहण केलें. तेथें चंदनाचीं झाडें हालवीत आणि लवंग-लतांचे केसर उधळीत दक्षिणवात संचरत होता. एखादा गोडबोल्या माणूस आपल्या शब्दानें दुसऱ्याचें दुःख कमी करतो, त्याप्रमाणें त्या वाऱ्यानें पार्वतीचे सुरतश्रम दूर केले.

नंतर तीं जलक्रीडेसाठीं आकाशगंगेंत उतरलीं. पार्वतीनें एक सोनेरी कमळ उपटलें आणि त्यानें शंकराला ताडन केलें. शंकरानें तिच्या तोंडावर सपासप पाणी उडवलें आणि तें सहन न होऊन पार्वतीनें डोळे मिटले. ती पाण्यांत उभी राहिली होती आणि तिच्या कमरेंतल्या मेखलेवर बारक्या बारक्या मासोळ्या चिकटून बसल्या होत्या. त्यामुळें तिची शोभा द्विगुणित झाली होती. तेथून पुढें ती स्वर्गातल्या नंदनवनांत गेली. इंद्राणीनें केसांत माळावीं अशीं सुंदर फुलें तेथल्या पारिजात वृक्षांवर फुललीं होतीं. शंकरानें तीं खुडून पार्वतीचा साजशृंगार केला. तेव्हां तेथें विहार करणाऱ्या

सुरसुंदरींनीं कौतुकानें त्यांच्याकडे पाहिलें. अशा प्रकारें पार्थिव आणि दिव्य सुखांचा पार्वतीसह अनुभव घेऊन शंकर एक दिवस संध्याकाळच्या वेळीं गंधमादन पर्वतावर आरूढ झाला. तेथें तो एका सोनेरी शिलाखंडावर बसला. पार्वतीनें जवळ बसून त्याच्या डाव्या भुजाचा आधार घेतला. त्या वेळीं सौम्य झालेल्या आरक्त सूर्यबिंबाकडे पाहून तो पार्वतीला म्हणालाः

" देवि ! हा सूर्य आपली आरक्त प्रभा जणूं तुझ्या डोळ्यांत संक्रान्त करून दिवस संपवीत आहे. जसा प्रलयकालीं जगाचा संहार करणारा जगन्नियंताच. याच्या किरणांनीं आतां तुषारांचा संपर्क सोडला आहे. त्यामुळें हिमाचलावरच्या निर्झरांभोंवतीं इंद्रधनुष्याचें जें अर्धवर्तुळ चमकत होतें तें आतां दिसेनासें झालें आहे. चक्रवाकयुगुलांची अवस्थाहि कशी अनुकंपनीय झाली आहे पाहा. अर्धवट चघळलेला कमलकेसरांचा घास टाकून तीं आक्रंदन करीत आहेत. माना वळवून आपल्या सहचराकडे पाहत आहेत. एका कमलपत्राचा आडपडदा; पण तेंच अंतर त्यांना चार कोसांइतकें मोठें वाटत आहे. सूर्य अस्ताला जात आहे हें पाहून हत्ती आपलें दिवसाचें स्थान सोडून उठत आहेत, आणि सल्लकीच्या पल्लवांनीं सुगंधित झालेलें तळ्याचें पाणी रात्रभर पुरेल इतकें पिऊन घेत आहेत.

" त्या तळ्याकडे पाहा. पश्चिम क्षितिजावर लोंबणाऱ्या सूर्याचे लांबच लांब किरण पाण्यावर पडत आहेत आणि त्यामुळें तळ्यावर कोणी तरी सोनेरी पूलच उभारल्यासारखें वाटत आहे. ते पाहा, रानडुकरांच्या कळपांचे म्होरक्ये. त्यांच्या दाढांचे ते सुळके त्यांनीं कमलनाल तोंडांत धरल्यासारखे दिसतात. सूर्यताप असह्य झाल्यामुळें ते चिखलानें भरलेल्या डबक्यांत लोळत होते. सूर्यास्त झाल्याचें पाहून ते आतां बाहेर पडत आहेत. तो पाहा, वृक्ष-शिखरावर घर करून बसलेला मोर—त्याचा पिसारा सोन्याच्या रसानें बनविल्यासारखा दिसतो. हळूहळू कमी कमी होत जाणारें सूर्याचें सोनेरी तेज जणूं तोच पिऊन घेत आहे. वर आकाशाकडे पाहा. तें एखाद्या आटत जाणाऱ्या सरोवरासारखें दिसतें. पूर्व दिशेला पसरणारा अंधार म्हणजे त्यांतला चिखल आणि क्षणाक्षणाला कमी होत जाणारे सूर्यकिरण म्हणजे आटणारें पाणी !

" या वेळीं येथल्या ऋषींच्या आश्रमांची शोभाहि पाहण्यासारखी आहे.

वृक्षांचीं आळीं पाण्यानें भरलेलीं आहेत. आजूबाजूला बागडणारीं हरिणें आंगणांत गोळा होत आहेत. दिवसभर रानांत चरायला गेलेल्या होमधेनु परत येऊन आश्रमाच्या दारीं उभ्या राहत आहेत. होमशाळेंतले अग्नि प्रदीप्त होत आहेत. तळ्यांतलीं कमळें मिटत असलीं, तरी आपल्यामध्यें वसती करायला येणाऱ्या भ्रमरांना प्रेमपूर्वक आश्रय देण्यासाठीं थोडा अवकाश ठेवीत आहेत. मावळत्या सूर्यमंडलाकडे तूं आणखी एकदां निरखून पाहा. ती त्याची लाली आणि त्या नाजूक सौम्य किरणशलाका. यांमुळें पश्चिम दिशा भालीं केशरयुक्त बंधुजीवपुष्पाचा टिळा लावलेल्या कन्येसारखी शोभत आहे.

"या सूर्याच्या रथासमवेत सहस्रावधि वालखिल्य ऋषि सूर्यकिरणांचा ऊष्मा प्राशन करीत चालले आहेत. आपण अस्ताला जातांना निजतेज अग्नीमध्यें ठेवणाऱ्या सूर्याला ते सामवेदानें स्तवीत आहेत, आणि तो वेदघोष ऐकून सूर्याच्या रथाचे सातहि घोडे आनंदानें फुरफुरत आहेत. त्यांच्या मानेवरची आयाळ विसकटली आहे, माना लवल्या आहेत, आणि कानांवरचीं चामरें डोळ्यांवर घासलीं जाऊन त्यांना ते नीटपणें उघडतां येईनासे झाले आहेत. अशाप्रकारें दिवस महासागरामध्यें बुडवून सूर्य अस्ताला जात आहे. सूर्य मावळल्यावर लगेच आकाश कसें झोपल्यासारखें झालें पाहा. महातेजाची गति हीच. तें आहे तोंवर सगळें प्रकाशानें झळकत राहील आणि गेलें कीं सगळीकडे अंधार गुडुप !

'संध्ययाप्यनुगतं रवेर्वपुर्वन्द्यमस्तशिखरे समर्पितम् ।
प्राक्तथेयमुदये पुरस्कृता नातुयास्यति कथं तमापदि ॥'

[ "वंदनीय असें सूर्यबिंब अस्ताचलावरून खालीं जातांच संध्याहि त्याच्यामागून चालती झाली. सकाळीं उदयाला येत असतांना सूर्य तिला पुढें घालून पूर्व क्षितिजावर आला होता. मग त्याच्या आपत्कालीं तिनें त्याच्या मागोमाग जाणें हेंच योग्य. ]

[ आपला पुरस्कर्ता आपत्तींत सांपडला असतां पूर्वींचे उपकार स्मरून माणसानें त्याच्या मागोमाग उडी घ्यावी हें नीतितत्त्व कालिदासानें येथें अप्रत्यक्षपणें उपदेशिलें आहे. अभिजात कवींच्या काव्यांतून कित्येक ठिकाणीं असा नीतितत्त्वांचा उल्लेख

आढळतो. पण तो प्रत्यक्ष नसून प्रच्छन्न किंवा शर्करावगुंठित असतो. अमुकानें अमुक अमुक करावें याला साक्षात् उपदेश म्हणतात आणि अमुकानें अमुक प्रसंगीं असें असें केलें असें सांगून एखादें नीतितत्त्व वाचकाच्या मनावर बिंबविणें याला अप्रत्यक्ष उपदेश म्हणतां येईल. काव्यांतला अथवा ललित वाङ्मयांतला नीत्युपदेश दुसऱ्या प्रकारचा असतो. यालाच 'कांतासंमित उपदेश' असें साहित्यशास्त्रांतलें नांव आहे. एखादी विनयशील स्त्री आपल्या पतीची गैरवागणूक दिसली असतां प्रत्यक्ष त्याची कान-उघाडणी करीत नाहीं, तर तिच्या दृष्टीनें आदर्श असलेला एखाद्या शेजारणीचा नवरा कसा आणि त्यामुळें त्याच्या कुटुंबांत कसें सुख-समाधान नांदतें तें ती त्याला गोड शब्दांत समजावून सांगते. उघड उपदेशापेक्षां असा हा प्रच्छन्न उपदेशच अधिक हितपरिणामी ठरतो. कारण यांत कोणाचाहि अहंभाव दुखविला जात नाहीं. यावरून आपल्याला असा एक नियम बांधतां येईल कीं, कवीनें नीतिबोध करायचा तो आपल्या कलेला वैगुण्य येऊं न देतां जेवढा साधेल तेवढाच करावा. कालिदासानें आपल्या काव्यांत हा नियम कसोशीनें पाळून मागच्या कवींना एक प्रकारें धडाच घालून दिला आहे.]

'रक्तपीतकपिशाः पयोमुचां कोटयः कुटिलकेशि भान्त्यमूः।
द्रक्ष्यसि त्वमिति सान्ध्यवेलया वर्तिकाभिरिव साधुवर्तिताः॥'

[" प्रिये, हीं पश्चिमेकडच्या मेघांचीं अग्रें, कांहीं पिवळीं, कांहीं लाल तर कांहीं पिंगट रंगाचीं दिसत आहेत. मला वाटतें, तूं पाहणार आहेस म्हणून सांध्यदेवीनें तीं कुंचली हातांत घेऊन रंगवून टाकलीं आहेत.]

[या श्लोकांत कवीनें संध्येची आतिथ्यशीलता दाखविली आहे. एखादी प्रतिष्ठित व्यक्ति आपल्या घरीं यायची असली म्हणजे यजमान घरादाराची साफसफाई करतो आणि पाहुण्याला चांगलें दिसेल अशा रीतीनें तें शृंगारतो. सूर्यास्ताच्या वेळीं पश्चिम क्षितिजावर उभारले गेलेले ढगांचे किल्ले म्हणजे संध्यादेवीचा रंगमहालच नाहीं का? साक्षात् जगदंबा पाहायला येणार म्हणून तिनें तो विविध रंगांनीं रंगवून ठेवला अशी ही गोड उत्प्रेक्षा आहे. शिवाय दुसऱ्याहि एका दृष्टीनें या श्लोकाचें सौंदर्य पाहण्यासारखें आहे. शंकर हा जरी देवाधिदेव असला तरी कालिदासानें त्याचें देवत्व थोडा वेळ डोळ्यांआड करून एक नवयुवक मनुष्य या

भावनेनेंच त्याचें स्वभावचित्रण केलें आहे. मनाजोगत्या रूपगुणवती तरुणीशीं नुकताच विवाह झालेल्या रसिक तरुणाला आपली भार्या म्हणजे स्वर्गीय देवताच वाटत असते. तिच्या विलासासाठींच वसंत बहरतो, तिच्यासाठींच झरे झुळझुळतात, तिच्यासासाठींच तारे लुकलुकतात, आणि तिच्या स्वागतासाठींच सृष्टि विविध रंगांनीं नटली आहे, अशा कल्पनेंत तो रंगलेला असतो. जगांतल्या सुखाची आणि सौंदर्याची स्वामिनी ती आणि तिच्या सुखसौंदर्याचा धनी आपण, अशा भावनेनें तो भारलेला असतो. शंकराला निमित्त करून कवीनें या ठिकाणीं भावनाप्रधान तरुणाच्या मनोविकासाची एक छटा दाखविली आहे. ]

" सिंहाच्या आयाळींतल्या केसांत, वृक्षांच्या कोमल पल्लवांत आणि पर्वताच्या धातुमय शिखरांत सूर्यानें जणू संध्याराग विभागून ठेवला आहे. अशा वेळीं ऋषिजन आपल्या पायांच्या टांचा उंच करून पवित्र जलानें सूर्याला अर्घ्य देत आहेत आणि आपलें चित्त निर्मल व्हावें म्हणून आदरानें गायत्रीचा जप करीत आहेत. हे पार्वति, मलाहि संध्याविधीला जाण्यासाठीं तूं थोडा वेळ परवानगी दे. नित्यनियम आचरून मी परत येईपर्यंत या मैत्रिणी आपल्या मनोज्ञ भाषणांनीं तुझी करमणूक करतील. "

त्यावर पार्वती कांहींच बोलली नाहीं. तिनें रुसल्यासारखें करून आपला खालचा ओठ किंचित् चावला. विजया नांवाची एक तिची सखी तिच्याजवळच बसली होती, तिच्याशींच तिनें कांहीं तरी इकडचें तिकडचें बोलायला सुरुवात केली. महादेव ईश्वर खरा; पण त्यानेंहि मंत्रपूर्वक सर्व सायंविधि आचरला. परत येतो तों पार्वती मत्सरभावनेनें आपल्याशीं अबोला धरून बसली आहे असें त्याला दिसलें. तो स्मितहास्य करून तिला म्हणाला:

" प्रिये, हा अकारण क्रोध टाकून दे. मीं वंदन केलें तें संध्येला; दुसऱ्या कोण्या तरी रमणीला नव्हे. हा तुझा सहचर चक्रवाकाच्या स्वभावाचा असून तो तुजवर उत्कट प्रेम करीत आहे, हें तुला अजून ठाऊक झालें नाहीं का? सृष्टिरचनेच्या वेळीं ब्रह्मदेवानें पितरांना उत्पन्न करून आपली काया टाकून दिली, तीच ही उदयास्ताच्या वेळीं दिसणारी संध्या होय. सर्व लोकांप्रमाणें मीहि तिला गौरवानें वंदन करतों. त्याच या संध्येला आतां अंधकार वेढीत असून ती पृथ्वीला चिकटल्यासारखी दिसत आहे. एका बाजूला तमालवृक्षांची रांग असलेली जणू धातुरसाची नदीच !

संध्येचा अरुण प्रकाश नाहींसा होतांच पश्चिम क्षितिजावर एक तांबडी रेषा चमकतांना दिसते ती पाहा. तिला बघून असें वाटतें कीं, रणांगणांत रक्तानें भरलेली ही तलवारच कोणीं तरी वांकडी रोवलेली आहे.

" दिवस आणि रात्र यांच्या संधिकालीं प्रगटणारें हें तेज मेरुपर्वताच्या मागच्या बाजूला गेलें कीं, पृथ्वीवर जिकडे तिकडे अंधाराचें राज्य सुरू होतें. वर-खालीं, आजूबाजूला आणि मागेंपुढें कांहींच दिसेनासें होतें. या अंधाराच्या आवरणांत रात्रींच्या वेळीं जग कसें गर्भवासांत कोंडल्यासारखें होतें. "

**' शुद्धमाविलमवस्थितं चलं वक्रमार्जवगुणान्वितं च यत् ।**
**सर्वमेव तमसा समीकृतं धिङ्महत्त्वमसतां हृतान्तरम् ।। '**

[ " शुद्ध आणि मलिन, चर आणि स्थिर, तसेंच वक्र आणि सरळ, सर्व भेद या अंधारानें नष्ट केले आहेत. दुर्जनांची भरभराट झाली कीं, त्यांच्या अमदानींत गुण आणि दोष सरसकट एकाच मापानें मोजले जातात. ]

[ सूर्य अस्ताला जातो आणि अंधाराला फावतें. तो जगांतल्या दोष, मालिन्य, वक्रता इत्यादि वाईट गोष्टींचा नायनाट करतो हें ठीक आहे. कवीचा त्याच्याविरुद्ध दावा आहे तो हा कीं, तो वाइटाबरोबर चांगलेंहि गडप करतो. सुक्याबरोबर ओलेंहि जाळतो. काय बुडवावें आणि काय तारावें याचा त्याला विवेक नाहीं. गुण आणि दोष त्याच्या वांट्याला सारखेच. वाढलेल्या अंधाराचें हें चरित्र पाहून कवीनें श्लोकाच्या चौथ्या चरणांत एक अनुभवाचा अर्थान्तरन्यास ठेवून दिला आहे. ' दुर्जनांच्या राज्यांत गुण-दोष, श्रेष्ठ-कनिष्ठ एकाच मापानें मोजले जातात किंवा सगळे सारखेच भरडून निघतात ' असा त्याचा भावार्थ आहे. अंधाराचें आणि दुर्जनाचें साम्य काय तर दोघांचेंहि अंतरंग काळें. दोघेंहि हां हां म्हणतां वाढतात आणि चहूं बाजूंनीं घेरतात. प्रकृत अंधाराचें वर्णन करून त्याच्याशीं समानशील असलेल्या अप्रकृत दुर्जनाची करणी कशी असते तें कवीनें येथें मोजक्या शब्दांत सूचित केलें आहे. तेवढ्यावरच तो राहिला नाहीं तर दुर्जनांच्या अभिवृद्धीचा त्यानें धिक्कारहि केला आहे. ]

'नूनमुन्नमति यज्वनां पतिः शार्वरस्य तपसो निषिद्धये ।
पुण्डरीकमुखि पूर्वदिङ्मुखं कैतकैरिव रजोभिरावृतम् ॥'

[" रात्रीचा अंधार दूर करण्यासाठीं चंद्र जेव्हां उदयाचलावर आरोहण करण्यास प्रवृत्त झाला, तेव्हां पूर्व दिशेचें मुख केतकीच्या परागांनीं भरून गेल्यासारखें दिसलें. ]

[ चंद्र उगवायच्या आधीं क्षितिजावर जो एक पिवळा विरळ प्रकाश पसरतो त्याला कवीनें केवड्याच्या परागांची उपमा दिली आहे. पूर्व दिशा ही एक नायिका. चंद्र हा तिचा वल्लभ. तो आपल्या घरीं येणार, म्हणून ती आपलें तोंड आहे त्यापेक्षां अधिक उजळ दिसावें म्हणून केवड्याच्या कणसांतले पराग त्याच्यावर उधळून घेते. नट्टापट्टा करणें ही स्त्रियांची अभिजात आवड आहे. सुगंधी फेस-पावडर चालू युगांत निर्माण झाली असली तरी पूर्वकालीं स्त्रिया फुलांच्या परागांचा उपयोग करून घेत. त्यामुळें तोंड गोरें होई आणि सुवासहि येई. ]

'मन्दरान्तरितमूर्तिना निशा लक्ष्यते शशभृता सतारका ।
त्वं मया प्रियसखीसमागता श्रोष्यतेव वचनानि पृष्ठतः ॥'

[" आकाशांत तारका लुकलुकत आहेत. रात्र त्यांच्याशीं कुजबूज करीत आहे. आणि चंद्रबिंब मंदरपर्वताच्या आड आहे. हें दृश्य पाहून मला असें वाटतें कीं, तूं आपल्या जिवलग मैत्रिणीशीं गुजगोष्टी करीत बसली आहेस आणि मी मागें लपून उभा राहून तुमचें संभाषण ऐकत आहें. ]

[ या श्लोकांत कवीनें चंद्रोदयप्रसंगाचा आधार घेऊन जिज्ञासु प्रियकराची मनोवृत्ति प्रगट केली आहे. नवोढा वधू एकान्तांत पतीशीं प्रणयालाप करीत असली तरी तिचा संकोच पूर्णपणें मावळलेला नसतो. ती सेवा करते, आज्ञेंत वागते, नव्या संसारांत रंगते, रमते हें सगळें पाहत असूनहि प्रेमळ पतीला अशी एक जिज्ञासा असते कीं, आपलें घर, आपलीं माणसें आणि विशेषतः आपण, तिला कसे काय आवडतों तें एकदां समजलें तर पाहावें. पण या बाबतींत तिला विचारून खरेंखुरें उत्तर मिळण्याची शक्यता नसते. अशा स्थितींत ती जेव्हां कधींकाळीं आपल्या मैत्रिणीशीं गुजगोष्टी करीत बसली असेल, तेव्हां पतीनें तिचें बोलणें आडून ऐकण्याचा मोका साधावा. तिची आवडनावड, तिचे सुखदुःखाचे अनुभव आणि तिचें पतीविषयींचें कौतुक किंवा तक्रार हें सगळें मैत्रिणीपुढें उघड होत असतें. ]

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. [illegible]
अनुक्रम 2-3-88 दि. 10-8-95
क्रमांक 77784 नों. दि. 26/8/2015

" पूर्व दिशेला आधीं चांदणें पसरलें आणि त्यामागून हें चंद्रबिंब बाहेर पडलें. या घटनेकडे पाहिलें म्हणजे असें वाटतें कीं, पूर्व दिशा दिवसभर आपल्या पोटांत सांठवून ठेवलेलें रहस्यच निशेच्या आग्रहावरून स्मितपूर्वक बाहेर टाकीत आहे. प्रियंगूच्या फळासारखें हें कांतिमान् चंद्रबिंब आकाशांत उदय पावून त्याचें प्रतिबिंब भूमीवरच्या सरोवरांत पडत आहे. त्यामुळें असें वाटतें कीं, चंद्र आपल्या बिंबप्रतिबिंबांनीं एकमेकांपासून दूर गेलेल्या चक्रवाकांच्या जोडप्याची नक्कलच करीत आहे.

" हे पार्वति, नुकत्याच उगवलेल्या यवांकुरासारखे कोमल असलेले हे चंद्राचे किरण, नखांनीं सहज खुडून घ्यावे आणि त्यांचीं तुला कर्णभूषणें करावीं असें मला वाटतें. रमणीचे मुखावर पसरलेले केस बोटांनीं मागें सारून तिचें चुंबन घ्यावें, त्याप्रमाणें चंद्र निशादेवीचा अंधाररूपी केशकलाप किरणांच्या अंगुलींनीं धरीत आहे. त्या स्पर्शसुखानें तिचे कमलरूपी नेत्र मिटत आहेत आणि तो तिचें मुख चुंबीत आहे असा भास होतो.

**' पश्य पार्वति नवेन्दुरश्मिभिर्भिन्नसान्द्रतिमिरं नभस्तलम् ।**
**लक्ष्यते द्विरदभोगदूषितं संप्रसीददिव मानसं सरः ॥ '**

[ " चंद्र क्षितिजावर येतांच पूर्वेच्या बाजूनें अर्धें आकाश प्रसन्न आणि उजळ झालें आहे. पश्चिमेकडचा नभःप्रांत अजून अंधकारमय असला तरी तोहि हळूहळू प्रकाशमय होण्याच्या मार्गाला लागला आहे. आकाशाची सांप्रतची अवस्था पाहून मानससरोवराची आठवण होते. हत्ती येऊन डुंबायला लागले कीं, त्याचें पाणी गढूळ होऊन जातें आणि ते निघून गेल्यावर एका बाजूनें तें हळूहळू निर्मळ होत जातें. ]

[ ' गगनं गगनाकारं ' असें एक सुभाषित आहे. आकाशाला कशाची उपमा देतां येईल तर आकाशाचीच. कारण, त्याच्याइतकी व्यापक आणि अनंत वस्तु दुसरी कोणतीहि नाहीं. पण कालिदासानें वरील श्लोकांत त्याला मानससरोवराची उपमा योजिली आहे. मानससरोवर हें कैलासपर्वताच्या पायथ्याला कांहीं अंतरावर आहे. ब्रह्मदेवानें मनानें तें निर्माण केलें म्हणून त्याला सदर नांव पडलें. हें सरोवर फार मोठें असून त्याचें पाणी स्वच्छ आणि निळें आहे. विशाल-पणा आणि निळेपणा हे दोन गुण आकाश व मानससरोवर या दोन्ही ठिकाणीं

सारखे असल्यामुळें कवीला या दोन वस्तूंचा उपमेच्या द्वारें संबंध जोडण्याची स्फूर्ति झाली आणि प्रकृत विषयाच्या अनुरोधानें पण त्याहून वेगळें असें एक भव्योदात्त दृश्य त्यानें वाचकांच्या मनश्चक्षूंसमोर उभें केलें. ]

'रक्तभावमपहाय चंद्रमा जात एष परिशुद्धमंडलः।
विक्रिया न खलु कालदोषजा निर्मलप्रकृतिषु स्थिरोदया ॥'

[ " आतां चंद्राकडे पाहा. त्याचा उदयाच्या वेळचा तांबूसपणा नष्ट होऊन बिंब कसें निर्मळ आणि शुभ्र झालें आहे. सज्जनांच्या ठिकाणीं प्रतिकूल परिस्थितीमुळें एखादी विकृति उत्पन्न झाली तरी ती फार वेळ टिकत नाहीं. ]

[ चंद्रोदयाचें वर्णन करतांना कवीनें या ठिकाणीं एक सुंदर अर्थान्तरन्यास केला आहे. लोकोत्तर महात्मे हे प्रकृतीनें धीरगंभीर असतात. या द्वंद्वात्मक जगांत वावरत असूनहि त्यांना क्रोध, शोक, भय, मोह इत्यादि विकारांची बाधा होत नाहीं. प्रतिकूल परिस्थितीमुळें एखादे वेळीं विकारांची ऊर्मि उठली तरी तिला ते गिळून टाकतात. 'कामक्रोध आम्हीं केले पायठणी' असें तुकोबांनीं म्हटलें आहे. चंद्र प्रथम तांबूस दिसत होता त्याचें कारण त्याला अंधाराशीं झगडत झगडत वर यावें लागलें होतें. साहजिकच त्याच्या मुखावर क्रोधाची लाली चढली होती; पण थोड्याच वेळांत तो क्रोध जिंकून मूळ प्रकृतीवर आला. प्रसाद आणि आल्हाद हे त्याचे स्वभावविशेष जगाच्या नयनांना रिझवूं लागले, ताप शमवूं लागले. ]

'उन्नतेषु शशिनः प्रभा स्थिता निम्नसंश्रयपरं निशातमः।
नूनमात्मसदृशीप्रकल्पिता वेधसैव गुणदोषयोर्गतिः ॥'

[ " चंद्रप्रभा वृक्षांच्या आणि पर्वताच्या शिखरांवर आरूढ झाली. अंधार खोलगट भागांत आणि दऱ्याखोऱ्यांत वसति करून राहिला. कारण विधात्यानें गुण आणि दोष यांना त्यांच्या स्वभावाला साजेशीच स्थिति नेमून दिली आहे. ]

" चांदणें पडलें आहे. चंद्रकान्तमणि पाझरून वाहूं लागले आहेत. आणि त्या जलाचा शीतल स्पर्श झाल्यामुळें पायथ्याजवळच्या वृक्षांखालीं

झोपलेले मोर अकालीं जागे होत आहेत. हे सुंदरी, कल्पवृक्षांच्या शिखरांवर चंद्रकिरण स्फुरण पावत आहेत. त्यामुळें असें वाटतें कीं, चंद्र आपल्या हातांनीं जणूं त्यांच्यावरचे रत्नहार मोजून पाहत आहे. या पर्वताच्या उंच जागीं चांदणें पडलें आहे, आणि खोलगट भागीं अंधार रेंगाळतो आहे. अंधारानें व्यापलेल्या या अवाढव्य पर्वतावर मधून मधून पडणारे हे चांदण्याचे ठिपके पाहिले म्हणजे काळ्या अंगावर जागोजाग पिवळे पांढरे ठिपके देऊन रंगविलेला हा हत्तीच आहे कीं काय, असें वाटतें. इकडे सरोवरांत कुमुदें पूर्णपणें विकसित झालीं असून त्यांचा पिवळा वर्ण मनोहर दिसतो. त्यांतला मकरंद लुटण्यासाठीं भ्रमरांचा गुंजारवहि सुरू आहे. कल्पवृक्षावर लटकणारें हें पीत वस्त्र चंद्रिकेसारखेंच दिसत आहे. तिकडून वारा येऊन हालूं लागलें कीं, मग तें वस्त्र आहे असें कळून येतें.

"वृक्षाग्रांतून खालीं जमिनीवर पडणारे चांदण्याचे हे कवडसे गळून पडलेल्या फुलांसारखे दिसत आहेत. असें वाटतें कीं, हे बोटांनीं उचलावे आणि तुझ्या केसांत माळावे. हे चारुमुखि, हा पाहा चंद्र आपल्या योगतारेशीं संयोग पावत आहे आणि तिचें बिंब तरल झालें आहे. एखाद्या नवोढा वधूजवळ तिच्या पतीनें जावें आणि अपरिचयाच्या भीतीमुळें तिला कंप सुटावा तसें हें दृश्य दिसतें.

"हे पार्वति, तुझे डोळे चंद्राकडे लागले आहेत आणि चंद्रकिरण तुझ्या गोऱ्या गालांवर प्रतिबिंबित होत आहेत. तुझें हें आल्हादक मुख पाहिलें कीं, हाच चंद्र असून इथूनच सगळीकडे चांदणें पसरत आहे असा भास होतो. तूं या पर्वतावर आलेली पाहून ही पाहा या पर्वतावरची वनदेवता तुझ्या स्वागत-सत्कारासाठीं इकडे येत आहे. तिच्या हातांत सूर्यकान्तमण्याचें पात्र असून त्यांत कल्पवृक्षापासून निघालेलें मद्य भरलेलें आहे. तुझ्या मुखाला स्वभावतःच बकुळीच्या फुलासारखा वास आहे आणि तुझे डोळे आधींच आरक्त आहेत. तेव्हां हें मद्य तूं प्यालीस तरी तें तुला आणखी कोणते गुण मिळवून देणार आहे! पण तुझ्या या नूतन सखीनें भक्तीनें समर्पिलेल्या या उपचाराचा तुला स्वीकार केला पाहिजे. म्हणून सांगतों कीं, तूं हें मद्य पी. हें अनंगदीपक आहे."

असें म्हणून शंकरानें तें मद्य-पात्र पार्वतीच्या तोंडाला लावलें. त्या मद्यानें पार्वतीच्या ठिकाणीं विकृति उत्पन्न केली. पण त्या मद-विकारानें पार्वती अधिकच मनोहर दिसूं लागली. आम्रवृक्ष मोहरून त्याचा सुगंध दरवळूं लागला कीं, त्यालाच मग सहकार हें नांव पडतें. पार्वतीचा मदविकारहि तसाच सौंदर्य या नांवानें शोभूं लागला. मग ती शंकर आणि मदन या दोघांच्याहि पूर्णपणें आधीन झाली. तिचे नेत्र गरगर फिरूं लागले. ती कारणावांचून हसूं लागली. तोंड घामानें डबडबलें. तशा अवस्थेंतहि ती शंकराला फार आवडली. तो तिच्या मुखाकडे टक लावून पाहूं लागला. तिची सोनेरी मणिमेखला खालीं सरकली. जघनभार असह्य झाला. आणि हें पाहून शंकरानें आपल्या कल्पनामात्रें एक छानदार मणिमंदिर बनविलें आणि तिला त्या गृहांत नेलें. तेथें मंदाकिनीच्या वाळवंटासारखी शुभ्र शय्या आंथरलेली होती. शंकरानें तिच्यावर पार्वतीला झोंपवलें. त्या ठिकाणीं मग दोघांनीं आलिंगनसौख्याचा उपभोग घेतला. ती रात्र उत्कट सुखांत गेली. सकाळीं उठून शंकरानें पाहिलें तों पार्वतीचे डोळे जागरणानें लाल झाले होते. अधरावर दंतक्षतें चमकत होतीं. केस मोकळे सुटले होते. कपाळावरचा कुंकुमतिलकहि अस्पष्ट झाला होता. शय्येवरच्या चादरीवर सुरकुत्या पडल्या होत्या. अळित्यानें रंगवलेल्या पावलांचे ठसे उमटले होते. आणि मेखलाहि तुटून पडली होती.

अशा प्रकारें तीं दोघें वनविहार करीत असतांना त्यांच्या हर्षसागराला भरती आली. कोणी दर्शनाला आलें तरी शंकर त्याला भेटेना. एकामागून एक अशीं दीडशें वर्षें एका रात्रीसारखीं गेलीं. पण तरीहि रतिसुखाविषयींची शंकराची आसक्ति कमी झाली नाहीं. समुद्रांतल्या पाण्यानें आंतला वडवाग्नि कधीं शमला आहे का ? विषयवासनेचेंहि तसेंच आहे. भोगाचीं इंधनें जितकीं घालाल तितकीं ती कमी न होतां वाढते मात्र !



ग्रा. क्र. १८८२
मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे
अनुक्रम 23488 दि: ...
क्रमांक 9930 नों: दि: 30/10/58

REFBK-0009772

## प्रत्येक कुटुंबांत संग्राह्य असें निवडक वाङ्मय

| | | | |
|---|---|---|---|
| वक्तृत्वशास्त्र | ( प्रबंध ) | न. वि. गाडगीळ | ६=०० |
| कुमारसम्भव | ( कथा ) | महादेवशास्त्री जोशी | २=०० |
| समाजवादी समाजरचना | ( विवेचन ) | स. मा. गर्गे | ४=५० |
| तो आणिक ती | ( काव्यकथा ) | शं. गो. साठे | १=०० |
| शिलंगण | ( खण्डकाव्य ) | ,, | १=०० |
| चिंचा आणि बोरें | ( विनोदी स्फुटकाव्य ) | ,, | १=०० |
| प्रीतिपथावर | ( स्फुट कविता ) | सौ. पद्मा | २=०० |
| शरदिनी | ( ,, ) | वा. पु. दामले | २=५० |
| पुसलेलीं चित्रें | ( कादंबरी ) | सौ. सुधा साठे | ४=५० |
| नकुलालङ्कार | ( खण्डकाव्य ) | माधव जूलियन् | १=०० |
| सुधारक | ( ,, ) | ,, | २=०० |
| गज्जलाञ्जलि | ( स्फुट कविता ) | ,, | २=०० |
| विरहतरङ्ग | ( खण्डकाव्य ) | ,, | २=५० |
| सचित्र प्रथमोपचार | ( शास्त्रीय ) | डॉ. वि. ना. भावे | १=५० |
| एकच गांठ | ( नाटक ) | सौ. सुधा साठे | १=२५ |
| छापील संसार | ( नाटक ) | शं. गो. साठे | १=०० |
| औट घटकेचें राज्य | ( कादंबरी ) | शं. गो. साठे | ३=०० |
| ज्योतिष-शिक्षण-क्रम | ( ज्योतिष ) | ग. बा. ओक | १=५० |
| श्यामली | ( कथासंग्रह ) | इंदिरा संत | १=५० |
| जुन्या जखमा | ( कथासंग्रह ) | भालचंद्र लाड | २=५० |
| स्वरनिनाद | ( फिड्ल् शिक्षक ) | श्रीधर पार्सेकर | १=५० |
| अभिनव पाकशास्त्र | ( स्त्रियांसाठीं ) | पी. चौधरी | ०=७५ |

• • •

• व्यापाऱ्यांस व वाचनालयांस भरपूर सवलत. • वरीलपैकीं कोणत्याहि पुस्तकाचें मूल्य आगाऊ धाडणाऱ्या ग्राहकास साध्या टपालानें पाठवूं.

**न वी न कि ता ब खा ना**

गिरगांव : मुंबई ४ : : : : बुधवार चौक : पुणें २